■ gavakari.in ■ gavkarinews.com ■ वर्ष ८६ ■ अंक : २१९ ■ नाशिक, गुरुवार, दि. ८ मे २०२५ ■ किंमत रु. ५.०० ■ पाने = १२ ■ नाशिक ■ शहर-जिल्हा

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक
गांवकरी





# ऑपरेशन सिंदूर : अतिरेक्यांचे नऊ तळ उद्ध्वस्त

**नवी दिल्ली : पहलगाम येथील भ्याड दहशतवादी हल्ल्यास प्रत्युत्तर म्हणून भारतीय वायुसेनेने पाकिस्तानमध्ये ऑपरेशन सिंदूर राबवत नऊ दहशतवादी ठिकाणांवर मंगळवारी (दि. ६) मध्यरात्री दीडच्या सुमारास हल्ला केला. बहावलपूर, कोटली आणि मुजफ्फराबादमध्ये हे हल्ले करण्यात आले. या मोहिमेत भारतीय सेनेने पाकिस्तानी नागरिक किंवा पाकिस्तानी लष्कराच्या कोणत्याही ठिकाणांवर हल्ला केला नाही. ऑपरेशन सिंदूरमध्ये भारतीय सेनेने बहावलपूरमध्ये जैश-ए-महम्मदचे हेडक्वार्टर उद्ध्वस्त केले.**



पहलगामच्या हल्ल्यांनंतरच्या पंधरा दिवसांनी भारताने प्रत्युत्तरादाखल मंगळवारी मध्यरात्रीनंतर ऑपरेशन सिंदूर ही पहिली धडक लष्करी मोहीम राबवली. भारतीय लष्कर, नौदल आणि हवाई दलाने एकत्रितपणे पाकिस्तान आणि पाकव्याप्त जम्मू आणि काश्मीर (पीओके)मधील पाकिस्तानी दहशतवादी अड्ड्यांवर किमान २४ क्षेपणास्त्रे डागली.

काही मिनिटांच्या हवाई हल्ल्यांत पाकिस्तानमधील किमान नऊ दहशतवादी अड्डे भारताने उद्ध्वस्त केले. ही मोहीम फत्ते करण्यासाठी हवाई दलाच्या सुखोई व राफेल या लढाऊ विमानांना केवळ सात मिनिटे (मंगळवारी मध्यरात्री १:०४ ते १:११ ) लागली. संपूर्ण मोहीम पार पडण्यासाठी एकूण २५ मिनिटे लागल्याचे लष्कराने म्हटले आहे. संरक्षण मंत्रालयाने हल्ल्याचा दोन मिनिटांचा व्हिडिओ दिल्लीतील राष्ट्रीय माध्यम केंद्रात पत्रकारांना दाखवला. या दहशतवादी अड्ड्यांमध्ये दडून बसलेले व हल्ल्यात मारले गेलेले दहशतवादी व त्यांचे कुटुंबीय यांची संख्या किमान २६ ते कमाल ९० इतकी सांगण्यात येते. भारतात दहशतवादी कारवायांना प्रोत्साहन देणाऱ्या जैश-ए-मोहम्मद आणि लष्कर-ए-तैयबाच्या दहशतवादाच्या तळांवरच मुख्यतः हा हल्ला करण्यात आला.

मुजफ्फराबाद, बहावलपूर आणि मुरीदकेसह एकूण सात शहरांमधील नऊ ठिकाणी हवाई हल्ले करण्यात आले. जैश-ए-मोहम्मदच्या मरकज सुभान अल्ला या मुख्यालयासह चार अड्डे तसेच लष्कर-ए-तोयबाचे तीन आणि हिजबुल मुजाहिदीनचे दोन दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त झाले आहेत. भारतातील अनेक दहशतवादी हल्ल्यांचा मास्टरमाईंड असलेल्या मसूद अजहर या एकाच दहशतवादी म्होरक्याचे किमान १० ते १४ नातेवाईक या हल्ल्यात मारले गेले आहेत. पाकिस्तानने या हवाई हल्ल्यानंतर बुधवारी देशभरात आणीबाणी लागू केली असून, सर्व विमानतळेही तडकाफडकी बंद केली आहेत. राजधानी इस्लामाबादसह अनेक मुख्य शहरांतील सर्व सरकारी आणि खाजगी शाळा, महाविद्यालये, अनेक सरकारी कार्यालये बंद करण्यात आली आहेत.

या हवाई हल्ल्यानंतर भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनी अमेरिकेचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार आणि परराष्ट्रमंत्री मार्को रुबियो यांच्याशी लगेच चर्चा केली व त्यांना भारताच्या प्रत्युत्तर कारवाईची माहिती दिली.

दरम्यान, पाकिस्तानी सैन्याने सीमेवरील कुरापती सुरू ठेवताना नियंत्रण रेषा आणि आंतरराष्ट्रीय सीमेवर मंगळवारी रात्रीही तोफखान्याद्वारे गोळीबार केला.

ऑपरेशन सिंदूरनंतर पाक सीमेजवळील करतारपूर कॅरिडॉर बंद करण्यात आला आहे. पाकबरोबरच्या वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर भारताने पाकिस्तानच्या सीमेवरील राज्यांमधील सर्व उड्डाणे पुढील सूचना येईपर्यंत रद्द केली आहेत. यात जम्मू आणि काश्मीर, हिमाचल प्रदेश, पंजाब, गुजरात आणि राजस्थान यांचा समावेश आहे. भारताने सात राज्यांमधील ११ विमानतळांवरील विमान वाहतूक बंद केली आहे. श्रीनगर, जम्मू, श्रीनगर, लेह, चंदीगड, बिकानेर, जोधपूर, राजकोट, धर्मशाला, अमृतसर, भुज आणि जामनगरमध्ये उड्डाणे थांबवण्यात आली आहेत. भारतीय वायुसेनेने हे हल्ले करण्यापूर्वी देशभरात ३०० ठिकाणी मॉकड्रिल केले होते. यानंतर त्यांनी थेट पाकिस्तानात घुसून दहशतवाद्यांना मारले.

## दोनशेहून अधिक विमानांची उड्डाणे रद्द

ऑपरेशन सिंदूरनंतर बुधवारी (दि. ७) उत्तर आणि पश्चिम भारतातील विमान वाहतुकीवर मोठा परिणाम झाला आहे. दोनशेहून अधिक उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत. श्रीनगरसह किमान १८ विमानतळांवरील कामकाज तात्पुरते स्थगित करण्यात आले आहेत. एकट्या इंडिगोने त्यांच्या १६५ हून अधिक उड्डाणे १० मे संध्याकाळी ५.२९ पर्यंत रद्द केली आहेत. या कालावधीत प्रवासासाठी वैध तिकिटे असलेल्या प्रवाशांना पुन्हा बुकिंग शुल्कात एकवेळ सूट किंवा पूर्ण परतफेड दिली जाईल, असे म्हटले आहे. स्पाइसजेट, अकासा एअर, एअर इंडिया एक्सप्रेस आणि प्रादेशिक विमान कंपनी स्टार एअर यांचाही परिणाम झाला आहे. दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर किमान ३५ उड्डाणे रद्द करण्यात आली. अमेरिकन एअरलाइन्स आणि इतर परदेशी विमान कंपन्यांनी दिल्ली विमानतळावरून त्यांच्या सेवा रद्द केल्या आहेत. पाकिस्तानी हवाई क्षेत्र बंद झाल्यामुळे कतार एअरवेजनेही पाकिस्तानला जाणारी उड्डाणे तात्पुरती स्थगित केली आहेत.

## मसूद अझहरच्या कुटुंबीयांचा खात्मा

ऑपरेशन सिंदूरच्या या एअरस्ट्राइकमध्ये कुख्यात दहशतवादी मसूर अझहरच्या कुटुंबातील १४ जणांचा खात्मा झाला. यात मसूद अझहरची आई आणि बहिणीचा समावेश आहे. मसूद अझहरचा भाऊ रऊफ अजगर हा गंभीर जखमी असल्याचे समजते. मुंबईत झालेल्या २६/११ च्या हल्ल्याचा सूत्रधार मसूद अझहर असल्याचे सांगितले जाते. सन २००१ मध्ये संसदेवरील हल्ल्याचा कट त्यानेच रचला होता. यासह उरी हल्ल्यातही मसूद अझहर हाच सूत्रधार होता. यानंतर अझहरने सोशल मीडियावर पोस्ट टाकद नेमकं काय म्हटले आहे की, अल्लाह तालाचे काही खास लोक असतात... जे शहीद होतात ते म्हणजे अल्लाहचे पाहुणे बनतात. माझ्या कुटुंबातील पाच जणांना ही खास संधी मिळाली... रात्रीच्या वेळी त्यांना ही शहादत मिळाली. पाच निष्पाप लहान मुले, माझी आई जी खूप आजारी होती, माझे वडील, माझी बहीण आणि तिचा पती सगळे या अपघातात शहीद झाले.

## ऑपरेशन सिंदूर नाव का दिले?

पहलगाम येथे २२ एप्रिलला झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २५ भारतीय आणि एका नेपाळी नागरिकाचा मृत्यू झाला होता. यावेळी पर्यटकांना त्यांचा धर्म विचारून गोळी झाडण्यात आली. हा हल्ला केवळ देशावर नाही, तर त्यामागे धार्मिक आणि देशाच्या एकात्मतेवर हल्ला असल्याचे बोलले जात आहे. या भ्याड हल्ल्यावेळी महिलांचं कुंकू म्हणजे त्यांच्या पतींना लक्ष्य करण्यात आले. दहशतवाद्यांचा हेतू केवळ त्यांना जिवानिशी मारण्याचाच नव्हता, तर भारतीय संस्कृती, देशातील एकता आणि देशाच्या आत्म्यावर हल्ला करण्याचा होता. त्यामुळे अनेक निष्पापांचे कुंकू पुसल्या गेलेल्या पीडित कुटुंबीयांना काहीअंशी न्याय देण्याच्या हेतूने या मोहिमेला ऑपरेशन सिंदूर असे नाव देण्यात आल्याचे बोलले जात आहे.

## पाकिस्तानकडून बदला घेण्याच्या वल्गना

पहलगाममधल्या दहशतवादी हल्ल्याला भारताने दिलेला प्रतिसाद तात्पुरता आनंद असल्याची प्रतिक्रिया लेफ्टनंट जनरल अहमद शरीफ चौधरी यांनी दिली आहे. याचा बदला कायम स्वरूपाच्या दुःखाने घेतला जाईल. पाकिस्तान स्वतःच्या वेळेनुसार आणि ठरवलेल्या ठिकाणी या हल्ल्याला प्रत्युत्तर देईल. या हल्ल्याला अनुत्तरित सोडले जाणार नाही. सर्व हल्ले भारताने स्वतःच्या हवाई हद्दीतून केले आहेत. पाकिस्तान स्वतःच्या निवडीच्या वेळी आणि ठिकाणी त्याचे उत्तर देईल. ते अनुत्तरित राहणार नाही. भारताच्या तात्पुरत्या आनंदाची जागा सततच्या दुःखाने घेतली जाईल, असे त्यात म्हटले आहे.

## भारताने केलेली कारवाई दुर्दैवी : चीन

भारताने पाकिस्तानवर केलेल्या एअर स्ट्राइकनंतर पाकिस्तानचा सच्चा मित्र म्हणून ओळखला जाणाऱ्या चीनने भारताने केलेली कारवाई दुर्दैवी असल्याचे म्हटले आहे. चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्याने बुधवारी सांगितले की, भारताची आज सकाळी झालेली लष्करी कारवाई दुर्दैवी आहे. सद्यःस्थितीबाबत आम्ही चिंतेत आहोत. भारत आणि पाकिस्तान हे एकमेकांचे शेजारी देश आहेत आणि चीनचेही शेजारी आहेत. चीन सर्व प्रकारच्या दहशतवादाचा विरोध करतो. दोन्ही देशांनी शांतता आणि स्थैर्याच्या दृष्टीने विचार करावा, संयम बाळगावा, शांतता राखावी आणि परिस्थिती अधिक गुंतागुंतीची होईल असे कोणतेही पाऊल उचलू नये, असे आम्ही दोघांनाही आवाहन करतो.




## भारताकडून या नऊ ठिकाणांवर एअरस्ट्राइक

**१. बहावलपूर :** जैश-ए-मोहम्मदचे मुख्यालय. आंतरराष्ट्रीय सीमेपासून १०० किमी

**२. मुरीदके :** लष्कर-ए-तैयबाचे मुख्यालय सीमेपासून ३० किमी अंतरावर

**३. सवाई :** लश्कर-ए-तोयबाचा अड्डा सीमेपासून ३० कि.मी.दूर

**४. गुलपूर :** ताबारेषेपासून ३५ कि.मी. दूर हल्लयावेळी ८० दहशतवादी

**५. बिलाल :** जैश-ए-मोहम्मदचा हवाई तळ सीमेपासून ३५ कि.मी.दूर

**६. कोटली :** नियंत्रणरेषेपासून १५ किमी अंतरावर. ५० दहशतवादी उपस्थित होते.

**७. बर्नाला :** दहशतवाद्यांचा अड्डा सीमारेषेपासून १० कि.मी.दूर

**८. सरजाल** जैश-ए-मोहम्मदचा अड्डा सीमेपासून ८ कि.मी.दूर

**९. महमूना** हिजबुल्लाचे प्रशिक्षण केंद्र सीमेपासून १५ कि.मी.दूर

## राफेल विमानांनी डागली स्काल्प क्षेपणास्त्र

- पाकची नऊ लक्ष्य बेचिराख करण्यासाठी राफेल विमानांचा वापर.
- राफेल विमानांनी लक्ष्यांवर डागली स्काल्प क्षेपणास्त्र.
- अतिदूरच्या लक्ष्यांवर मारा करण्यासाठी स्काल्प क्षेपणास्त्र.
- ५०० किमी अंतरावरील लक्ष्यांचा मारा करण्याची स्काल्पची क्षमता.
- एक हजार किमी प्रतितास वेगाने स्काल्प मिसाइल करतं मारा.
- शत्रूच्या रडारवर स्काल्प दिसत नसल्याने हल्ला यशस्वी.

## ऑपरेशन सिंदूरची वैशिष्ट्ये

- पाकिस्तानच्या रडार यंत्रणेला कळू न देता हल्ला.
- भारताने दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त केल्याची पाकची कबुली.
- पाकव्याप्तच नव्हे, पाकिस्तानातले अड्डेही उद्ध्वस्त.
- दहशतवादी अड्ड्यांची माहिती अचूक होती हे सिद्ध.
- नऊ तळांवरील हल्ल्यात शेकडो दहशतवाद्यांचा खात्मा.
- भारतीय हवाई हल्ल्यात एकाही नागरिकाला इजा नाही.
- आंतरराष्ट्रीय सीमारेषा ओलांडून भारताचे हल्ले.

## सर्वाधिक दहशतवाद्यांची उपस्थिती असलेले तळ

- बहावलपूरमध्ये २५० हून अधिक दहशतवादी.
- मुरीदकेमध्ये १२० हून अधिक दहशतवादी.
- मुजफ्फराबादमध्ये ११० ते १३० दहशतवादी.
- कोटलीमध्ये ७५ ते ८० दहशतवादी.
- सियालकोटमध्ये ९० ते १०० दहशतवादी.
- गुलपूरमध्ये ७५ ते ८० दहशतवादी.
- भिंबरमध्ये ६० हून अधिक दहशतवादी.
- चाक अम्रूमध्ये ७० ते ८० दहशतवादी.

## कोणकोणते दहशतवादी मारले गेले?

- लष्कर-ए-तय्यबाचा महत्त्वाचा कमांडर खालिद मोहम्मद आलम.
- धर्मांध इस्लामिक धर्मप्रसारक आणि कोटली दहशतवादी शिबिराचा मुख्य कमांडर कारी मोहम्मद इकबाल
- हिजबुल मुजाहिद्दीनचा मोस्ट वॉन्टेड दहशतवादी मौलाना मसूद अझहर याचा भाऊ आणि भारताचा मोस्ट वॉन्टेड दहशतवादी रऊफ असगर गंभीररीत्या जखमी.
- मौलाना मसूद अझहर याचा भाऊ आणि भारताचा मोस्ट वॉन्टेड दहशतवादी रऊफ असगरच्या पत्नीचा मृत्यू.
- भारताचा मोस्ट वॉन्टेड दहशतवादी रऊफ असगरचा मुलगा हुजैफा यांचा मृत्यू.
- याशिवाय मौलाना मसूद अझहर याच्या परिवारातील एकूण १४ लोकांचा मृत्यू.
- लष्कर- ए-तय्यबाचे दहशतवादी वकास आणि हसन यांनाही कंठस्नान.
- लष्कर-ए-तय्यबाचा मोस्ट वॉन्टेड अब्दुल मलिक आणि मुदस्सिर यांचा खात्मा.

# ऑपरेशनदरम्यान निष्पाप नागरिकांची घेण्यात आली काळजी

## कर्नल सोफिया कुरेशी, विंग कमांडर व्योमिका सिंग यांची पुराव्यासह माहिती

**नवी दिल्ली :**

भारताने पाकिस्तानातील नऊ ठिकाणांवर एअरस्ट्राइक केला. या हल्ल्यात भारताने पाकिस्तानातील दहशतवादी ठिकाणांना उद्ध्वस्त केले. या संपूर्ण मोहिमेची माहिती नारी शक्तीने दिली आहे. ऑपरेशन सिंदूरनंतर लष्कराकडून पत्रकार परिषद घेत याबाबतची माहिती देण्यात आली. यात परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री, हवाई दलातील व्योमिका सिंग यांच्यासोबत लष्करातील कर्नल सोफिया कुरेशी यांनी या मोहिमेबाबत माहिती दिली आहे.

यावेळी परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांनी सांगितलं की, जम्मू काश्मीरमधील वाढते पर्यटन आणि चांगली होत असलेली अर्थव्यवस्था यांच्यावर परिणाम करण्यासाठीचा पहलगाममध्ये हा प्रयत्न केला होता. या हल्ल्याचा उद्देश विकास आणि प्रगती थांबवून राज्याला मागास करणे, हा त्यांचा हेतू होता. पाकिस्तानचा हल्ल्यातील सहभाग उघड आहे. या हल्ल्याची जबाबदारी टीआरएफने घेतली आहे. हल्लेखोरांचीही ओळख पटली आहे. आमच्या गुप्तचर यंत्रणेने हल्ल्यात सहभागी असलेल्या लोकांबद्दल माहिती गोळा केली आहे. या हल्ल्याचा पाकिस्तानशी संबंध आहे. पाकिस्तानला दहशतवाद्यांचे सुरक्षित आश्रयस्थान म्हणून जगभरात मान्यता मिळाली आहे, अशी माहिती त्यांनी यावेळी दिली आहे.

हल्ल्याच्या पंधरा दिवसांनंतरही पाकिस्तानने दहशतवाद्यांवर कोणतीही कारवाई केली नाही. त्यांनी उलट आरोप केले. भारतावर आणखी हल्ले होऊ शकतात. म्हणून त्यावर उपाययोजना करणे महत्त्वाचे आहे. भारताने दहशतवाद संपवण्यासाठी प्रतिसाद दिला आहे. दहशतवादी जम्मू आणि काश्मीरमधील विकास थांबवू इच्छितात. टीआरएफ ही लष्करशी जोडलेली संघटना आहे. पहलगाम हल्ल्यात टीआरएफचा सहभाग आहे, अशी माहिती परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांनी दिली आहे.



लष्करातील कर्नल सोफिया कुरेशी यांनी या मोहिमेबाबत माहिती देताना सांगितलं की, या कारवाईत नऊ दहशतवाद्यांचे अड्डे लक्ष्य करून नष्ट करण्यात आले. ऑपरेशन सिंदूरदरम्यान निष्पाप नागरिकांना इजा होणार नाही, याची काळजी घेण्यात आली. मार्च २०२५ मध्ये जम्मू आणि काश्मीरमधील चार जवानांची हत्या करण्यात आली होती. मुंबई दहशतवादी हल्ल्यात सहभागी असलेल्या दहशतवाद्यांच्या लपण्याच्या आणि प्रशिक्षणाच्या ठिकाणांनाही लक्ष्य करण्यात आले आहे. मरकज सुभानल्लाह हे जैश-ए-मोहम्मदचे मुख्यालय होते. येथे दहशतवाद्यांना प्रशिक्षण दिले जात असे.

कोणत्याही लष्करी ठिकाणाला लक्ष्य करण्यात आले नाही आणि नागरिकांची जीवितहानी झाली नाही. यावेळी त्यांनी टार्गेट असलेली आणि ती ठिकाणे उद्ध्वस्त झाल्याचे फोटोदेखील दाखवले. आम्ही कोटली अब्बासमधील दहशतवादी तळ उद्ध्वस्त केला. या छावणीत सुमारे १५०० दहशतवाद्यांना प्रशिक्षण देण्यात आले होते. याशिवाय पाकिस्तानी पंजाबमधील बहावलपूर आणि महमूना झोया येथेही दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त करण्यात आले आहेत.

### कसाबचा प्रशिक्षण अड्डाही उद्ध्वस्त

या कारवाईत मुरीदके येथील मरकज तैयबादेखील उद्ध्वस्त करण्यात आला आहे. हे लष्कराचे मुख्यालय असल्याचे म्हटले जाते आणि दहशतवादी अजमल कसाबलाही येथून प्रशिक्षण मिळाले होते.

# भारतीय कांदा उत्पादक पाकिस्तानवर करणार सर्जिकल स्ट्राइक

## निर्यातवाढीमुळे पंधरा दिवसांत भाव वाढणार

**समीर पठार : लासलगाव**

पहलगाम येथील पर्यटकांवर दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यानंतर भारत सरकारने पाकिस्तानवर निर्बंध लावले आहेत. आता त्यात भारतीय कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या अनोख्या सर्जिकल स्ट्राइकची भर पडणार असून, या मे महिन्यात भारतीय कांदा आशियाच्या बाजारात निर्यातीचा धमाका करण्याच्या तयारीत आहे. परिणामी, दोन आठवड्यांनंतर स्थानिक बाजारातील भाव वाढण्याची शक्यता निर्यातदारांनी व्यक्त केली आहे.

कांदा निर्यातीतून संपूर्ण जगाची उलाढाल ही साधारणतः ९ अब्ज डॉलरची आहे. दुसऱ्या क्रमांकावर नेदरलँड १.१० अब्ज डॉलर, तिसऱ्या क्रमांकावर स्पेन ७७५ दशलक्ष डॉलर, चौथ्या क्रमांकावर भारत ७५० दशलक्ष डॉलर, त्यात चीनचा सर्वाधिक मोठा वाटा आहे. जवळपास ३ अब्ज डॉलरची कांदा निर्यात एकटा चीन करतो. तर भारत चौथ्या क्रमांकावर आहे. तर जागतिक कांदा निर्यातीत पाकिस्तानचा वाटा आहे. केवळ सरासरी ७० दशलक्ष डॉलर म्हणजेच भारताच्या निर्यातीच्या केवळ ८ ते ९ टक्के. पाकिस्तान प्रामुख्याने पुढील देशांना कांदा निर्यात करतो. २६ टक्के निर्यात मलेशियाला, १४.५ टक्के निर्यात युएईला, १४ टक्के कांदा निर्यात श्रीलंकेत, ११ टक्के कांदा



निर्यात ओमान, कुवेत आणि कतार या देशांना, ५.६ टक्के कांदा निर्यात सौदी अरेबियाला, ३ टक्के निर्यात सिंगापूरला, त्यानंतर बहारिन, ब्रुनेई, व्हिएतनाम या देशांना सर्व मिळून केवळ १ टक्का, तर बांगलादेशला मात्र केवळ एक टक्क्यापेक्षाही कमी कांदा निर्यात करतो.

मागील वर्षी म्हणजेच २०२३-२४ मध्ये लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कांदा बाजारभाव आटोक्यात राहावे यासाठी भारताच्या केंद्र सरकारने निर्यातबंदीसह निर्यातीवर निर्बंध लावले होते. त्यामुळे आपल्याकडून कांदा निर्यातीवर मर्यादा आल्या. त्यामुळे जागतिक बाजारात जी पोकळी निर्माण झाली, तिचा फायदा पाकिस्तानने घेतला आणि तब्बल २ लाख २० हजार मे. टन कांदा निर्यात केला. त्यामुळे त्या देशात स्थानिक बाजारात कांद्याचे दर ३५० रुपये किलोवर पोहोचले, मात्र निर्यातीतून त्यांनी परकीय गंगाजळी वाढवून घेतली.

यंदा पाकिस्तानमध्ये कांदा लागवड जास्त असून, एप्रिलमध्ये त्यांचा कांदा हंगाम संपला आहे. याशिवाय, अलीकडेच श्रीलंकेला निर्यात केलेल्या कांद्याच्या कंटेनरमध्ये मादक द्रव्याची तस्करी झाल्याचे आढळून आल्याने त्या देशात पाकिस्तानची प्रतिमा खराब झाली आहे. परिणामी, आता श्रीलंकेतून भारतीय कांद्याला मागणी वाढू शकते. पहलगाम प्रकरणात पाकिस्तानचा हात असल्याचा आरोप भारताने केला आहे. त्यानंतरही पाकिस्तानची प्रतिमा जागतिक बाजारात खराब होऊन निर्यातीवर निर्बंध येण्याची शक्यता आहे. परिणामी, या मे महिन्यामध्ये भारतीय कांद्याला निर्यातीत मोकळीक मिळणार आहे.

# कृषी सहाय्यकांचे जिल्ह्यात धरणे आंदोलन

## शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न

**नाशिक : प्रतिनिधी**

कृषी सहाय्यकांचे प्रश्न १५ दिवसांत सोडविण्याचे आश्वासन कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी पाळले नाही. त्यामुळे राज्यभरातील कृषी सहाय्यकांनी विविध मागण्यांसाठी सोमवारपासून (दि.५) काळ्या फिती लावून आंदोलन सुरू केले आहे. मंगळवारी (दि. ६) कृषी सहाय्यक शासकीय ग्रुपमधून बाहेर पडल्यानंतर बुधवारी (दि.७) एकदिवसीय धरणे आंदोलन केले. दरम्यान, १५ मेपर्यंत मागण्यांची सोडवणूक न झाल्यास १५ मेपासून बेमुदत कामबंद आंदोलन केले जाईल, असा इशारा कृषी सहाय्यकांनी दिला आहे.

राज्य कृषी सहाय्यक संघटनेने विविध मागण्यांसाठी यापूर्वी आंदोलन पुकारले होते. त्या पार्श्वभूमीवर १० फेब्रुवारीला बैठक घेऊन १५ दिवसांत मागण्यांची सोडवणूक करण्याचे आश्वासन कृषिमंत्री कोकाटे यांनी दिले होते. मात्र, अद्याप मागण्यांची सोडवणूक झाली नाही. त्यामुळे कृषी सहाय्यकांनी पुन्हा एकदा आंदोलनाची हाक दिली. यात कृषी सहाय्यकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन राज्य कृषी सहाय्यक संघटना नाशिक शाखेचे अध्यक्ष हरिभाऊ गावीत, कार्याध्यक्ष भास्कर आव्हाड, जयकिर्तीमान




पाटील, सरचिटणीस दुर्गेश बच्छाव, कोशाध्यक्ष तुषार गवळी आदींनी केले आहे.

कृषी सहाय्यकांचे पदनाम बदलून सहाय्यक कृषी अधिकारी करा. सर्व कामकाज डिजिटल स्वरूपात होत असल्याने लॅपटॉप द्यावा. कृषी सहाय्यकांना ग्रामस्तरावर कामकाजासाठी कृषी मदतनीस द्यावा. निविष्ठा वाटप करण्यासाठी भाड्याची तरतूद करावी. कृषी विभागाच्या आकृतिबंधास तत्काळ मंजुरी द्या. कृषी पर्यवेक्षकांची पदे वाढवून कृषी सहाय्यकांना पदोन्नती द्यावी. पोकरा योजनेत समूह सहाय्यकांची पदे पूर्वीपणे भरावीत. सिल्लोडमधील कृषी सहाय्यकाच्या आत्महत्येची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करा आधी मागण्या केल्या आहेत. दरम्यान, मंगळवारी (दि. ६) कृषी सहाय्यक शासकीय ग्रुपमधून बाहेर पडून शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर बुधवारी (दि. ७) जिल्ह्यात तालुकास्तरावर एक दिवसाचे धरणे आंदोलन केले.



# आमोदे, बोराळे परिसरात तिसऱ्या दिवशीही बेमोसमी पावसाची हजेरी

## शेतीपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान

**नांदगाव : प्रतिनिधी**

नांदगाव तालुक्यातील आमोदे, बोराळे परिसरात सलग तिसऱ्या दिवशी वादळी वाऱ्यासह बेमोसमी पावसाने जोरदार हजेरी लावल्याने कांदा, मका, डाळिंब, बाजरी, शेवगा आदी पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.

सोमवार, दि. ५ रोजी देखील अचानक आलेल्या वादळी वाऱ्यासह पावसाने शेतकऱ्यांची मोठी तारांबळ उडाली होती. मंगळवार, दि. ६ रोजी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास आलेल्या या पावसात मका तसेच कांदा पीक पूर्णपणे भिजल्यामुळे शेतकरी वर्गाला मोठा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागणार आहे.



# अभोण्यात गारांसह पाऊस

**अभोणा : प्रतिनिधी**

शहर व परिसरात दोन दिवसांपासून सोसाट्याचा वारा वाहत होता. मंगळवारी ( दि. ६ ) पहाटे पावसाच्या तुरळक सरी पडल्या होत्या, मात्र दुपारी चार वाजता वादळी वाऱ्यांसह विजांच्या कडकडाटात जोरदार पावसाला सुरुवात झाली. त्यातच दोन मिनिटे गारांचा सडा पडला. त्यामुळे शेतात उघड्यावर पडलेल्या कांद्यासह मिरची व भाजीपाला पिकांचे मोठे नुकसान होण्याची भीती व्यक्त होत आहे. वीजपुरवठा खंडित झाला होता.

# सुरगाण्यात वादळी वाऱ्यासह पाऊस

**सुरगाणा : प्रतिनिधी**

सुरगाणा तालुक्यात सकाळपासून ढगाळ वातावरण निर्माण झाले होते. ज्यामुळे उष्णतेची तीव्रता काहीशी कमी झाली होती.

मात्र सायंकाळी चारच्या सुमारास गोंदुणे, उंबरठाण, सुरगाणा, वांगण सुळे, बाऱ्हे, मनखेड, आळीवदांड, माणी व बोरगाव घाटमाथा परिसरात वादळी वाऱ्यांसह विजांच्या कडकडाटात जवळपास अर्धा तास जोरदार पाऊस झाला. तालुक्यातील खिर्डी येथे वादळी वाऱ्यासह पाऊस झाल्याने एका घराची पडझड झाली तसेच आळीवंदाड येथील जिल्हा परिषद शाळेचे वादळी वाऱ्याने पत्रे उडवून गेले. मुलांना सुट्ट्या



लागल्याने मोठा अनर्थ टळला आहे. या वादळी पावसामुळे काही ठिकाणी आंब्याची झाडे कोसळून पडली, तर विक्रीसाठी तयार झालेला आंबा खाली गळून अनेक शेतकऱ्यांचे हजारो रुपयांचे नुकसान झाले आहे. नुकसानीमुळे शेतकऱ्यांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे.

### धनगर साहित्य संमेलन नियोजनाबाबत रविवारी बैठक

**चांदवड :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षाच्या पार्श्वभूमीवर ऐतिहासिक सहाव्या धनगर साहित्य संमेलनाच्या राज्यस्तरीय नियोजन बैठकीचे आयोजन ११ मे २०२५ रोजी नाशिक जिल्ह्यातील होळकरनगरी, चांदवड येथील ऐतिहासिक होळकरवाडा रंगमहाल येथे करण्यात आले आहे. अनेक वर्षांपासून महाराष्ट्रात होणाऱ्या या साहित्य संमेलनाच्या माध्यमातून होळकरशाहीच्या पाऊलखुणा जतन करण्याचा आणि इतिहास अभ्यासक व साहित्यप्रेमींना एकत्र आणण्याचा प्रयत्न असतो. अध्यक्षांच्या परवानगीने इतर विषयांवरही विचारविनिमय होईल.

## संक्षिप्त ▸▸

### शिवाबाबा वाघ प्रतिष्ठानतर्फे साहित्य कलाकृती पुरस्कार

**येवला :** तालुक्यातील पिंपळगाव जलाल येथील शिवाबाबा वाघ प्रतिष्ठान आयोजित शहादू शिवाजी वाघ स्मृती चौथ्या राज्यस्तरीय साहित्य कलाकृती पुरस्काराचा निकाल जाहीर करण्यात आला, अशी माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष संजय वाघ यांनी दिली. महाराष्ट्रातून कवितासंग्रह- ७८, कथासंग्रह-२२, कादंबरी -१६ आणि ललित लेखसंग्रह- २२ व इतर ५ अशा एकूण १४३ विविध प्रकारच्या साहित्य कलाकृती पुरस्कारासाठी प्राप्त झाल्या होत्या. या कलाकृतीतून प्रत्येक साहित्य प्रकारातील एक कलाकृतीला प्रथम क्रमांकाचा पुरस्कार जाहीर झाला आहे. निकाल पुढीलप्रमाणे - कवितासंग्रहासाठी वाळवा (जि. सांगली) येथील कवी धनाजी धोंडीराम घोरपडे यांच्या 'जामिनावर सुटलेला काळा घोडा', कथासंग्रहासाठी वणी (जि. यवतमाळ) येथील लेखक डॉ. अनंता सूर यांच्या 'कोंडमारा', वैजापूर (जि. छत्रपती संभाजीनगर) येथील लेखक डॉ. भीमराव वाकचौरे यांच्या 'घरंगळण' आणि हिंगणा रोड, नागपूरच्या लेखिका वर्षा किडे कुळकर्णी यांच्या 'काळीजफुल' या कलाकृतीसाठी पुरस्कार जाहीर झाला आहे. पुरस्कारप्राप्त सर्व कलाकृतींचा सन्मान ४ जून २०२५ ला पिंपळगाव जलाल येथे होणाऱ्या राज्यस्तरीय साहित्य कलाकृती पुरस्कार प्रदान सोहळ्यात होणार आहे, असे अध्यक्ष संजय वाघ यांनी स्पष्ट केले आहे.

### 'दहावीनंतर करिअर कशात करायचं?'

**सटाणा :** दहावीनंतर विद्यार्थ्यांना पुढे करिअर कशात करायचं, हा मोठा प्रश्न पडलेला असतो. काही विद्यार्थ्यांनी त्यांना करिअर कशात करायचं आहे हे आधीच ठरवलेलं असतं. परंतु काही विद्यार्थी त्यांच्या करिअरबाबत संभ्रमात असतात. अशाच करिअरबाबत गोंधळलेल्या विद्यार्थ्यांसाठी श्रीशक्ती शैक्षणिक संस्था नाशिक संचलित येथील डिव्हाईन इंग्लिश मीडियम स्कूल अँण्ड ज्युनिअर कॉलेजने तालुक्यातील दहावीची परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांसाठी मोफत सायन्स फाउंडेशन कोर्सचे प्रशिक्षण वर्ग सुरू केले आहे. संस्थेचे सचिव दीपक सोनवणे, संस्थेचे विश्वस्त जे. डी. दातरे यांच्या अध्यक्षतेखाली कोर्सची सुरुवात करण्यात केली. यावेळी डिव्हाईन फार्मसीचे प्रा. विजयराज सोनवणे, डॉ. शिवराज जाधव, प्रा. काजल पानसरे आणि कोर्सचे इन्चार्ज सुरेन्द्रकुमार हांडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण वर्ग सुरू करण्यात आले आहेत. उपरोक्त कोर्समध्ये भौतिकशास्त्र, जीवशास्त्र, रसायनशास्त्र, गणित या विषयांसह जेईई, नीट व सीईटी परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन तसेच विद्यार्थी व पालकांसाठी समुपदेशन करण्यात येणार आहे. कोर्स ५ मे ते ३१ मेदरम्यान होणार आहे. तालुक्यातील विद्यार्थ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

### केआरटी महाविद्यालयाचा ८९.६९ टक्के निकाल

**वणी :** वणी महाविद्यालयाचा बारावी परीक्षेचा निकाल ८९.६९ टक्के लागला. कला, वाणिज्य व विज्ञान शाखा असलेल्या या महाविद्यालयात एकूण ४१५ विद्यार्थी परीक्षेत बसले होते. कला शाखेचा निकाल ८२.४१ टक्के लागला. त्यामध्ये प्रथम कुणाल महाले ८०.१७ टक्के, द्वितीय सुनील पवार ७२.१७ टक्के, तृतीय तृप्ती वाघेरे ७१.५० टक्के, चतुर्थ कार्तिक जाधव ६८.५०, पाचवा क्रमांक संस्कृती घुगे ६८.१७ टक्के. वाणिज्य शाखेचा निकाल ९७.७३ टक्के लागला. त्यामध्ये प्रथम आदिती निरगुडे ७६.८३ टक्के, द्वितीय हेमंत गायकवाड ७५.८३ टक्के, तृतीय सचिन गवळी ७३.५०, चतुर्थ मयूर जोपळे ६३.१७, पाचवा क्रमांक मोनिका गांगोडे ६२.१७ टक्के. विज्ञान शाखेचा निकाल ९९ टक्के लागला. त्यामध्ये प्रथम समीर ठाकरे ६४.८३, द्वितीय सानिका भोये ६२.१७, तृतीय अंजली थोरात ६१.१७, चतुर्थ ललिता हडस ६१, पाचवा क्रमांक सपना राऊत ६०.६७ टक्के तसेच किमान कौशल्य विभागाचा निकाल ६५ टक्के लागला. प्रथम क्रमांक निकिता जाधव ५६, द्वितीय कृष्णा गायकवाड ५५.५०, तृतीय साक्षी बर्डे ५२.५०, चतुर्थ चेतना राऊत ४९.८३, पाचवा अनिकेत जाधव ४९.३३, सदर विद्यार्थ्यांचे स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ॲड. विलास निरगुडे, राकेश थोरात, सतीश जाधव यांनी अभिनंदन केले.

### वणी येथे गुणवंत विद्यार्थी गुणगौरव सोहळा

**दिंडोरी :** नवोदय, एकलव्य, शिष्यवृत्ती परीक्षेत प्रावीण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा झाला. वीर बिरसा फाउंडेशन संचलित ज्ञानदीप अभ्यासिका वणी यांच्यामार्फत मिशन नवोदय, स्पर्धा परीक्षा पूर्वतयारी वर्ग आदी विनामूल्य उपक्रम सुरू आहेत. २०२१ पासून सुरू असलेल्या मिशन नवोदय स्पर्धा परीक्षा पूर्वतयारी या उपक्रमासाठी परिसरातील विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभागी होऊन, त्यात नवोदयसाठी ८, एकलव्यसाठी १३ आणि स्कॉलरशिपसाठी मुलांनी यश मिळविले. या यशस्वी विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते पुस्तक देऊन सन्मान करण्यात आला. नवोदयसाठी पात्र विद्यार्थ्यांमध्ये वैभव करंजखेड (२०२१), मनोज जोपळे (२०२२), आर्या जोपळे (२०२३), मनीष जोपळे (२०२३), तेजस्विनी झोटिंग (२०२३), तेजस चव्हाण (२०२४), रियांशू देवरे (२०२५), अनिकेत गांगुर्डे (२०२५). एकलव्य प्रवेश परीक्षेत निवड झालेले विद्यार्थी यात स्वप्नील कोकाटे, समीर डंबाळे, रवींद्र आहेर, मयूर जोपळे, रविना गावंढे, मयूर गायकवाड, द्रोण चौधरी, गणेश जोपळे, अथर्व चौधरी, वैभव पवार, जयप्रकाश गायकवाड, तन्वी गांगोडे, नूतन बागूल. इयत्ता पाचवी आठवी शिष्यवृत्ती यश मिळविलेले विद्यार्थी पूनम फुगट, अनुष्का पाटील, कोमल फुगट, वैष्णवी वाघमारे, साक्षी डंबाळे, सुरेखा गुबाडे, वैष्णवी बागूल, ललिता रौदळे, प्रगती गांगुर्डे, वनिता चौधरी, कोमल जोपळे, योगिता जोपळे, श्रेयस इंगळे, ओंकार भरसट. वरील सर्व विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते पुस्तक देऊन सन्मान करण्यात आला.

### 'शेतकऱ्यांची वीजजोडणी सुरळीत करा'



**दिंडोरी :** तालुक्यातील करंजवण धरण क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या वीज कनेक्शन कोणतेही कारण न सांगता कट केले जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. वीज कंपनीने शेतकऱ्यांची वीजजोडणी परत करून द्यावी व कनेक्शन तोडल्यास जिल्हाभर आंदोलन करण्यात येईल, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस(शरद पवार गट)चे जिल्हाध्यक्ष दत्तात्रय पाटील यांनी दिला. दिंडोरी परिसरात असलेल्या करंजवण धरण लाभक्षेत्रात अनेक शेतकरी पाणी भरत असतात. शेतकऱ्यांनी पाणी परवानग्या काढलेल्या आहेत, परंतु वीज कंपनीच्या मनमानी कारभारामुळे शेतकऱ्यांना पाणी भरता येत नाही. शेतकऱ्यांनी वीजबिल नियमित भरलेले आहे, परंतु पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी चुकीची माहिती दिल्याने वीज कंपनीचे अधिकारी व कर्मचारी शेतकऱ्यांना कोणतीही पूर्वसूचना न देता वीज कनेक्शन कट करीत आहेत. शेतकऱ्यांना आता दोन पैसे उन्हाळ्यात मिळण्याची चिंता असते. वीज कंपनीच्या आडमुठेपणामुळे आता शेतकऱ्यांना पाणी देता येत नाही. त्यात वीज कनेक्शन तोडल्याने अनेक अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे शेतकरी संतप्त झाला आहे.

# रस्ता मजबुतीकरण, रुंदीकरणाचे काम थांबवा

## रिपाइंतर्फे अपर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**मालेगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील सटाणा-अजमेर सौंदाणे-रावळगाव-अजंग-झोडगे या रस्त्याचे मजबुतीकरण आणि रुंदीकरण करण्याचे काम सुरू आहे. सदर प्रकल्पातील रस्ता रावळगाव हद्दीतून पंचशीलनगर येथील निवासी क्षेत्रातून जाणार असल्याने अनुसूचित जाती, जमाती, भटके विमुक्त आदी समाजातील नागरिकांची घरे पाडली जाणार आहेत. सदर काम त्वरित थांबवावे, अन्यथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियातर्फे तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा जिल्हाध्यक्ष प्रशांत गरुडे यांनी अपर जिल्हाधिकारी देवदत्त केकाण यांना दिलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे.

प्रकल्पाच्या रस्त्याचे काम वेगाने सुरू आहे. सदर रस्ता रावळगाव हद्दीतून पंचशीलनगर येथील निवासी क्षेत्रातून काढलेला आहे. या रहिवासी भागात सामान्य कुटुंबीय राहतात. पंचशीलनगर, रावळगाव येथील दलित वस्तीतील घरे ही नागरिकांच्या स्वतःच्या मालकीची व हक्काची आहेत. निवासी क्षेत्रात अनुसूचित जाती, जमाती, भटके विमुक्त आदी समाजातील नागरिक लोकवस्ती करून राहत आहेत. त्यांची घरे पाडून सदरचा रस्ता काढण्याचा सर्व्हे करण्यात आला आहे. घरे जमीनदोस्त करून असा कोणताही रस्ता शासनाला व तत्सम विभागाला काढता येत नाही. तसे झाल्यास संबंधित नागरिकांचा संसार उघड्यावर पडून त्यांचा पुनर्वसनाचा प्रश्न निर्माण होईल. शासनाने गंभीर दखल घेऊन सदर रस्त्याचा पुन्हा सर्व्हे करावा. प्रत्यक्ष पाहणी करून रस्त्याचा पर्यायी मार्ग काढावा. दलित मागासवर्गीय समाजावर कोणताही अन्याय होणार नाही. येथील दलित वस्तीला धक्का न लावता सदर प्रकल्पाचा रस्ता पाट संघ कॅनॉल रोडने बायपास करून काढावा, अन्यथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियातर्फे मोर्चा, धरणे आंदोलन, उपोषण केले जाईल.



# तेराव्याच्या दिवशी वृक्षलागवड करून आगळावेगळा उपक्रम

**नामपूर : वार्ताहर**

काकडगाव (ता. बागलाण) येथील प्रगतिशील शेतकरी कुटुंबातील जबनाताई पाटील यांचे वयाच्या १०१ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. सर्वच स्तरातील मान्यवरांनी कुटुंबीयांचे सांत्वन केले.

रविवार, ४ मे रोजी तेराव्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. जबनाताई पाटील यांचा जन्म इंग्रज काळात झाला होता. नामपूरसह पंचक्रोशीत त्यांच्या नावाचा आगळावेगळा ठसा होता. पाटील परिवाराने पारंपरिक रुढी-परंपराव्यतिरिक्त तेराव्याच्या दिवशी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते निंब, बदाम, आंबा ही झाडे लावली. या झाडांना नावाची पाटी बनवण्यात आली असून, भविष्यकाळात या झाडाचा फायदा गावातील नागरिकांना होणार आहे. मुबलक ऑक्सिजन उपलब्ध होण्यासाठी झाडे लागवड करणे काळाची गरज असून, समाजाने अशाच पद्धतीने माणसाच्या मृत्यूनंतर आठवण म्हणून झाडे लावली पाहिजे, असे आवाहन शेतकरी संघटनेचे माजी प्रदेशाध्यक्ष ज्येष्ठ नेते रामचंद पाटील, ज्येष्ठ नेते यशवंत बापू अहिरे, अभि नाना सोनवणे, किरण पाटील, प्रवीण अहिरे, शेलेंद्र कापडणीस, राजीव सावंत, प्रल्हाद अहिरे यांनी व्यक्त केले आहे. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# जलक्षमता वाढवण्यासाठी प्रस्ताव तयार करा

## आमदार कांदे : नांदगावला पाणीटंचाईसंदर्भात आढावा बैठक

**नांदगाव : प्रतिनिधी**

नांदगाव तालुक्यातील उपलब्ध जलसाठे, त्यातील क्षमता व शेतीसिंचनाच्या दृष्टीने संबंधित अधिकाऱ्यांसोबत आमदार सुहास कांदे यांनी मंगळवारी (दि. ६ ) आढावा बैठक आयोजित करत संभाव्य पाणीटंचाईवर मात करण्यासाठी उपाययोजना करण्याचे निर्देश संबंधित विभागाला दिले आहेत.

तालुक्यात दोनशेच्यावर पाझर तलाव, बंधारे, लहान-मोठे धरणे असून, त्यातील गाळ काढून आहे त्या ठिकाणची साठवण क्षमता वाढविण्यासाठी तातडीने प्रस्ताव तयार करा व तालुक्याला टँकरमुक्त करण्याच्या दिशेने प्रयत्न करावे, असे आवाहन आमदार सुहास कांदे यांनी या आढावा बैठकीदरम्यान केले.



पिण्याच्या पाण्याची समस्या काही प्रमाणात मार्गी लागली आहे. शेतकऱ्यांच्या शेतात सिंचनाचे पाणी पोहचावे याबाबतचा शब्द आमदार कांदे यांनी दिला होता. तो पूर्ण करण्यासाठी कालबद्ध नियोजनाचा भाग म्हणून मंगळवारी आमदार कांदे यांनी या आढावा बैठकीचे आयोजन केले होते. यावेळी आमदार कांदे यांनी तालुक्यातील उपलब्ध जलसाठे, त्यातील क्षमता याचा सांगोपांग आढावा घेतला. जलसंधारणाची कामे वाढविण्यासोबत गाळ काढण्याचा कृती आराखडा निश्चित करावा. त्यासाठी देवाज फाउंडेशनच्या माध्यमातून आर्थिक मदत देण्याचा शब्ददेखील त्यांनी यावेळी दिला.

शिवसेनेचे ज्येष्ठ नेते बापूसाहेब कवडे यांनी माणिकपुंज धरणामागील क्षेत्रात नव्या प्रकल्पाची आवश्यकता व्यक्त करताना यंत्रणेने अधिक सकारात्मक बघण्याची आवश्यकता व्यक्त केली. समाधान पाटील यांनी पांझण, मन्याड, शाखांबरी, लेंडी व अन्य लहान नद्यांचे संलग्नीकरण असलेला तालुका अंतर्गत नदीजोड प्रकल्प हाती घेण्याची मागणी केली. यावेळी तहसीलदार सुनील सौंदाणे, गटविकास अधिकारी श्रीकृष्ण पाठक, तालुका कृषी अधिकारी डबाळे, वनपरिक्षेत्र अधिकारी हेमंत कोकाटे, उपविभागीय जलसंधारण अधिकारी उपविभाग मालेगाव अंकिता वाघमारे, उपविभागीय जलसंधारण अधिकारी मृद व जलसंधारण उपविभाग मालेगाव उपअभियंता माणिकपुंज प्रकल्प नागासागा प्रकल्प, गिरणा धरण प्रकल्प सहाय्यक कार्यक्रम अधिकारी रोहयो नांदगाव तसेच याप्रसंगी ज्येष्ठ नेते प्रकाश कवडे, माजी आमदार संजय पवार, बाजार समिती संचालक एकनाथ सदगीर, अमोल नावंदर, सतीश बोरसे, किशोर लहाने, समाधान पाटील, प्रमोद भाबड, सागर हिरे, प्रकाश शिंदे, शरद सोनवणे, नितीन आहेर, ॲड. अमोल आहेर, भैयासाहेब पगार आदी उपस्थित होते.



### संबंधित लक्ष घालतील का?

**अभोणा :** गावातील ग्रामपालिका चौक ते सरदार पेठमध्ये जलजीवन मिशन योजनेंतर्गत पाइप टाकण्यासाठी साडेतीन फूट खोल चाऱ्या खोदल्या आहेत. त्यात जेसीबीने लोकांचे पाण्याचे पाइप फुटल्याने तीन दिवसांपासून घरांमध्ये पिण्यासाठी पाणी नाही. या कामाचे ठेकेदार जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप लोकांनी केला आहे. त्यातच सरदार पेठेत नवीन रस्त्यासाठी जुना रस्ता खोदून ठेवला आहे. ही कामे संथगतीने होत आहेत. त्यामुळे या पावसामुळे चाऱ्यांमध्ये पाणी तुंबले असून, अंगणातील झाडांच्या मुळा तुटल्याने धोका निर्माण झाला आहे.

# मनपाला प्रतीक्षा आयोगाच्या निर्देशाची

**नाशिक : प्रतिनिधी**

बहुप्रतीक्षित नाशिक महापालिका निवडणुकीचा मार्ग मंगळवारी (दि.६) सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर मार्गी लागल्यानंतर आता सर्वांच्या नजरा महापालिका प्रशासनाच्या तयारीकडे लागल्या आहेत. दरम्यान, राज्य निवडणूक आयोगाचे निवडणुकीसंदर्भात निर्देश येत नाहीत तोपर्यंत याप्रकरणी कामाची दिशा स्पष्ट होणार नाही, असे महापालिका प्रशासनाने म्हटले आहे.

दरम्यान, नाशिक महापालिकेची मुदत १३ मार्च २०२२ रोजी संपली आहे, तेव्हापासून प्रशासकीय राजवटीत शहराचा कारभार सुरू आहे.



नाशिक महापालिकेची सातवी पंचवार्षिक निवडणूक येत्या चार महिन्यांत होणार आहे. राज्य निवडणूक आयोगाचे पत्र महापालिकेला मिळताच सर्वांत प्रथम महापालिका प्रशासन प्रभागरचनेसंदर्भातील कार्यवाहीला सुरुवात करण्याची शक्यता आहे.

सन २०१७ च्या निवडणुकीत २९ प्रभागांत चार सदस्यीय, तर दोन प्रभागांत तीन सदस्यीय, असे एकूण ३१ प्रभाग होते. महाविकास आघाडीने प्रभागसंख्या ३१ वरून ४३ प्रभाग करण्यात येऊन नगरसेवकांची संख्यादेखील १२२ वरून १३३ पर्यंत वाढविण्यात आली. दरम्यान, महायुती सरकार येताच महाविकास आघाडीने तीन सदस्यीय प्रभाग व तयार केलेल्या प्रभागावर फुली मारली. मात्र, आता महापालिकेची निवडणूक २०१७ च्या प्रभागरचनेनुसार होणार का? याबाबत राजकीय पक्षांत खल सुरू आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार नगरसेवकांची संख्या वाढविण्याची शक्यता आहे. कोरोनामुळे जनगणना न झाल्याने शहरातील लोकसंख्यादरम्यानच्या काळात चार ते पाच लाखांनी वाढल्याचा अंदाज आहे. सन २०१७ च्या निवडणुकीवेळी एका प्रभागासाठी तीस ते बत्तीस हजारांची लोकसंख्या निश्चित करण्यात आली. मात्र, आता प्रभागासह सदस्यसंख्या वाढवणार का? याकडे सर्वपक्षीयांचे लक्ष लागले आहे. सर्वोच्च न्यायालयाने सन २०१७ प्रमाणेच ओबीसी आरक्षण कायम ठेवल्याने याचा राजकीय फायदा ओबीसी बांधवांना होणार आहे.

**प्रशासनाकडून हे काम होणार**

राज्य निवडणूक आयोगाकडून कामाबाबत सूचना मिळताच महापालिका प्रशासनाकडून मतदारयाद्या निश्चित केल्या जातील. यासोबतच प्रभागरचनेवरही काम केले जाईल.

# पुण्यात मॉकड्रिल

**पुणे : प्रतिनिधी**

केंद्र शासनाच्या निर्देशानुसार जिल्ह्यात विधानभवन, पुणे महानगरपालिका, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, वनाज औद्योगिक परिसर, तळेगाव, मुळशी या सहा ठिकाणी 'ऑपरेशन अभ्यास' अंतर्गत मॉकड्रिल घेण्यात आले. या सर्व ठिकाणी मॉकड्रिल यशस्वीपणे पार पडली, अशी माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली.

मॉकड्रिलमध्ये सर्व गोष्टींचा समावेश करण्यात आला होता. सुरुवातीला भोंगा वाजविण्यात आला. त्यानंतर कृत्रिम पद्धतीने स्फोट करण्यात आला. त्यानंतर अश्रुधुराच्या नळकांड्या फोडण्यात आल्या. याप्रसंगी परिसरातील इमारतीत काही लोक अडकले होते. त्यांना एनडीआरएफच्या मदतीने बाहेर काढण्यात आले. परिस्थितीचे गांभीर्य ओळखत आरोग्य विभाग, अग्निशमन दल व नागरी संरक्षण दल यांनी समन्वयाने काम केले. याअनुषंगाने सर्व उपाययोजनेत प्रतिसादाची वेळ योग्य होती. सर्व यंत्रणांनी तत्काळ प्रतिसाद दिला. आरोग्य यंत्रणेने आरोग्य सुविधा रुग्णवाहिका सेवा वेळेत उपलब्ध करून देण्याचे प्रात्यक्षिक दाखविले. अग्निशमन वाहनाने आपली जबाबदारी योग्य रीतीने पार पाडली. मॉकड्रिलची सर्व प्रक्रिया २५ ते ६० मिनिटांत पूर्ण करण्यात आली, असे ते म्हणाले.

ग्रामीण भागातील लोकांमध्ये या मॉकड्रिलद्वारे जनजागृती होण्यासाठी तेथील सरपंच, ग्रामसेवक व स्थानिक नागरिक यांनीही यात सहभाग घेतला.

## महत्त्वाचे



### सावाना बालभवन साने गुरुजी कथामालेतर्फे संस्कार शिबिर

**नाशिक :** सार्वजनिक वाचनालय नाशिक बालभवन साने गुरुजी कथामालेतर्फ स्वातंत्र्यसैनिक गो. ह. देशपांडे उद्यान वाचनालय, आकाशवाणी केंद्रासमोर, गंगापूर रोड, नाशिक येथे रोज सायंकाळी होणाऱ्या निःशुल्क संस्कार शिबिराचे उद्घाटन सावानाचे कार्याध्यक्ष संजय करंजकर यांच्या हस्ते झाले. बालभवनप्रमुख प्रेरणा बेळे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. १५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या शिबिरात विद्यार्थ्यांना नित्य स्तोत्र, श्लोक, प्राणायाम-योग, प्राचीन युद्धकलेची ओळख, हस्तकला, कॅलिग्राफी, हेरिटेज वॉक, विविध बोधकथा, नृत्य, गायन, पारंपरिक खेळ, वैज्ञानिक प्रयोग, बौद्धिक खुराक आणि धम्माल करायला मिळणार आहे. यावेळी सहाय्यक सचिव प्रा. सोमनाथ मुठाळ, ग्रंथसचिव देवदत्त जोशी, नाट्यगृह सचिव जयेश बर्वे, मंगेश मालपाठक, तसेच विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

### मविप्र जनता विद्यालयातील सर्व विद्यार्थी उत्तीर्ण

**मुखेड :** येवला तालुक्यातील मुखेड येथील मविप्र संचलित जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा यंदाही १००% निकाल लागला आहे. विज्ञान शाखेतील सर्व विद्यार्थी १२वी बोर्ड परीक्षेत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत. पैकी ज्ञानेश्वरी वाल्मीक चव्हाण ८९% गुणांसह प्रथम, तन्वी संतोष आहेर ८२.३३% द्वितीय, समृद्धी नारायण आहेर ८२% तृतीय, कीर्ती कृष्णराव आहेर ८१% चतुर्थ आणि आकांक्षा विक्रमराव आहेर ८०% गुणांसह पाचवा क्रमांक पटकावला आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मविप्र सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, उपाध्यक्ष विश्वास मोरे, चिटणीस दिलीप दळवी, उपसभापती देवराम मोगल, संचालक नंदकुमार बनकर व सर्व संचालक मंडळ, शिक्षणाधिकारी डॉ. भास्कर ढोके, डॉ. नितीन जाधव आदींनी अभिनंदन केले.

### राजर्षी शाहू महाराज यांची पुण्यतिथी साजरी

**पिंपळगाव बसवंत :** राजर्षी शाहू महाराज छत्रपती असूनदेखील त्यांनी रयतेच्या सामाजिक विकासाठी सातत्याने प्रयत्न केले. महत्त्वाचे म्हणजे शिक्षणाची गंगा अगदी तळागाळापर्यंत पोहचली पाहिजे, त्यांचे समाजाच्या सर्वांगीण विकासाठी केलेले कार्य आजही दिशादर्शक आहे, असे प्रतिपादन दिंडोरी लोकसभेचे खासदार भास्करराव भगरे यांनी केले. ते मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे कर्मवीर काकासाहेब वाघ पिंपळगाव बसवंत महाविद्यालयात छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांना पुण्यतिथीनिमित्ताने अभिवादन करण्यासाठी उपस्थित होते. यावेळी प्रतिमापूजन करण्यात आले. कार्यक्रमाला शिक्षक उपस्थित होते.

# जि.प. व पं.स.आरक्षण सोडतीकडे नजरा

**नाशिक :** तीन वर्षांहून अधिक काळापासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्यानंतर अखेर सर्वोच्च न्यायालयाने येत्या चार महिन्यांत निवडणुका घेण्याचे आदेश दिले आहेत. निवडणुकीला होत असलेला विलंब पाहता अनेकांनी आशा सोडून दिल्याचे चित्र होते तर अनेकजण चातकासारखी वाट पाहत होते. मात्र, आता न्यायालयाच्या आदेशामुळे इच्छुकांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. जिल्हा परिषदेचे ७२ गट व पंचायत समितीचे १४४ गण कायम राहतात की बदल होतो? याकडे सध्या इच्छुकांचे लक्ष आहे. प्रभागरचना आणि आरक्षण सोडत कशी निघते? यावर पुढील सर्व गणिते अवलंबून आहेत. ओबीसी आरक्षणासह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याच्या आदेशामुळे इच्छुकांच्या अपेक्षांना धुमारे फुटले आहेत. जिल्हा परिषदेत २२ मार्च २०२२ पासून प्रशासकीय राजवट सुरू आहे. गेल्या तीन वर्षांपासून सदस्य व पदाधिकारी नसल्याने ग्रामीण भागात राजकीय अनास्था निर्माण झाली. निवडणूक लढण्याची इच्छा असलेल्या नेत्यांचे न्यायालयाच्या निकालाकडे लक्ष लागून होते. अखेर मंगळवारी (दि.६) न्यायालयाने पुढील चार महिन्यांत निवडणुका घेण्याचे आदेश दिले. यापूर्वी जिल्हा परिषदेच्या गटांची आरक्षण सोडत २८ जुलै २०२२ ओबीसी आरक्षणासह जाहीर केली होती. नवीन गटरचनेनुसार जिल्ह्यात ८४ गट तयार करण्यात आले होते. राज्य निवडणूक आयोगाकडून गट व गण रचनेसंदर्भात काय आदेश येतात, यावर त्यांची रचना अवलंबून राहणार आहे. जुन्या पद्धतीने गटरचना ठेवल्यास जिल्ह्यात एकूण ७२ गट राहतील. ओझर येथे नगरपालिका अस्तित्वात आल्याने हा गट रद्द झाला आहे.

# पर्यटन व्यवसायांसाठी पोर्टलवर नोंदणी मोफत!

**नाशिक : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन संचालनालयाने पर्यटन व्यावसायिकांसाठी एक महत्त्वपूर्ण सुविधा उपलब्ध करून दिली आहे. 'mahabooking.com' हे नवे बुकिंग पोर्टल आता सुरू करण्यात आले असून, या पोर्टलवर पर्यटनाशी संबंधित सर्व व्यवसायांची मोफत नोंदणी करता येणार आहे.

या पोर्टलवर हॉटेल्स, कृषी पर्यटन केंद्रे, रिसॉर्ट्स, पर्यटन व्हिला, कन्व्हेन्शन व वेलनेस सेंटर, इको टुरिझम, गाइड, ट्रॅव्हल एजन्सी, निवास व न्याहारी सेवा, आर्ट अँड क्राफ्ट शॉप्स, खाद्यपदार्थ दुकाने आणि अशा विविध पर्यटन व्यावसायिकांना आपल्या व्यवसायाची माहिती व फोटो अपलोड करता येतील.

**पोर्टलची वैशिष्ट्ये**

पर्यटकांना एकाच ठिकाणी विविध सेवा आणि उत्पादने पाहण्याची व बुकिंग करण्याची सोय व्यावसायिकांसाठी एक व्यापक व्यासपीठ नोंदणी पूर्णतः मोफत पर्यटन संचालनालय, नाशिकमार्फत सर्व पर्यटन व्यावसायिकांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी आपल्या व्यवसायाची त्वरित नोंदणी या पोर्टलवर करावी.

ही नोंदणी भविष्यातील संधींचा फायदा घेण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. अधिक माहितीसाठी उपसंचालक कार्यालय, पर्यटन भवन, शासकीय विश्रामगृह आवार, गोल्फ क्लब मैदान, नाशिक येथे संपर्क करावा.

# आपत्तीच्या संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी समन्वयाने काम करा

## राजेंद्र वाघ : मॉन्सूनपूर्व आढावा बैठक



**नाशिक : प्रतिनिधी**

पावसाळ्यातील आपत्तीच्या संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करण्याच्या सूचना निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र वाघ यांनी सर्व प्रशासकीय यंत्रणेला काल दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात काल मॉन्सूनपूर्व आढावा बैठक निवासी उपजिल्हाधिकारी श्री. वाघ यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यावेळी श्री. वाघ बोलत होते. या बैठकीस जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अर्जुन गुंडे, नाशिक पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता सोनल शहाणे यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते. तसेच दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे तहसीलदार व गटविकास अधिकारी उपस्थित होते.

निवासी उपजिल्हाधिकारी श्री. वाघ म्हणाले की, महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायतीने मॉन्सूनपूर्व रस्ता दुरुस्ती, गटार व नालेसफाई, विद्युत दुरुस्तीची कामे वेळेत पूर्ण करीत नियंत्रण कक्ष त्वरित स्थापन करावेत. पर्यटनस्थळांवरील धोकादायक ठिकाणांची निश्चिती करून त्या ठिकाणी सूचनाफलक लावण्यात यावेत. उपविभागीय अधिकारी तसेच सर्व तहसीलदारांनी पूरक्षेत्रात असणाऱ्या गावांची यादी तयार करून ठेवावी. पाटबंधारे विभागाने पाणी सोडण्याचा संदेश गावपातळीवर देण्यात यावा. कार्यकारी अभियंता आणि तहसीलदार यांनी संयुक्तपणे लघु व मध्यम प्रकल्पाची पाहणी करून आवश्यकता असल्यास कार्यकारी अभियंता यांनी तत्काळ दुरुस्ती करून घ्यावी. रस्त्याच्या दुतर्फा असलेली धोकादायक झाडे व झाडाच्या फांद्यांबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.

पाटबंधारे विभागाने दैनंदिन पाणीसाठा, विसर्ग, पर्जन्यमान आदी माहिती जिल्हा नियंत्रण कक्षास पाठवावी. महावितरणने विद्युत वाहिन्यांचे आवश्यक कामे पूर्ण करून पाणीपुरवठा योजना, नगरपालिकेच्या क्षेत्रातील वीजपुरवठा मॉन्सून काळात खंडित न करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी सर्व संबंधित यंत्रणेला दिल्या.

यावेळी पाटबंधारे विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद आरोग्य विभागांनी मॉन्सूनपूर्व आराखडा सादर करण्यात आला.

# मालेगाव तालुक्यात वादळी वाऱ्यामुळे शेतीचे नुकसान

**मालेगाव : प्रतिनिधी**

| गावाचे नाव | बाधित शेतकरी संख्या | शेवगा (हे.) | कांदा (हे.) | डाळिंब (हे.) | लिंबू (हे.) | केळी (हे.) | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| कळवाडी | १५ | - | - | - | ५ | - | ५ |
| नरडाणे | ९८ | ५ | १० | २४ | - | १० | ४९ |
| उंबरधे | १६ | - | ५ | - | - | ५ | १० |
| दापूर | १५ | - | १० | - | - | - | १० |
| पिंपळगाव | १ | - | - | १ | - | - | १ |
| | १४५ | ५ | २५ | २५ | ५ | १५ | ७५ |

शहर व तालुक्यात गेल्या दोन दिवसांपासून वादळी वाऱ्यासह पावसाने हजेरी लावली. वादळी व सोसाट्याच्या वाऱ्यामुळे तालुक्यातील पाच गावांतील १४५ शेतकऱ्यांचे ७५ हेक्टर क्षेत्रावरील शेतीपिकांचे नुकसान झाले असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. या नुकसानग्रस्त शेतीपिकांचे कृषी विभागामार्फत पंचनामे केले जात असल्याची माहिती तालुका कृषी अधिकारी भगवान गोर्डे यांनी दिली.

गेल्या दोन दिवसांपासून तालुका परिसरात ढगाळ वातावण होते. गत सप्ताहात ४३ अंशांपर्यंत पोहोचलेले तापमान काहीसे कमी झाले होते. याचदरम्यान परिसरात अचानक ढगाळ व पावसाळी वातावरणाची निर्मिती झाली. त्यातच मंगळवारी (दि.६) दुपारी वादळी व सोसाट्याचा वारा आला. या वादळी वाऱ्यामुळे तालुक्यातील कळवाडी, नरडाणे, उंबरदे, दापुरे व पिंपळगाव या पाच गावांतील १४५ शेतकऱ्यांचे ७५ हेक्टर क्षेत्रावरील शेतीपिकांचे नुकसान झाले. नरडाणेत सर्वाधिक ९८ शेतकऱ्यांच्या शेतीपिकांचे नुकसान झाले आहे. यात शेवगा, कांदा, लिंबू व केळी बागेचा समावेश आहे. या नुकसानग्रस्त शेतीपिकांची कृषी विभागाने पाहणी करून पंचनामे सुरू केले आहेत. अनेक ठिकाणी डाळिंबबागांवरील साडी व कपड्यांची आच्छादने उडाली आहेत. त्याचप्रमाणे फळबागा, नेटशेडचे नुकसान झाले. ग्रामीण भागासह शहरात वृक्ष उन्मळून पडले. त्यातच वीजतारा तुटल्याने अनेक ठिकाणी वीजपुरवठा खंडित झाला होता. शहरातील खलील हायस्कूलची कुंपण भिंत कोसळल्याने म्हैस दगावली. त्याचप्रमाणे भिंतीजवळ उभ्या असलेल्या चारचाकी, रिक्षा व अन्य वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. बुधवारी (दि.७) दुपारी शहरात पावसाने अर्धा तास जोरदार हजेरी लावली. यामुळे कामानिमित्ताने घराबाहेर असणाऱ्या नागरिकांची एकच धांदल उडाली. पावसाने उकाडा कमी झाला.



### होरायझन अकॅडमीत महाराष्ट्र दिन

**नाशिक :** मराठा विद्या प्रसारक समाजाच्या मखमलाबाद येथील होरायझन अकॅडमीमध्ये महाराष्ट्र दिन व आंतरराष्ट्रीय कामगार दिन मोठ्या देशभक्तिपूर्ण आणि सांस्कृतिक वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ७.३० वाजता अतिथींच्या स्वागताने आणि दीपप्रज्वलन सोहळ्याने झाली. त्यानंतर ध्वजारोहण करण्यात आले.

महाराष्ट्र शासन
शिक्षणाधिकारी (माध्यमिक) कार्यालय, जिल्हा परिषद, नाशिक
नवीन प्रशासकीय इमारत, जिल्हा परिषद, त्र्यंबक नाका, नाशिक- ४२२००१
जा.क्र. जिपन/टीचिंग/माय-५/२३७७/२०२५

**जाहीर नोटीस**

दि.०७/०५/२०२५

शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी महाराष्ट्र राज्य स्वयंअर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम-२०१२ व नियम २०२० अंतर्गत नवीन शाळा मान्यता व विद्यमान शाळांचे दर्जावाढ करण्याबाबतचे प्रस्तावांबाबत छाननी समितीव्दारे दि.२८.०४.२०२५ रोजी झालेल्या राज्यस्तरिय प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये छाननी करून नाशिक जिल्ह्यातील

**१) एकसंघ सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा व सांस्कृतिक मंडळ, सिडको, नाशिक संचलित दियान युनिव्हर्सल स्कूल, ओझर,ता.निफाड, जि.नाशिक सीबीएसई नवीन शाळा इ.१ ली ते इ.१० वी**

संस्थेच्या शाळेला मान्यता पत्र देण्यासाठी राज्यस्तरीय प्राधिकरणाद्वारे शिफारस करण्यात आली आहे. सदर शिफारस महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ मधील तरतुदीनुसार करण्यात आली आहे. सदर शिफारसपात्र शाळेची यादी **www.mahasfs.org/www.education.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात आली आहे. वरील शिफारस प्राप्त संस्थेद्वारा संचालित स्वयंअर्थसहाय्यित शाळेबाबत हरकती व सूचना असल्यास वृत्त प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसापर्यंत सदस्य सचिव, क्षेत्रस्तरीय प्राधिकरण, तथा उपशिक्षणाधिकारी, (माध्यमिक) नवीन प्रशासकीय इमारत, जिल्हा परिषद, त्र्यंबक नाका, नाशिक ४२२००१. यांचेकडेनोंदवाव्यात. यानंतर येणाऱ्या हरकती व सूचना यांचा विचार केला जाणार नाही.

**प्रवीण पाटील, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नाशिक**

प्रोसेस जमा **जाहीर नोटीस** नि.क्र.६
दि.की.अ.नं.७/२०२५ ॲड.आर.टी.चव्हाण
**पिंपळगाव बसवंत येथील दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर**
(मे.पी.डी.कोळेकर साहेब)यांचे न्यायालयात ...

**श्री.धनंजय रमेश मराठे** )
रा.यशोधरा अपार्टमेंट, चिंचखेड रोड, ) **अर्जदार**
पिंपळगाव बसवंत, ता.निफाड, जि.नाशिक )
**विरूध्द**
१) **श्रीमती राधिका रमेश मराठे** )
२) **सौ.शोभा लहुकुमार डफळे** )
३) **श्री.अरविंद रमेश मराठे** ) **सामनेवाले**
४) **श्री.विनोद रमेश मराठे** )
सर्व रा.यशोधरा अपार्टमेंट. चिंचखेड रोड, )
पिंपळगाव बसवंत, ता.निफाड, जि.नाशिक. )

**अर्ज :- इंडियन सक्शेशन ॲक्ट ३७२ अन्वये वारस दाखला मिळणेबाबत**

ज्याअर्थी सामनेवाले नं.१ ही अर्जदार व सामनेवाले नं.२ ते ४ यांची जनक आई असुन सामनेवाले नं.१ हिचे पती व सामनेवाले नं. २ ते ४ व अर्जदार यांचे वडील **रमेश रामदास मराठे** यांचे दिनांक २४/०४/२०२१ रोजी निधन झालेले आहे. मयत रमेश रामदास मराठे यांना अर्जदार व सामनेवाले १ ते ४ हेच कायदेशीर वारस असून मयत रमेश रामदास मराठे यांचे **युको बँक शाखा पिंपळगांव बसवंत** येथे अनुक्रमे ....
अ) sb a/c 22240110001226 - Rs.1,38,278.88 + int.
ब) SCSS (Senior citizen saving scheme) Rs.1,00,000 + int.
असुन अर्जदारांने संबंधित मयताचे वारस म्हणून बँकेकडे रक्कमेची मागणी केली असता संबंधित बँकेने मे.न्यायालयाकडून वारस दाखला आणण्यास अर्जदारास सांगितल्याने अर्जदारांनी वारस दाखला मिळण्यासाठी सदरचा दि.चौ.अर्ज क्र.०७/२०२५ मे. न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी, या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदरचे अर्जास कोणाचीही काही एक हरकत असल्यास त्यांनी या न्यायालयात **दि.२१/०६/२०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता** अथवा तत्पुर्वी स्वत: अथवा वकीलांचे मार्फत हजर राहून योग्य ती हरकत नोंदवावी. मुदतीत हरकत न आल्यास मे.न्यायालयात वारस दाखला देणे बाबत योग्य ते आदेश करतील. सदरची नोटीस प्रसिध्द करणेकामी आज दि.६/५/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

सही/- **कनिष्ठ लिपिक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय
पिंपळगाव बसवंत
ता.निफाड, जि.नाशिक

कोर्टाचा शिक्का

सही/- **सहायक अधिक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय
पिंपळगाव बसवंत
ता.निफाड, जि.नाशिक

### शिवाजी महाराज विद्यालयाच्या विज्ञान विभागाचा १०० टक्के निकाल

**खेडगाव :** नाशिक येथील खेडगावातील मविप्र संचलित छत्रपती शिवाजी महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विज्ञान शाखेतील सर्व विद्यार्थी १२ वीच्या परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत. तर कॉमर्स आणि आर्ट्स शाखेचा अनुक्रमे ९६% आणि ९१% निकाल लागला. तनुजा भास्कर मोरे ७४% गुणांसह विज्ञान शाखेतून तर रोहिणी देवचंद जोगरे (७३%) कला शाखेतून, राणी संजय शिंदे (६९%) वाणिज्य शाखेतून प्रथम आले.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मविप्र सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, उपाध्यक्ष विश्वास मोरे, चिटणीस दिलीप दळवी, उपसभापती देवराम मोगल, संचालक प्रवीणनाना जाधव व सर्व संचालक मंडळ, शिक्षणाधिकारी डॉ. भास्कर ढोके, डॉ. नितीन जाधव आदींनी अभिनंदन केले.

# नाशिकरोडला तब्बल तेरा तास बत्ती गुल

**नाशिकरोड : प्रतिनिधी**

मंगळवारी दुपारनंतर नाशिकरोड परिसरात आलेल्या वादळी वाऱ्याच्या पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले. तब्बल तेरा तासांपेक्षा अधिक काळ वीजपुरवठा खंडित राहिल्याने नागरिक आणि व्यापाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. या विघ्नाची झळ बुधवारीही जाणवली, कारण दिवसभर विजेचा लपंडाव सुरूच होता.

गेल्या काही दिवसांपासून नागरिक उष्म्याने हैराण झाले होते, मात्र मंगळवारी दुपारी तीन ते सव्वातीन वाजेच्या सुमारास अचानकपणे अवकाळी पावसाला सुरुवात झाली. यादरम्यान नाशिकरोड परिसरातील वीजपुरवठा खंडित झाला होता. दुपारी साडेतीन वाजता खंडित झालेला वीजपुरवठा तब्बल तीन तासांनंतर सुरळीत झाला. मात्र, त्यानंतर रात्री सव्वानऊ वाजेच्या सुमारास पुन्हा सोसाट्याचा वारा व वादळी पावसाला सुरुवात झाल्याने वीजपुरवठा खंडित झाला, मात्र त्यानंतर वीजपुरवठा सुरळीत होण्यास तब्बल सात तासांचा कालावधी लागला तर काही ठिकाणी सकाळी सात वाजता वीजपुरवठा सुरळीत झाला. दरम्यान, यामुळे सर्वसामान्य नागरिक व व्यापाऱ्यांना मोठे हाल सहन करावे लागले.

**पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरती जाहिरात**

महाराजा यशवंतराव होळकर शिक्षण प्रसारक मंडळ कोंढार, ता. नांदगाव, जि. नाशिक संचलित (272008SC005) मा. आण्णासाहेब हाके माध्यमिक विद्यालय कोंढार, ता. नांदगाव या १०० टक्के अनुदानित विद्यालयात खालील प्रमाणे रिक्त पदावर पवित्र प्रणाली मार्फत शिक्षण सेवक नेमणे आहे.

| अ.क्र. | माध्यम | पद | अनुदान प्रकार | विषय | व्यावसायिक पात्रता | TET/CTET | पद संख्या | वेतन श्रेणी | आरक्षण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मराठी | अपदवीधर शिक्षण सेवक | अनुदानित | सर्व विषय | Diploma | TET Paper 1/ CTET Paper -1 | १ | शासकीय नियमाप्रमाणे | अनु.जाती - ०१ इ.मा.व. - ०१ |
| २ | मराठी | पदवीधर शिक्षण सेवक | अनुदानित | गणित | Diploma/ Graduation | TET Paper 2/ CTET Paper -2 | १ | | |

अभियोग्यता व बुद्धीमत्ता चाचणी - २०२२ (TAIT) दिलेल्या व पवित्र प्रणालीवर वैयक्तीक माहिती प्रमाणित केलेल्या जाहिरातीत नमूद आरक्षण व विहीत शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांनी पवित्र पोर्टलवर दिलेल्या सुचनेनुसार ऑनलाईन अर्ज करावे.
(संकेतस्थळ : **mahateacherrecruitment.org.in**)
**टीप :-** सदर भरती ही पवित्र प्रणाली मार्फत असल्याने, संस्थेकडे कोणीही परस्पर अर्ज करू नये.

**अध्यक्ष,**
महाराजा यशवंतराव होळकर शिक्षण प्रसारक मंडळ, कोंढार, ता. नांदगाव, जि. नाशिक

**दस्त गहाळ झालेबाबत जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,
**मिळकतीचे वर्णन :-** तुकडी जिल्हा नाशिक, पोटतुकडी **तालुका मालेगांव** पैकी **मौजे संगमेश्वर** शिवारातील **सिटी सर्व्हे नं.५२९** यांसी एकूण **क्षेत्र ३७-६० चौ.मी. पैकी १५-०० चौ.मी.** व त्यावरील **बांधकाम** यांसी **क्षेत्र १२-०० चौ.मी.** व **सिटी सर्व्हे नं.५३०** यांसी एकूण **क्षेत्र ३८-५ चौ.मी. पैकी १२-३३ चौ.मी.** ही मिळकत यांसी चतु:सिमा रेकॉर्ड ऑफ राईटसप्रमाणे

उपरोक्त नमुद केलेल्या मिळकती आजरोजी **श्री.देविदास सुभाष मोरे** यांचे खरेदी मालकीच्या व प्रत्यक्ष कबजेउपभोगातील आहेत. सदर मिळकतींचे पुर्वाश्रमिचे मालक **जानकाबाई शंकर मोरे** यांचे लाभातील .....

अ) **दिनांक २६/०५/१९९३** रोजी मे.दुय्यम निबंधक सो.मालेगांव-१ यांचे कार्यालयात नोंदविलेले **खरेदीखत** यांसी **दस्त क्र.१८३२/१९९३** हा दस्त

ब) **दिनांक ३/८/२०१८** रोजी मे.दुय्यम निबंधक सो.मालेगांव-१ यांचे कार्यालयात **दि मालेगांव मर्चन्टस् को.ऑप.बँक लि.मालेगांव** यांनी नोंदवुन दिलेला **गहाणमुक्त लेख** यांसी **दस्त क्र. ३७१५/२०१८** हा दस्त.

अशा उपरोक्त नमुद **दोन्ही दस्तांच्या मुळप्रती व नोंदणी पावत्या मिळकत मालक यांचेकडून मालेगांव परिसरात हरविल्या/गहाळ झालेल्या आहेत** व शोध घेतला असता सापडुन आलेल्या नाहीत. मिळकत मालक यांनी उपरोक्त मिळकती निर्वेध व बोजारहीत असल्याचे सांगुन सदर दस्तांचा कोणत्याही प्रकारे गैरवापर केला नसल्याचे खात्रीशीरपणे सांगितले आहे. तत्राप, उपरोक्त नमुद मिळकतींचे मालकी हक्क व निर्वेधपणाबाबत कोणास काहीही हरकत/तक्रार असल्यास अगर उपरोक्त दस्तांची व नोंदणी पावत्यांच्या मुळ प्रती कोणासही सापडुन/मिळुन आल्यास त्यांनी कृपया खालील पत्त्यावर **०७ दिवसांचे आत** संपर्क साधावा. कळावे, ही दस्त गहाळ झालेबाबतची जाहीर नोटीस. नाशिक. दिनांक ७/५/२०२५.

**समीर चंद्रशेखर रत्नपारखी**, ॲडव्होकेट
ऑफीस नं.३१०, सारडा संकुल, एम.जी.रोड, नाशिक. मो.९६२३१९३७८५, ९१७५७२६५२९

# मुख्यमंत्री १०० दिवस कार्यक्रमात जि.प.ची सर्वोत्कृष्ट कामगिरी

## सीईओ आशिमा मित्तल यांचा गौरव




**नाशिक : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेल्या मुख्यमंत्री १०० दिवस सुधारणा कार्यक्रमांतर्गत नाशिक जिल्हा परिषदेने राज्यात तिसरा क्रमांक प्राप्त केला आहे. या सर्वोत्कृष्ट कामगिरीसाठी काल मंत्रालय, मुंबई येथे सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता.

या सोहळ्यात राज्याचे मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अपर मुख्य सचिव राजेश कुमार यांच्या हस्ते जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांचा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

नाशिक जिल्हा परिषदेने मुख्यमंत्री १०० दिवस अभियानांतर्गत कार्यालयीन सुधारणांसह विविध डिजिटल व नावीन्यपूर्ण उपाययोजना राबवून प्रशासकीय यंत्रणेतील पारदर्शकता, कार्यक्षमता आणि लोकाभिमुखता यामध्ये विशेष कामगिरी केल्याने जिल्हा परिषद प्रशासनाचे कामकाज अधिक गतिमान झाले आहे. जलजीवन मिशन अंतर्गत सुरू करण्यात आलेल्या ॲपद्वारे ग्रामस्थांच्या पाणीपुरवठ्याशी संबंधित तक्रारींचे ऑनलाइन आणि त्वरित निराकरण शक्य झाले आहे. जिल्हा परिषदेच्या वतीने जिल्हा परिषदेच्या वतीने वापरात नसलेल्या जुन्या १७ वाहनांचे निर्लेखन करण्यात आले. ४ लक्ष ५८ हजार ५०० रुपये जिल्हा परिषदेस प्राप्त झाले. जिल्हा परिषद सेवेत असताना मृत झालेल्या अधिकारी व कर्मचारी यांच्या वारसांसाठी अनुकंपा तत्त्वावर नोकरीचा लाभ देण्यासाठी जिल्हा परिषदेच्या वतीने अनुकंपा ॲप तयार करण्यात आले. यामुळे दिवंगत कर्मचाऱ्यांच्या वारसांना शासकीय कार्यालयांच्या फेऱ्या माराव्या लागणार नसून, अनुकंपा अर्ज ते नियुक्तीपर्यंतचा प्रवास गतिमान झाला आहे. पशुवैद्यकीय सेवांचे व्यवस्थापन पेपरलेस झाले आहे. पेसा ग्रामपंचायतींमध्ये पारदर्शक कारभार सुनिश्चित करण्यासाठी पेसा ॲप विकसित करण्यात आले. या प्रणालीमुळे जिल्हा परिषदेच्या विविध विकासकामांमध्ये गती आणि पारदर्शकता आली आहे. ई-ऑफिस प्रणालीच्या अंमलबजावणीमुळे प्रशासकीय कार्यक्षमता वाढली आहे. केंद्र शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी होऊन निर्धारित उद्दिष्टे गाठण्यात नाशिक जिल्हा परिषदेला यश आले आहे. अंगणवाडी केंद्रांचे १०० टक्के विद्युतीकरण पूर्ण करून त्या केंद्रांचे आधुनिकीकरण करण्यात आले आहे. सीएसआर (कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व) आणि स्वयंसेवी संस्थांचा सहभाग वाढवून विकासप्रक्रियेत समाजाचा थेट सहभागास चालना देण्यात आली आहे. या उपक्रमांमुळे जिल्हा परिषदेच्या कामकाजात पारदर्शकता, कार्यक्षमता आणि नागरिकांशी सुसंवाद मोठ्या प्रमाणात वाढलेला असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी सांगितले.

# कॉँक्रिटीकरणाच्या कामात झाडांची मुळे उघडी

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

प्रभाग क्रमांक २६ मधील खुटवडनगर येथे सुरू असलेल्या रस्ता कॉँक्रिटीकरणाच्या कामात ठेकेदाराने निष्काळजीपणा दाखवत झाडांची मुळे उघडी ठेवल्यामुळे नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. यासंदर्भात पर्यावरणप्रेमी व स्थानिक रहिवासी सुमित शर्मा यांनी विभागीय अधिकारी आणि उद्यान निरीक्षक, मनपा सातपूर यांच्याकडे तक्रार दाखल केली आहे.

शर्मा यांच्या तक्रारीनुसार, संबंधित ठेकेदाराने जाणूनबुजून झाडांच्या मुळ्या उघड्या ठेवल्या आहेत. पावसाळा जवळ आल्याने या मुळ्या पाण्यामुळे सडून झाडे कोसळण्याची शक्यता आहे. त्यामुळे अपघात होण्याचा धोका निर्माण झाला आहे. यामागे रस्ता रुंदीकरणाच्या नावाखाली झाडे आपोआप पडल्याचे दाखवून तोडण्याचा डाव असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

या प्रकारामुळे परिसरातील पर्यावरणाची हानी होण्याची शक्यता असून, झाड कोसळून नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होऊ शकतो. यासंबंधी प्रशासनाने तत्काळ लक्ष घालून उघड्या मुळ्या योग्य प्रकारे बुजवाव्यात आणि संबंधित ठेकेदारावर जबाबदारी निश्चित करून गुन्हा दाखल करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

शर्मा यांनी याबाबत एक निवेदनही दिले असून, या प्रकारावर तातडीने कारवाई झाली नाही तर परिसरातील नागरिकांच्या सहकार्याने आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. प्रशासनाकडून लवकरच कारवाई होण्याची अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.



# तपोवनासह नंदिनी, वालदेवी नदीवर पूल

## दोनच वर्षांचा अवधी असल्याने प्रशासनाची घाई

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्यासाठीचा सिंहस्थ आराखडा मंजूर होत नसल्याने दोन वर्षांवर सिंहस्थ असताना कामे होणार कशी, असा प्रश्न महापालिकेला पडला आहे. मात्र, जास्त वेळ न घालवता महापालिका प्रशासनाने थेट आपल्या स्वनिधीतून सिंहस्थ कामाला हात घालत बुधवारी (दि.७) महत्त्वाच्या कामांना मंजुरी दिली आहे. यात तपोवन पूल, मिलिंदनगर येथे नंदिनी नदीवर पूल, वडनेर दुमाला येथे वालदेवी नदीवर पूल उभारणे यांसह संत गाडगे महाराज पुलाचे रुंदीकरण आदी कामे केली जाणार आहेत.

महापालिका आयुक्त मनीषा खत्री यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी (दि.७) झालेल्या महासभेत सिंहस्थाच्या दृष्टीने अति महत्त्व असलेल्या कामांना मंजुरी देण्यात आली. संत गाडगे महाराज पुलाचे रुंदीकरण केले जाणार आहे. हा पूल अतिशय जुना झाला असून, सन १९५६-५७ मध्ये बांधण्यात आलेला आहे. या पुलाचे पिलर हे दगडी बांधकामात करण्यात आलेले आहेत. पुलाचे पिलरचे बांधकाम पुराच्या पाण्यामुळे कमकुवत होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पुलाचे रेलिंग व स्लॅबचा काही भाग कमकुवत झाला आहे. बऱ्याच ठिकाणी स्टील उघडे झाले आहे. त्यामुळे भविष्यात पुलाच्या स्थैर्याला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. सिंहस्थ कुंभमेळ्यात होणाऱ्या गर्दीचा विचार करता, पुलाचे रुंदीकरण व मजबुतीकरण करणे आवश्यक आहे. ते पाहता पुलाचे रुंदीकरण, मजबुतीकरण व सौंदर्यीकरण केले जाईल. त्यासाठी ११ कोटी ३५ लाख ११ हजार रुपये खर्च येणार आहे. गोदावरी नदीवरील संत गाडगे महाराज पूल हा नाशिक सिंहस्थ कुंभमेळ्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा आहे.

शाही पर्वणीच्या वेळी साधू-महंतांची मिरवणूक या पुलाखालून जाते. परंतु या पुलाची उंची ही जमिनीपासून कमी असल्यामुळे मिरवणूक मार्गात मोठ्या प्रमाणात अडचणी निर्माण होतात. श्रीराम रथ किंवा इतर उंच वाहने जाण्यासाठी याठिकाणी दरवेळी खड्डा करून रस्ता करावा लागतो. त्यासाठी आता पुलाच्या पंचवटीकडील पश्चिम बाजूने नवीन रॅम्प केला जाणार आहे. संत गाडगे महाराज पुलालगत अर्धगोलाकार रॅम्पसाठी पाच कोटी ८५ लाख रुपये खर्च आहे. वडनेर दुमाला येथे वालदेवी नदीवरील अस्तित्वातील सात मीटर रुंदीच्या पुलाला समांतर पूल उभारला जाणार आहे.

### मिलिंदनगर येथे नव्याने पूल

नवीन नाशिकला जोडणारा मिलिंदनगर येथील नंदिनी नदीवरील पूल सिंहस्थ कुंभमेळ्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा आहे. या पुलावर सद्यःस्थितीत मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते. या पुलावरून सिंहस्थ काळात व वर्षभर मोठ्या प्रमाणात नागरिक, भाविक व पर्यटक ये-जा करणार आहेत. पुरात बुडणारा पूल असल्याने याठिकाणी नवा पूल उभारला जाईल.




# भाजपचा शंभर प्लसच्या आडून स्वबळाचा नारा!

## महायुतीत आतापासूनच धुसफूस?

**नाशिक : प्रतिनिधी**

ओबीसी आरक्षण कायम ठेवत महापालिका निवडणुका चार महिन्यांत घ्या, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतर सर्व पक्षांत घडामोडी सुरू झाल्या आहेत. २०१७ मध्ये स्वबळावर निवडणूक लढणारे भाजप, शिवसेना पुन्हा एकदा स्वतंत्रपणे नाशिक महापालिकेची निवडणूक लढणार का? याकडे दोन्ही पक्षांतील पदाधिकारी, कार्यकर्त्यांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, भाजप शहराध्यक्ष प्रशांत जाधव यांनी लागलीच महापालिकेत भाजपचीच सत्ता येणार असल्याचा दावा करून शंभर प्लसचा नारा देऊन टाकला आहे. जाधव यांच्या दाव्यावरून शिवसेना शिंदे गटात खदखद सुरू झाली आहे. त्यांनीही शिवसेना स्वबळावर लढून आमची ताकद दाखवून देऊ, असा इशारा भाजपला दिला आहे.

शिवसेनेत घडलेल्या बंडखोरीचा फटका शिवसेनेचा बालेकिल्ला असलेल्या नाशिकला बसला. महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते अजय बोरस्ते यांच्यासह १३ माजी नगरसेवकांनी एकाचवेळी शिवसेना ठाकरे गटाला धक्का देत एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिंदे गटात प्रवेश केला. महापालिका निवडणुकीत सत्ताधारी पक्षात असल्याने राजकीयदृष्ट्या फायदेशीर ठरेल, या उद्देशाने अनेकांनी शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला. दरम्यान, महापालिका निवडणुकीची घोषणा होत नसल्याने भाजप, शिवसेना शिंदे गट, ठाकरे गट यांसह सर्व पक्षांच्या पदाधिकाऱ्यांच्या नजरा निवडणुकीकडे लागल्या होत्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अहिल्यानगर येथील मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महायुतीत लढणार असल्याचे वक्तव्य केले. पण काही ठिकाणी स्थानिक स्तरावरील पदाधिकाऱ्यांच्या भावना पाहून तेथे वेगळा निर्णय घेतला जाईल. दरम्यान, नाशिक महापालिकेत भाजप पदाधिकारी स्वबळासाठीच आग्रही असल्याचे दिसते. गतवेळी ६५ जागा जिंकून एकहाती महापालिका काबीज करणाऱ्या भाजपला पुन्हा सत्तेचे डोहाळे लागले आहेत.

यावेळी थेट शंभर प्लसचा नारा दिला आहे. महापालिकेतील सदस्यसंख्या १२२ आहे अन् भाजप शंभर प्लसचा नारा देत असल्याने महापालिकेची निवडणूक स्वबळावरच हवी असल्याचे कृतीतून दिसते. जर महायुतीत निवडणूक लढण्याची मानसिकता भाजपची असेल तर त्यांच्याकडून शंभर प्लसचा नारा का दिला जातो आहे, हा कोणालाही पडणारा प्रश्न आहे. एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या पक्षातील माजी नगरसेवकांना प्रभाग विकासनिधी देऊन भाजपच्या माजी नगरसेवकांची नाराजी ओढावून घेतली होती. विकास निधीत भेदभावावरून भाजपच्या वरिष्ठांकडे याबाबतची नाराजीदेखील बोलून दाखवली होती, परंतु त्यावेळी एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असल्याने आणि भाजपला त्यांची आवश्यकता असल्याने याप्रकरणी काही न बोललेले बरे! अशी भूमिका घेतल्याचे चित्र होते.

मात्र, राज्यात पुन्हा भाजपचा मुख्यमंत्री झाल्यानंतर नाशिकमधील पदाधिकाऱ्यांचा आत्मविश्वास आणखी दुणावल्याने त्यांच्याकडून खासगीत निवडणूक स्वबळावरच घेण्याची मागणी होत आहे. दोन वर्षांनी शहरात सिंहस्थ कुंभमेळा होणार आहे. अशावेळी महापालिकेत एकहाती आपलीच सत्ता असण्याची भावना पदाधिकाऱ्यांची आहे. पक्षाचे तीन आमदार असून, शिवसेना शिंदे गटाला सोबत घेऊन राजकीय ताकद वाढण्याऐवजी खुंटेल, अशी भीती भाजप पदाधिकाऱ्यांना आहे. महायुतीत शिवसेना शिंदे गटाचे महापालिकेतील संख्याबळ वाढण्याबरोबरच महापालिकेत सत्तास्थापनेवेळी डोकेदुखी ठरू शकते.

युतीत शिंदे गटाकडून अधिकच्या जागांची मागणी होऊ शकते. ते भाजपला मान्य नसेल. महापालिकेची निवडणूक भाजपसाठी प्रतिष्ठेची असेल.

### शिंदेंनी दिले होते आश्वासन

सन २०१७ मध्ये अखंड असलेल्या शिवसेनेचे ३५ नगरसेवक निवडून आले. निवडून आलेल्या जागांव्यतिरिक्त आणखी जागांची मागणी असेल. विशेषतः गेल्या काही दिवसांत राष्ट्रवादी व काँग्रेसच्या माजी नगरसेवकांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला असून, त्या जागांवरून खटके उडण्याची शक्यता आहे. दरम्यान, महापालिकेसाठी युती होणार की नाही, यासाठी काही दिवसांची वाट पाहावी लागणार आहे. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना पक्षात प्रवेश करणाऱ्या माजी नगरसेवकांना महापालिका निवडणुकीत भाजपसमवेत युती होणार असल्याचे सांगितले होते. मात्र, विधानसभेतील निकालानंतर राजकीय परिस्थिती कमालीची बदलली आहे. म्हणूनच की काय, भाजपकडून शंभर प्लसचा नारा दिला जातो आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महायुतीत लढणार असल्याचे म्हटले आहे. शिवाय, शिवसेनेचे मुख्य नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे जो निर्णय घेतील तो आम्हाला मान्य असेल. त्यामुळे महायुती होवो अगर ना होवो, आम्ही मात्र ताकदीनिशी लढण्यासाठी तयार आहोत.
**– अजय बोरस्ते**, उपनेते, शिवसेना शिंदे गट



भाजपने एक हजार ४७ बूथवर बूथप्रमुख व समित्या गठित केल्या आहेत. पक्षसंघटनेच्या माध्यमातून प्रचारयंत्रणा राबवून भाजपचे मिशन शंभर प्लस आहे. यातून नाशिक महापालिकेवर भाजपचा पुन्हा एकदा झेंडा फडकेल, यात शंका नाही.
**– प्रशांत जाधव**, शहराध्यक्ष, भाजप

# शुद्धीकरण न करता पाणी गोदापात्रात सोडत असल्याने नागरिकांत संताप

## आमदार सीमा हिरे, मनपा आयुक्त खत्रींकडून पाहणी

**नाशिक : प्रतिनिधी**

आमदार सीमा हिरे यांच्याकडून आलेल्या तक्रारींची दखल घेत मंगळवारी (दि. ६) महापालिका आयुक्त मनीषा खत्री यांनी गंगापूर येथील जलशुद्धीकरण केंद्राची पाहणी केली. जलशुद्धीकरण केंद्रात आलेल्या पाण्यापैकी बऱ्याच पाण्याचे शुद्धीकरण न करता पाणी थेट गोदापात्रात सोडले जाते. परिणामी, गंगापूर गाव परिसरात मोठ्या प्रमाणावर दुर्गंधी सुटते. केंद्राच्या मनमानी व हलगर्जीपणामुळे त्रस्त ग्रामस्थांनी आयुक्तांपुढे तक्रारींचा पाढाच वाचला. नदीपात्रातील पाण्याचे नमुने घेत योग्य तो सकारात्मक निर्णय घेऊ, अशी ग्वाही मनपा आयुक्त खत्री यांनी दिली.

जलशुद्धीकरण केंद्रावरील कर्मचारी आलेल्या पाण्यापैकी अवघ्या २० ते ३० टक्के पाण्यावरच शुद्धीकरणाची प्रक्रिया करतात. उर्वरित मलयुक्त पाणी आहे तसेच गोदापात्रात सोडले जाते. परिणामी, नदीपात्रातील पाणी दूषित होऊन गाव परिसरात सर्वत्र दुर्गंधी सुटते. या परिस्थितीमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. त्यांनी आमदार सीमा हिरे यांच्याकडे तक्रार केली होती. गेल्या आठवड्यात याची कल्पना आमदार हिरे यांनी महापालिका आयुक्त खत्री यांना दिली होती. त्यानुसार मंगळवारी (दि. ६) खत्री यांनी जलशुद्धीकरण केंद्राची पाहणी केली. खत्री यांनी जलशुद्धीकरण प्रक्रियेची माहिती घेत गोदापात्राची पाहणी केली. पाण्यावर प्रक्रिया न करता पाणी सर्रास थेट गोदापात्रात सोडले जात असल्याचे सांगत नागरिकांनी आयुक्तांपुढे केंद्रचालकांच्या मनमानी व हलगर्जीपणावर संताप व्यक्त केला. केंद्रातील यंत्रणेच्या मोठ्या आवाजामुळे कानाच्या पडद्यांवर परिणाम होत असल्याचे परिसरातील महिलांनी आयुक्तांच्या निदर्शनास आणून दिले. हे जलशुद्धीकरण केंद्र तातडीने इतरत्र हलवावे, अशी मागणी आमदार हिरेंसह नागरिकांनी आयुक्तांकडे केली. गोदापात्रातील दुर्गंधी व मलयुक्त पाणी पाहून आयुक्तांनी लगेच पाण्याचे नमुने तपासण्याची सूचना केली.

यावेळी भाजपच्या युवा मोर्चाचे शहर उपाध्यक्ष प्रवीण पाटील, बापू जाधव, पप्पू मोहिते, भगवान गबाले, कचरू पाटील, अशोक खाडे, नितीन मोहिते, दीपक आरोटे, गणपत दाहाड, नामदेव दाहाड, मोतीराम रानडे, बापू खताळे ग्रामस्थ उपस्थित होते.




## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

खालील परिशिष्ट मध्ये वर्णन केलेली शेतजमीन मिळकत आमचे अशिल डॉ. संजय बापुराव निकाळे .रा. ता. राहाता, जि. अहमदनगर यांचे बरोबर कायम खरेदी देण्याचा व्यवहार ठरलेला आहे. शेतमिळकतीचे सौदा विसार रक्कम खरेदी घेणार यांनी खरेदी देणार यांना दिलेली आहे. परंतु सदर खालील नमुद शेतमिळकत भोगवटादार वर्ग २ ची असल्याने सदर शेतमिळकतीस मा.अप्पर जिल्हा अधिकारी सो.शिर्डी यांचे कायदेशीर परवानगी घ्यावी लागते. सदर परवानगी मिळाल्यानंतर शेत मिळकतीचा कायम खरेदीखताचा व्यवहार आमचे अशिल करणार आहे. परंतु सदर शेत मिळकतीबाबत जमीनीचे ७/१२ चे रेकॉर्ड ऑफ राईटला जमीन मालकाबरोबर जमीन कायम स्वरुपी खरेदीखताने विकी करावयाची आहे असे बोलणे उभयतांमध्ये व्यवहाराची योग्य तो मोबदला ठरवुन बोलणी झाली आहे. त्याप्रमाणे सदर आमचे अशिल व जमीनीचे मालक यांच्यामध्ये मा. दुय्यम निबंधक साो. कोपरगांव, ता. कोपरगांव, जि.अ.नगर यांचे कार्यालयात बिन कब्जाचा साठेखजताचा दस्त व कधीही रद्द न होणारे स्पेशल मुखत्यारपत्र इ. दस्त नोंदविणार आहेत. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे. असे खरेदी देणार यांचे म्हणणे आहे परंतु कोणाचीही काहीएक तकार राहु नये म्हणुन या जाहीर नोटीसीव्दारे कळविणेत येते की, सदर मिळकतीबाबत कोणाताही वाद चालु असल्यास अथवा मृत्युपत्र, गहाण, दान, बक्षीसपत्र,अव्वल जप्ती, बॅंक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट, अगर इतर कोणताही वाद चालु असल्यास संबंधीतांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासुन ७ दिवसांचे आत खालील पत्यावर समक्ष लेखी अथवा रजि. पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हांस कळवावे व आमची खात्री करुन द्यावी.

तरी सदर जाहीर नोटीसीने कळविणेत येते की, मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क,हितसंबंध आहे त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजुन आमचे अशिल साठेखताचा दस्त व कधीही रद्द न होणारे मुखत्यारपत्राचा दस्त असा व्यवहार पुर्ण करतील मग कोणचीही तकार चालणार नाही याची नोंद घ्यावी. ही नोटीस प्रसिध्दीस दिली.

**ता. ०७/०५/२०२५**

**- परिशिष्ट मिळकतीचे वर्णन -**

जिल्हा अहमदनगर, पोट तुकडी अहमदनगर तालुका कोपरगांव हद्दीतील मौजे कोकमठाण येथील शेत जमीन मिळकतः-

| गट नं. | क्षेत्र हे. आर | आकार रू. पैसे | पोट खराबा |
| --- | --- | --- | --- |
| १०/७ | ००.०० | ०६.९५ | १.१४.०० |

यासी चतु:सिमा - रेकॉर्ड ऑफ राईट प्रमाणे

सदर मिळकतीचे विद्यमान मालक- **१) उषा दशरथ कहार (गंगुले), २) रामदास दशरथ केहार (गंगुले), ३) लक्ष्मी दशरथ कहार (गंगुले) ४) निशा दशरथ कहार (गंगुले) ५) सुनिता राजु उबाळे ६) अनिता गणेश डिंबर, सर्व रा. कोपरगांव, ता. कोपरगांव, जि.अ.नगर**

**ता. ८/५/२०२५**

सही/-
**ॲड.बी.यु. गाडे (पाटील)**
**मो.नं. ९०९६५४६९६०**
**कोपरगाव कोर्ट, ता. कोपरगांव, जि.अ.नगर**



## नोटीस

सुमती को-ऑप. हौसिंग सोसायटी, शरणपूर रोड, नाशिक या संस्थेचे सभासद असलेला बंगला क. ७ धारण करणा-या रामविलास बन्सीलाल मालपाणी यांचे तारीख १४/६/२०१२ रोजी निधन झाले. संस्था या नोटीसद्वारे संस्थेच्या भांडवलात / मालमतेत असलेले मयत सभासदाचे भाग व हितसंबंध हस्तांतरीत करण्यासंबंधी मयत सभासदाचे वारसदार किंवा अन्य मागणीदार / हरकतदार यांच्याकडून हक्क मागण्या / हरकती मागविण्यात येत आहेत, ही नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून ७ दिवसांत त्यांनी आपल्या मागण्यांच्या वा हरकतीच्या पृष्टर्थ आबश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती व अन्य पुरावे सादर करावेत. जर वर नमूद केलेल्या मुदतीत कोणाही व्यक्तीकडून हक्क मागण्या किंवा हरकत सादर झाल्या नाहीतर मयत सभासदाचे संस्थेच्या भांडवलातील / मालमतेतील भाग व हितसंबंध यांच्या हस्तांतरणा बाबत संस्थेच्या उपविधी नुसार कार्यवाही करण्याची संस्थेला मोकळीक राहील. जर अशा कोणत्याही हक्क मागण्या / हरकत आल्यातर. त्याबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्यांत येईल नोंदी व उपविधीची एक प्रत मागणीदारास / हरकतदारास पाहण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात सचिव यांचेकडे संध्याकाळी ५ ते ७ पर्यंत नोटीस दिल्याच्या तारखेपासून नोटीशीची मुदत संपण्याच्या तारखेपर्यंत उपलब्ध राहील.

**चेअरमन**
**सुमती को-ऑप. हौसिंग सोसायटी लि., यांच्या वतीने**
**ठिकाण- नाशिक**



# गांवकरी Classified

जाहिरातीसाठी संपर्क 9404434628

### पाहिजेत

राणेनगर येथील टू व्हीलर व फोर व्हीलर शोरूमसाठी CRM/DBM रिसेप्शनिस्ट, मेकॅनिक, सर्विस ॲडव्हायझर, स्पेअर पार्ट मॅनेजर, टेलीकॉलर, हाऊस कीपिंग, ऑफिस बॉय, वॉशिंग बॉय, अकाउंटंट त्वरित पाहिजेत. **संपर्क :** ९२७२०९१४२५

---

दुकान कामासाठी मुले व मुली पाहिजे.श्री गिफ्ट ॲण्ड टॉईज, कानडे मारुती लेन, नाशिक. **संपर्क-** ९८९००१३१३६

---

गंगापूररोड, पाईपलाईनरोड येथील कन्स्ट्रक्शन कंपनीला कार्यालयीन कामकाजाकरिता १० वी-१२ वी पास-नापास ऑफिसबॉय पाहिजे. ८२३७३११२११

---

नामांकित बँकेच्या वसुलीसाठी डीआरए परीक्षा पास झालेले महिला व पुरुष उमेदवार पाहिजेत: संपर्क ९९६०३५०००५

### पाहिजेत

पंचवटीत कापड दुकानाकरिता पंचवटीतील स्थानिक मुले पाहिजेत. सकाळी ९ ते १. ७५८८६६४४९१

---

कोहिनूर ज्वेलर्स, पखाल रोड, अशोका मार्ग, १२ वी पास मुलगी पाहिजे. **संपर्क-९८६०१३६५३६**

### महिला व पुरूष पाहिजेत

Draftsman part time आटोक्याड नॉलेज-१, ऑफिस कामासाठी-४, कोर्ट व महापालिकेच्या कामासाठी-२, ड्रायव्हर-१, वकील पार्ट टाइम-१, अकाऊंटंट पार्ट टाइम-१, भटजी देवपूजा करण्यासाठी-१ **एन.एन. असोसिएटस्**, तिसरा मजला, आय. डी.बी.आय. बँकेच्यावर, साठे बाग, एम.जी.रोड, नाशिक. वेळ- सकाळी १२ ते ५.
संपर्क- 8668862801

### Name change

I, SONALI JANARDAN KADAM DECLARE THAT MY SON NAME CHANGED VIBHAV JANADHAN KADAM (OLD NAME) TO **VIBHAV JANARDAN KADAM** AS PER VIDE AFFIDAVIT NO. 35AB146592 & GAZETTE NO. (MR-24244464)

---

I, GORDE MACHINDRA BAJIRAO father of NO. 15756554K RANK Signalman NAME GORDE RUTWIK MACHINDRA, presently residing at KOPARGAON, AHMADNAGAR MAHARASHTRA 423601 declare that I have changed my name from MACHINDRANATH BAJIRAO GORDE to GORDE MACHINDRA BAJIRAO.

---

I,GORDE ANURADHA MACHINDRA mother of NO. 15756554K RANK Signalman NAME GORDE RUTWIK MACHINDRA, presently residing at KOPARGAON, AHMADNAGAR MAHARASHTRA 423601 declare that I have changed my name from ANURADHA to GORDE ANURADHA MACHINDRA.

### नाम बदल

मैं, गोर्डे मच्छिंद्र बाजीराव,संख्या १५७५६५५४ रैंक सिगनलमैन नाम गोर्डे ऋत्विक मच्छिंद्र का पिता हूं स्थाई पता: कोपरगाव, अहमदनगर, महाराष्ट्र ४२३६०१ घोषणा करता हूं कि मैंने अपना नाम मच्छिंद्रनाथ बाजीराव गोर्डे से बदलकर गोर्डे मच्छिंद्र बाजीराव कर लिया है।

---

मैं, गोर्डे अनुराधा मच्छिंद्र, संख्या १५७५६५५४ रैंक सिगनलमैन नाम गोर्डे ऋत्विक मच्छिंद्र की माँ हूं स्थाई पता: कोपरगाव, अहमदनगर, महाराष्ट्र ४२३६०१ घोषणा करती हूं कि मैंने अपना नाम अनुराधा से बदलकर गोर्डे अनुराधा मच्छिंद्र कर लिया है।

**जाहिरात छोटी किमया मोठी!**



प्रोसेस जमा

जा.क्र. ११६१/२५ दि.०५/०५/२५
**ॲड. श्री. रविंद्र जगन्नाथ पाटील,**
**निवास :- ओम शांती बालाजी नगर, सटाणा, जि. नाशिक**
**मो.नं. ७५८८६१८६५२ / ९९७०२९०२२७**

## जाहीर नोटीस

**वारसा प्रमाणपत्र अ.नं. ८९/२०२५**
**नि. ६ नुसार**

**सटाणा येथील मा. दिवाणी न्यायाधिश, कनिष्ट स्तर यांचे न्यायालयात...**

**श्री. विष्णु शंकर पिंपळसे,** वय - ६५ वर्षे, धंदा - शेतमजुरी
रा. द्याणे, ता. बागलाण, जि. नाशिक ... **अर्जदार**

- विरुद्ध

**कोणीही नाही ....सा.वाला**

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदाराचे वडील नामे **शंकर सोमा पिंपळसे हे दि. ०८/०९/१९९३ रोजी मौजे द्याणे, ता. बागलाण, जि. नाशिक** येथे **मयत** झाले आहेत. अर्जदार हा **कै. शंकर सोमा पिंपळसे** यांचे कायदेशीर वारस असलेबाबत मा. न्यायालयात कथन करुन मे. कोर्टाकडुन अर्जदार यांनी वारस प्रमाणपत्र मिळणेकामी प्रस्तुतचा अर्ज मे. कोर्टात दाखल केला आहे.
त्याअर्थी प्रस्तुत अर्जातील अर्जदार हे **कै. शंकर सोमा पिंपळसे** यांच्या मृत्युनंतर कायदेशीर वारस आहेत / नाहीत या बाबत कोणाची हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्धी झाल्यापासून **३०** दिवसांचे आत अगर **दि. १८/६/२०२५** रोजी स्वतः अगर वकीला मार्फत हजर राहुन आपले लेखी म्हणणे दाखल करावे.
वरील मुदतीत कोणाची हरकत अगर तक्रार न आल्यास मे. कोर्ट अर्जदारांचा योग्य तो पुढील पुरावा घेवुन आदेश करेन मग त्यानंतर कोणाचे काही एक म्हणने ऐकले जाणार नाही.
आज दिनांक - ५ / ५ / २०२५ रोजी माझी सही व मे. कोर्टाच्या शिक्क्यानिशी प्रसिद्धीस दिली असे.

**सही/- कामगिरी लिपीक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय सटाणा (नाशिक)**
(शिक्का)
**सही/- सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय सटाणा (नाशिक)**



प्रोसेस जमा

जा.क्र. ११६५/२५ दि.०५/०५/२५
**ॲड. श्री. रविंद्र जगन्नाथ पाटील,**
**निवास :- ओम शांती बालाजी नगर, सटाणा, जि. नाशिक**
**मो.नं. ७५८८६१८६५२ / ९९७०२९०२२७**

## जाहीर नोटीस

**वारसा प्रमाणपत्र अ.नं. ८६/२०२५**
**नि. ६ नुसार**

**सटाणा येथील मा. दिवाणी न्यायाधिश, कनिष्ट स्तर यांचे न्यायालयात...**
**१) श्रीमती. लिलाबाई भागा ऊर्फ भागचंद पिंपळसे, वय - ६० वर्ष**
**२) श्री. रविंद्र भागा ऊर्फ भागचंद पिंपळसे, वय २८ वर्ष ...अर्जदार**
दोघांचा धंदा - शेती व मजुरी
दोघे रा. रा. ब्राम्हणगांव, ता. बागलाण, जि. नाशिक

**- विरुद्ध -**

**कोणीही नाही ...सा.वाला**

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदार नं. १ चे पती व अर्जदार नं. २ चे वडील **भागा ऊर्फ भागचंद गिरजी पिंपळसे** हे दि. **३/१०/२००४ रोजी मौजे ब्राम्हणगांव, ता. बागलाण, जि. नाशिक** येथे **मयत** झाले आहेत. अर्जदार हा **कै. भागा ऊर्फ भागचंद गिरजी पिंपळसे** यांचे कायदेशीर वारस असलेबाबत मा. न्यायालयात कथन करुन मे. कोर्टाकडुन अर्जदार नं. १ व २ यांनी वारस प्रमाणपत्र मिळणे कामी प्रस्तुतचा अर्ज मे. कोर्टात दाखल केला आहे.
त्याअर्थी प्रस्तुत अर्जातील अर्जदार हे **कै. भागा ऊर्फ भागचंद गिरजी पिंपळसे** यांच्या मृत्युनंतर कायदेशीर वारस आहेत / नाहीत या बाबत कोणाची हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्धी झाल्यापासून **३०** दिवसांचे आत अगर **दि. १८/६/२०२५** रोजी स्वतः अगर वकीलांमार्फत हजर राहुन आपले लेखी म्हणणे दाखल करावे.
वरील मुदतीत कोणाची हरकत अगर तक्रार न आल्यास मे. कोर्ट अर्जदारांचा योग्य तो पुढील पुरावा घेवुन आदेश करेन मग त्यानंतर कोणाचे काही एक म्हणने ऐकले जाणार नाही.
आज **दिनांक - ५/५/२०२५** रोजी माझी सही व मे. कोर्टाच्या शिक्क्यानिशी प्रसिद्धीस दिली असे.

**सही/- कामगिरी लिपीक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय सटाणा (नाशिक)**
(शिक्का)
**सही/- सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय सटाणा (नाशिक)**

## महत्त्वाचे

### पंचवटीत भाजीपाला मार्केटजवळ तिघांनी केले महिलेचे दागिने लंपास

**पंचवटी :** येथील मार्केटमध्ये धान्य, कपडे व पैसे वाटप चालू आहे. दागिने पिशवीत ठेवा. सोने अंगावर पाहिले तर तुम्हाला साहित्य मिळणार नाही, असे सांगून सरदार यांना बोलावून आणतो, असे सांगून महिलेचे दागिने तिघांनी लंपास केले. याबाबत पंचवटी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. याप्रकरणी शशिकला रोहिदास मोरे (वय ७०, रा. गल्ली नं. ३, घर नं. १११, संज नगर, पंचवटी) यांनी पंचवटी पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. मंगळवारी (दि.६) सकाळी सव्वानऊच्या सुमारास म्हसोबा मंदिर भाजीपाला मार्केटजवळ तीन अनोळखी पुरुषांनी फिर्यादी महिलेजवळ येत मार्केटमध्ये धान्य, कपडे, पैसे वाटप चालू आहे, असे म्हणून तुम्ही तिथे चला व तुमच्या गळ्यातील व कानातील, हातातील दागिने व पैसे काढून तुम्ही पिशवीमध्ये ठेवा. सर्व सोने बघून तुम्हाला सामान मिळणार नाही, असे सांगितले. त्यांनी बोलण्याच्या नादात फिर्यादीस धान्य, कपडे, पैसे वाटप करणारा सरदार यांना बोलावून आणतो, असे सांगत त्या तिघांनी ४० हजारांचे गळ्यातील मणी-मंगळसूत्र, ३ ग्रॅमचे सोन्याचे पान, १५ हजारांची ३ ग्रॅमची सोन्याची अंगठी, ४० हजारांचे कानातील वेल व फुले, असा एकूण ९७ हजारांचा मुद्देमाल लंपास केलो. महिला सहाय्यक पोलिस निरीक्षक पाटील, हवालदार कुलकर्णी तपास करत आहेत.

### गांधी तलावात बुडून तरुणाचा मृत्यू

**नाशिकरोड :** पंचवटीतील रामकुंडालगत असलेल्या गांधी तलावात मंगळवारी (दि.६) दुपारी पोहण्यासाठी गेलेल्या तरुणाचा मृत्यू झाला. हा तरुण देवळाली कॅम्प भागातील सह्याद्रीनगर परिसरात वास्तव्यास होता. या घटनेची माहिती मिळताच पंचवटी अग्निशमन दलाच्या पथकाने घटनास्थळी जात शोधकार्य सुरू केले. त्यात प्रणय तुषार शिराळ (वय १८) याचा मृतदेह पथकाच्या हाती लागला. मित्रांसमवेत तो गांधी तलाव येथे पोहण्यासाठी गेला असता, पाण्याचा अंदाज न आल्याने बुडाल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. पंचवटीतील रामकुंडालगत असलेल्या गांधी तलावात मंगळवारी (दि.६) दुपारी तीनच्या सुमारास मृत प्रणय व त्याचे काही मित्र आंघोळीसाठी गेले होते. यावेळी प्रणयने गांधी तलावात उडी मारली. मात्र, पाण्याचा अंदाज न आल्याने तो बुडू लागला. हे लक्षात येताच त्याच्यासोबतच्या मित्रांनी तत्काळ मदतीसाठी आरडाओरड केली. येथील जीवरक्षकांनीही तातडीने पाण्यात उड्या मारल्या. मात्र, तोपर्यंत प्रणय पाण्यात बुडाला होता. या घटनेची माहिती मिळताच पंचवटी अग्निशमन दलाचे संदीप कानडे, ट्रेनी फायरमन यांनी धाव घेत बोटीच्या सहाय्याने शोधमोहीम हाती घेतली. यावेळी पंचवटी पोलीस ठाण्याचे हवालदार काका काळे, संदीप गांगुर्डे, अशोक गांगुर्डे, किसन गायकवाड, विवेक जाधव, नितीन पवार, अंकुश काळे घटनास्थळी दाखल झाले. जमावाला बाजूला करत मृतदेह विच्छेदनासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल केला.

### इमारत मेन्टेनन्सच्या पैशावरून वाद; चेअरमनची रहिवाशास दांडक्याने मारहाण

**सिडको :** अंबड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दातीरनगर येथील स्वराज अर्पाटमेंट इमारतीत मेन्टेनन्सच्या पैशावरून वाद झाला. या इमारतीचे चेअरमन राकेश पवार व सचिन वाघ या दोघांनी एकाला लाकडी दांडक्याने मारहाण केल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. याप्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात संबंधितांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणातील फिर्यादी संजय पाटील यांनी त्यांच्या बिल्डरने मेन्टेनन्सच्या नावाखाली घेतलेल्या पन्नास लाखांच्या हिशेबाबाबत विचारणा केली होती. या चर्चेदरम्यान चेअरमन राकेश पवार व त्यांच्या सहकाऱ्याने संतप्त होऊन संजय पाटील यांना शिवीगाळ केली व लाकडी दांडक्याने मारहाण केली. यात संजय पाटील यांच्या डाव्या छातीला, गुडघ्याला, उजव्या पायाच्या अंगठ्याला व मांडीला दुखापत झाली आहे. इतकेच नव्हे, तर त्यांचा भाऊ राजेंद्र पाटील यांनाही ठार मारण्याची धमकी देण्यात आली. याप्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. चुंचाळे एमआयडीसी पोलीस चौकीचे पोलीस निरीक्षक कांरडे यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार समाधान चव्हाण तपास करत आहेत.

# अंधाराचा फायदा घेत टवाळखोरांची दगडफेक

## दुकानाचा फलक, सीसीटीव्हीचे नुकसान

सिडको : विशेष प्रतिनिधी

**सिडको परिसरातील फडोळ मळा परिसरात मंगळवारी (दि. ६) रात्रीच्या सुमारास वीजपुरवठा खंडित असल्याचा व पावसाचा फायदा घेत १५ ते २० टवाळखोरांनी जय गजानन अमृततुल्य चहा दुकानावर दगडफेक केली. दुकानाचा फलक व सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान केले. या घटनेने परिसरातील नागरिकांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.**



दगडफेकीवेळी टवाळखोरांनी दुकानाजवळ येऊन शिवीगाळ करत जोरदार दगडफेक सुरू केली. परिसरात अंधार असल्यामुळे त्यांना ओळखणे कठीण झाले. या दगडफेकीत दुकानाच्या बाहेरील फलक, सीसीटीव्ही कॅमेरे व काही साहित्याचे नुकसान झाले आहे.

घटनास्थळी अंबड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राकेश हांडे यांनी तातडीने भेट देत पाहणी केली. पोलिसांनी परिसरातील नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले. या प्रकारामुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. परिसरातील काही रहिवाशांनी सांगितले की, यापूर्वीही अशा प्रकारच्या टवाळखोरीच्या घटना घडल्या असून, पोलिसांनी अधिक कडक कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

दरम्यान, पोलिसांकडून घटनास्थळाजवळील इतर सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात येत असून, दोषींविरुद्ध लवकरच कारवाई करण्यात येईल, असे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हांडे यांनी सांगितले.

दरम्यान, या प्रकारामुळे व्यावसायिक व सामान्य नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. पोलिसांनी दहशत माजवणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे.

### पोलिस कुणाल राठोडचे नाव चर्चेत?

अंबड पोलीस ठाण्याच्या गुन्हेशोध व प्रकटीकरण शाखा पथकाचे पोलीस कर्मचारी कुणाल राठोड यांनी अनेक छोट्या-मोठ्या आरोपींना ताब्यात घेतले आहे. मकरसंक्रांतीच्या काळात मोठ्या प्रमाणावर नायलॉन मांजा जप्त करण्यात त्यांचा मोठा हात असताना विविध चौकाचौकांत कुणाल राठोड यांचे नाव प्रचलित आहे. याच कुणाल राठोडचे नाव वापरून काही ठिकाणी अल्पवयीन मुले परिसरात भाईगिरी करत असताना, मंगळवारी (दि. ६) झालेल्या दगडफेकीतसुद्धा कुणाल राठोडचे नाव पुढे आले आहे. यातील साई नामक संशयिताने कुणाल राठोड माझा मामा असल्याचे दगडफेकीदरम्यान सांगितले. या प्रकारामुळे राठोडचे नाव पुन्हा उघड झाले असून, तो संशयितांना पाठबळ देत आहे की काय, असा सवाल उपस्थित होत आहे.

# सिटीलिंक नोकरीच्या नावाखाली चार लाखांची फसवणूक

## आदिवासी कर्मचाऱ्यांचा कार्यालयात अपमान

सिडको : विशेष प्रतिनिधी

नाशिक महापालिकेच्या सिटीलिंक बससेवेतील लाइन चेकिंग पदावर नोकरी लावून देतो, असे सांगत तिघा संशयितांनी चार लाख पाच हजारांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पीडित व त्यांच्या समाजातील कर्मचाऱ्यांना जातिवाचक अपमानित केल्याच्या आरोपावरून संशयितांविरोधात अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी सुनील पांडुरंग कोल्हे (वय ३२, रा. राधे अपार्टमेंट, म्हसरूळ) यांनी मुंबई नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, १५ जून २०२२ ते २५ मार्च २०२५ या कालावधीत सिटीलिंक कार्यालय, शरणपूर रोड येथे मनोहर भोये, राजेश वाघ आणि सुरेश भदाणे या तिघांनी संगनमत करून फिर्यादी व त्यांच्या समाजातील आठ जणांकडून नोकरी लावण्याच्या आमिषाने रक्कम उकळली.

एकदा नोकरी मिळाल्यानंतर देखील फिर्यादीकडून ३० हजार आणि इतर सहा कर्मचाऱ्यांकडून एकूण एक लाख चार हजार तीनशे रुपये अशी रक्कम खंडणीच्या स्वरूपात घेतल्याचा आरोप आहे.

फिर्यादीने जेव्हा सुरेश भदाणे यांच्याकडे वैध कारणासाठी रजा मागितली, तेव्हा त्यांनी फिर्यादीच्या आदिवासी समाजाचा अपमान करत, तुम्हा आदिवासींचे नाटकं असतात, सणाच्या नावाखाली सुट्ट्या घेतात, असे शब्द वापरून कार्यालयात सर्वांसमोर अपमानित केले.

याप्रकरणी अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुंबई नाका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक संतोष नरूटे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक पाटील व शिरसाठ, तसेच पोलिस उपनिरीक्षक गोडे तपास करत आहेत.

# उपेंद्रनगर भाजी मार्केटमध्ये महापालिकेची अतिक्रमणावर धडक कारवाई

## महिला भाजीविक्रेत्या आक्रमक

सिडको : विशेष प्रतिनिधी

महानगरपालिकेच्या सिडको अतिक्रमण विभागाने उपेंद्र नगर भाजी मार्केट परिसरात अतिक्रमणविरोधी धडक मोहीम राबवली. या कारवाईदरम्यान अतिक्रमण करून व्यवसाय करणाऱ्या हातगाडी व भाजीपाला विक्रेत्यांवर कारवाई करण्यात आली.



अतिक्रमण विभागाच्या पथकाने पोलीस बंदोबस्तात कारवाई सुरू करताच, एका महिला विक्रेत्याने थेट महापालिकेच्या वाहनासमोर बसून तीव्र विरोध दर्शवला. या प्रकारामुळे काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, पोलिसांच्या मध्यस्थीने परिस्थिती नियंत्रणात आणण्यात आली या कारवाईत उपेंद्र नगर, त्रिमूर्ती चौक व पेठे शाळेसमोर अतिक्रमित जागांवर उभ्या असलेल्या सुमारे चार ट्रक भाजीपाल्याचा साठा जप्त करण्यात आला. अनेक हातगाड्या हटवण्यात आल्या असून अतिक्रमण विरोधी मोहिमेचा व्यापारी वर्गाने तीव्र विरोध केला.महापालिकेच्या सिडको अतिक्रमण विभागाचे पथक अचानक पोहोचल्यामुळे विक्रेत्यांमध्ये गोंधळाची स्थिती निर्माण झाली होती. अनेक व्यापाऱ्यांनी आपली गाड्या व साहित्य तातडीने हलवण्याचा प्रयत्न केला. काही जणांनी महापालिका अधिकाऱ्यांशी वादही घातले.दरम्यान महापालिका प्रशासनाने मात्र सार्वजनिक रस्त्यांवरील अतिक्रमण हटवणे गरजेचे असल्याचे सांगत पुढील काळातही अशी कारवाई सुरू राहील, असा इशारा दिला आहे.

# मोटारसायकल चोरी करणाऱ्या दोघांना अटक

## आठ लाखांची वाहने जप्त, इंदिरानगर पोलिसांची कामगिरी

सिडको : विशेष प्रतिनिधी

इंदिरानगर पोलिस ठाण्याच्या गुन्हेशोध पथकाने केलेल्या कारवाईत दोन सराईत मोटारसायकल चोरांना अटक केली. त्यांच्या ताब्यातून सुमारे आठ लाख रुपये किमतीच्या सात चोरीच्या मोटारसायकल जप्त करण्यात आल्या आहेत.



इंदिरानगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील राजीवनगर परिसरातील चड्डा पार्क भागात दोन इसम हिरो मॅस्ट्रो ही चोरीची मोटरसायकल विक्रीसाठी आणणार असल्याची माहिती खबऱ्यामार्फत गुन्हेशोध पथकाचे पोलिस नाईक पवन परदेशी यांना मिळाली होती त्या माहितीच्या आधारे पोलीस उपनिरीक्षक संतोष फुंदे यांच्या नेतृत्वाखाली सापळा रचून करण रमेश शिंदे (रा. परभणी) व शामसुंदर मनोज गेडाम (रा. अदिलाबाद, तेलंगणा) यांना अटक करण्यात आली.

पोलिसांनी संशयितांची विचारपूस केल्यानंतर आरोपींच्या ताब्यातून हिरो मॅस्ट्रो, यामाहा आर१५, बजाज पल्सर, बजाज प्लॅटिना अशा विविध कंपन्यांच्या मोटरसायकली हस्तगत करण्यात आल्या. या चोरीच्या मोटारसायकली आयुक्तलय हद्दीतील विविध पोलिस ठाण्यांत दाखल असलेल्या गुन्ह्यांशी संबंधित असल्याचे निष्पन्न झाले आहे तसेच इगतपुरी पोलीस ठाणे येथील गुन्ह्यांमध्ये चोरीस गेलेल्या मोटारसायकलींपैकी दोन लाख २० हजार रुपये किमतीच्या दोन वाहनांचाही समावेश आहे.

ही संपूर्ण कारवाई इंदिरानगर पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक तृप्ती सोनवणे, सहायक पोलीस निरीक्षक सुनील अंकोलीकर, तसेच गुन्हेशोध पथकाचे पोलिस नाईक पवन परदेशी, पोलिस शिपाई सागर कोळी, अमोल कोथमिरे, जयलाल राठोड, सौरभ माळी, सागर परदेशी, दीपक शिंदे, योगेश जाधव यांनी संयुक्तपणे केली आहे.

# एसएमआरके कॉलेजमध्ये आर्या कापुरे प्रथम

नाशिक : प्रतिनिधी



येथील एस.एम.आर.के. महाविद्यालयातील इयत्ता बारावीचा निकाल ऑनलाइन पद्धतीने जाहीर झाला आहे. महाविद्यालयाचा एकूण निकाल ९८.२५ टक्के लागला आहे.

महाविद्यालयातील कला, विज्ञान, गृहविज्ञान, वाणिज्य, तसेच एम.सी.व्ही.सी. विभाग या सर्व शाखांतून प्रथम येण्याचा मान कला शाखेची विद्यार्थिनी आर्या कापुरे हिने ९२.१७ टक्के गुण मिळवून पटकावला. महाविद्यालयातील विविध शाखांचा निकाल याप्रमाणे : कला शाखा ९४ .४४ टक्के, विज्ञान शाखा १०० टक्के, गृहविज्ञान शाखा १०० टक्के, वाणिज्य शाखा १०० टक्के, एम.सी.व्ही.सी. विभाग १०० टक्के. कला शाखेतून प्रथम आर्या कापुरे हिने ९२.१७ टक्के गुण प्राप्त केले आहेत. वाणिज्य शाखेतून-फैइजा शेख प्रथम ९०.६७, गृहविज्ञान शाखेतून प्रथम उम्मेहानी दागिनावाला ८०.५०, विज्ञान शाखेतून प्रथम अंकिताकुमारी शर्मा ६५ टक्के, तर एमसीव्हीसी शाखेतून प्रथम बिना मायकेल ९२ टक्के गुण प्राप्त केले आहेत. गोखले एज्युकेशन सोसायटीच्या सचिव प्राचार्या डॉ. दीप्ती देशपांडे, अध्यक्ष डॉ. आर. पी. देशपांडे. विभागीय सचिव डॉ. राम कुलकर्णी, चेअरमन डॉ. सुहासिनी संत यांनी विद्यार्थिनींचे कौतुक केले आहे. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. संध्या खेडेकर, उपप्राचार्य डॉ. नितीन सोनगीरकर, डॉ. सुरेश कानडे, प्रा. संजय पाबारी, समन्वयक शोभा त्रिभुवन, मैथिली लाखे, प्रा. छाया लोखंडे, कार्यालयीन अधीक्षक प्रशांत आंबेकर, तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले आहे.

# महापालिकेत नोकरीच्या आमिषाने चौदा लाखांची फसवणूक

## पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल

सिडको : विशेष प्रतिनिधी

नाशिक महानगरपालिकेत नोकरी लावून देतो, असे सांगून एकाच कुटुंबातील सदस्यांनी आपल्याच नातेवाईक महिलेची १४ लाख रुपयांची फसवणूक केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी भद्रकाली पोलीस ठाण्यात पाच जणांविरुद्ध दाखल करण्यात आला आहे.

भद्रकाली पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार फिर्यादी मिनाक्षी शशिकांत शेवाळे (वय ३८, रा. श्रीरंग रेसिडेन्सी, पेठरोड, पंचवटी) या मूळच्या जांबुटके (ता. दिंडोरी) येथील रहिवासी असून, त्यांनी जुलै २०१९ ते ३ मे २०२४ या कालावधीत आरोपी रोहिदास लक्ष्मण दीपक, राहुल रोहिदास दीपक, उषा रोहिदास दीपक, करुणा बोढारे आणि दर्शनी राहुल दीपक (रा. जुना कथडा टाकळी रोड, नाशिक) यांनी संगनमत करून फिर्यादी यांना महापालिकेत नोकरी लावण्याचे आमिष दाखवले.

यासाठी त्यांनी फिर्यादी यांचा विश्वास संपादन करून टप्प्याटप्प्याने १४ लाख रुपये उकळले. मात्र, त्यानंतर नोकरी दिली नाही आणि पैसेही परत केले नाहीत. या प्रकारामुळे फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर शेवाळे यांनी भद्रकाली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

याप्रकरणी आरोपींविरोधात भद्रकाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भद्रकाली पोलीस पुढील तपास करत आहेत.

# मनमाडची इंधनचोरी लक्षात आली नाही का?

## पोलिस, पेट्रोलियम कंपनीने सखोल तपास करण्याची मागणी

मनमाड : प्रतिनिधी

मनमाड येथील भारत पेट्रोलियम कंपनीच्या मुंबई ते मनमाड या पाइपलाइनला थेट टॅप करून नळकनेक्शन करतो त्याप्रमाणे थेट पाइपलाइनद्वारे दूरपर्यंत कनेक्शन करण्यात आले. तब्बल ४८ फूटपेक्षा जास्त पाइपलाइन लावून नळकनेक्शन जोडतो त्याप्रमाणे जोडून त्या पाइपलाइनमधून हजारो लिटर डिझेलची चोरी करण्यात येत होती. याचा उलगडा झाला खरा, मात्र हे सर्व कोणी केले, याबाबत अद्यापही काही समजले नाही. आज दुसऱ्या दिवशीदेखील दिवसभर ही पाइपलाइन खोदून रिपेअर करण्याचे काम सुरू होते.

काल सायंकाळी ७ वाजेपर्यंत काम सुरू होते. मात्र या सर्व प्रकारामुळे भारत पेट्रोलियमसह सर्व कंपनीच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. मुळात कंपनीच्या वतीने फायबर ऑप्टिकलसारख्या सुविधा वापरांचा दावा करण्यात येतो. जेणेकरून कुठेही छोटेसे लिकेज असले तरी तत्काळ सिस्टिमला अलार्म वाजतो. मग गेल्या अनेक महिन्यांपासून इथून होत असलेली इंधन चोरी लक्षात आली नाही का? असा सवालदेखील उपस्थित केला जात आहे. इंधनचोरी ही अत्यंत अत्याधुनिक पद्धतीने करण्यात आली असून, काल दुसऱ्या दिवशी नळकनेक्शन काढून कंपनीच्या पाइपलाइनला पुन्हा जॉइन करण्याचे काम सुरू होते. आजच्या दिवसाची परिस्थिती बघून हा सर्व प्रकार अनेक वर्षांपासून सुरू असल्याचे प्राथमिक स्वरूपात दिसत आहे. मात्र, इंधन कंपन्यांकडून सुरक्षेच्या बाबतीत कुठेतरी हलगर्जीपणा झाल्याचेदेखील लक्षात येत आहे. या पाइपलाइनवर प्रत्येक आठ किलोमीटरवर एक कर्मचारी देखरेखीसाठी नेमण्यात आला आहे. असे असताना अशा प्रकारची चोरी होणे शक्य नाही.



### या प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी

मनमाड शहरातील भारत पेट्रोलियम तसेच इतर कंपन्यांमध्ये मोठ्या प्रमाणात पेट्रोल, डिझेल, केरोसीन उपलब्ध असते. यापूर्वी अनेकदा इंधन भरून जाणाऱ्या टँकरमधून पेट्रोल, डिझेल काढून त्याची विक्री करण्यात येत होती. यावर कंपनीतर्फे अनेक शक्कल लढवून या चोरीला आळा घालण्याचे काम केले. चोरांनी तर आता थेट कंपनीच्या पाइपलाइनवरच डल्ला मारला असून, जमिनीत पुरलेल्या या पाइपलाइनची परिस्थिती बघून ही पाइपलाइन किमान पाच-सहा वर्षे किंवा त्याहीपेक्षा जुनी असल्याची चर्चा आहे. पोलीस व कंपनी यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करावी व इंधनमाफिया टोळीचा पर्दाफाश करण्याची मागणी होत आहे.

# राजापूर विद्यालयाचा निकाल १०० टक्के



**येवला :** तालुक्यातील राजापूर येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा शंभर टक्के निकाल लागला. विज्ञान विभागाचा शंभर टक्के निकाल लागला. प्रथम क्रमांक सानिका विलास सानप ८१.१%, तर दुसरा क्रमांक राजलक्ष्मी अविनाश वाघ ८१ टक्के, तर तिसरा क्रमांक कावेरी गणेश साळे हिने ८० टक्के गुण मिळविले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष कोंडाजीमामा आव्हाड, उपाध्यक्ष उदय घुगे, सरचिटणीस हेमंत धात्रक, संचालक संपतराव वाघ, रमेश वाघ, संस्थेचे पदाधिकारी शिक्षणाधिकारी, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, पालक शिक्षक संघाचे पदाधिकारी, प्राचार्य प्रदीप सांगळे, पर्यवेक्षक डी. एन. सानप, उच्च माध्यमिक विभागप्रमुख बापू दराडे व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

# कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणाली मानवी विकासाची नांदी

नाशिक : प्रतिनिधी

**अलीकडे प्रत्येकाच्या हातात असणाऱ्या मोबाईलवर आलेली एआय कृत्रिम बुद्धिमत्ता ही सिस्टिम भविष्यातील मानवी विकासाची आणि समृद्धीची नांदी ठरेल, असे प्रतिपादन अमेरिकास्थित आकाश पाटील यांनी केले. गोदाघाटावरील देवमामलेदार यशवंत महाराज पटांगणावर सुरू असलेल्या वसंत व्याख्यानमालेचे सातवे पुष्प गुंफताना बुधवारी (ता.७) स्व. उत्तमराव ढिकले स्मृती व्याख्यानमालेत विचारांच्या क्षितिजापलीकडे : कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मानवी क्षमतांचा विस्तार या विषयावर ते बोलत होते.**



यावेळी व्यासपीठावर के .के. वाघ शिक्षण संस्थेचे संचालक अजिंक्य वाघ, अधिष्ठाता सुनील कुटे आदी उपस्थित होते. मानवी बुद्धिमत्ता आणि कृत्रिम बुद्धिमत्ता या दोन गोष्टी उलगडून सांगताना पाटील यांनी मानवी बुद्धिमत्तेला कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात नवीन तंत्रज्ञान कसे पोषक ठरत आहे याची अनेक उदाहरणे यावेळी दिली.

कृत्रिम बुद्धिमत्तेच्याबाबत यावेळी अनेक प्रश्न उपस्थित श्रोत्यांनी पाटील यांना विचारले त्यावर समर्पक उत्तरे त्यांनी दिले. प्रमुख मान्यवरांचे स्वागत अध्यक्ष श्रीकांत बेणी यांनी केले.

वसंत व्याख्यानमाला
नाशिक

प्रारंभी के.के. वाघ शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर काकासाहेब तथा स्व.बाळासाहेब वाघ तसेच स्व. माजी खासदार ड.उत्तमराव ढिकले यांच्या जीवनावर आधारित चित्रफीत दाखवण्यात आली. तसेच मान्यवरांनी ड. ढिकले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी अजिंक्य वाघ यांनी आकाश पाटील यांचा सत्कार केला तर व्याख्यानमालेचे सदस्य मनीष सानप यांनी अजिंक्य वाघ, सुनील कुटे यांचा चिटणीस हेमंत देवरे यांनी सत्कार केला.

### आजचे व्याख्यान

स्व.माधवराव काळे स्मृतिव्याख्यान
१) श्री शाहू पाटोळे खामगाव, ता. जि. उस्मानाबाद
२) साज कराओके क्लब प्रस्तुत

पावसामुळे आजचे व्याख्यान यशवंत महाराज मंदिरासमोरील श्री गजानन महाराज गुप्ते समाधी मंदिरात घेण्यात आले. व्याख्यानानंतर अफलातून म्युझिक ग्रुप आयोजित हिंदी गीतांचा कार्यक्रम झाला.

## संक्षिप्त ▸▸



### चाचडगाव आदिवासी सोसायटीच्या चेअरमनपदी दत्तात्रय गावंढे

**उमराळे बुद्रुक :** चाचडगाव (ता. दिंडोरी) येथील आदिवासी विविध कार्यकारी सहकारी सोसायटीच्या पंचवार्षिक निवडणुकीत चेअरमनपदी दत्तात्रय सोमा गावंढे, तर व्हाइस चेअरमनपदी सुनील पद्माकर पाटील (पेलमहाले) यांची बिनविरोध निवड करण्यात आली. सोसायटीच्या चेअरमन व व्हाइस चेअरमनपदासाठी प्रत्येकी एक-एक अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड करण्यात आली, असे निवडणूक निर्णय अधिकारी सूरज ओहोळ यांनी जाहीर केले. यावेळी दत्तू गावंढे, रोहिदास गावंढे, सुनील पाटील, अशोक पताडे, विलास धात्रक, नितीन जाधव, रेवती ठेपणे, विमल वाघ आदींसह संचालक मंडळ व ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी निवडणूक अधिकारी ओहोळ यांनी कामकाज पाहिले. संस्था सचिव प्रवीण पालवी व कैलास राऊत यांनी उपस्थित असणाऱ्या संचालक मंडळाचे आभार मानले.



### आ. बनकरांच्या हस्ते रुग्णवाहिका लोकार्पण

**पिंपळगाव बसवंत :** पिंपळगाव ग्रामीण रुग्णालयात शासनाच्या माध्यमातून दाखल झालेल्या नवीन १०२ रुग्णवाहिकेचे लोकार्पण निफाडचे आमदार दिलीप बनकर व मान्यवरांच्या उपस्थितीत सोमवारी (दि.५) झाले. याप्रसंगी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. चारुदत्त शिंदे, नाशिकचे निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. संदीप सूर्यवंशी, पिंपळगाव ग्रामीण रुग्णालयाच्या अधीक्षक डॉ. नागनंदा मगरे, ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. अभिषेक जंजाळे, डॉ. कविता आहेर, डॉ. गौरव आदींसह सतीश मोरे, सागर कुंदे, अक्षय जोशी, परेश शहा, अक्षय थेटे, विक्रम कोल्हे, सद्दाम शेख, नितीन मत्सागर, राम सुरवाडे, अश्विन गागरे, अविनाश बनकर आदींसह कर्मचारी होते.



### कुलस्वामिनी ट्रेडर्स आमदार चषकचा विजेता

**पिंपळगाव बसवंत :** क्रिकेटप्रेमींसाठी सात दिवसीय पर्वणी ठरलेल्या पिंपळगाव शहर महायुतीच्या वतीने पिंपळगाव महाविद्यालय पटांगणावर आयोजित पिंपळगाव प्रीमियर लीग आमदार चषक-२०२५ भव्य डे-नाइट टेनिसबॉल क्रिकेट स्पर्धेच्या चुरशीच्या अंतिम सामन्यात कुलस्वामिनी ट्रेडर्स संघाने बाजी मारत आमदार चषकाचा विजेता ठरले. मालेगावचा महामानव फाउंडेशन संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. विजेत्या प्रथम संघास आमदार दिलीप बनकर यांच्या हस्ते व दीड लाख रुपये रोख व करंडक तर उपविजेत्या संघाला सुजित मोरे व बापू गडाख यांच्या हस्ते एक लाख एक हजार रुपये रोख पारितोषिकासह सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. भव्य टेनिस क्रिकेटबॉल महासंग्रामात सिन्नर रॉयल संघाला सतीश मोरे, बापूसाहेब पाटील यांच्या वतीने ७१ हजारांचे तृतीय बक्षीस, जयभवानी क्रिकेट क्लब संघाला कैलास निरगुडे, माणिक देवकरतर्फे ५१ हजारांचे चतुर्थ बक्षीस, शिवशंभू प्रतिष्ठान संघास डॉ. मयूर पंजाबीतर्फे ३१ हजारांचे पाचवे बक्षीस, तर अजिंक्य इलेव्हन संघाला ज्ञानेश्वर शिरसाठतर्फे हजारांच्या सहाव्या बक्षिसांचे वितरण झाले.



### गांगुर्डेंना कोहिनूर राष्ट्रीय पुरस्कार प्रदान

**दिंडोरी :** दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संस्था (संघ), नाशिक यांच्या वतीने प्रवीण खंडेराव गांगुर्डे यांना कोहिनूर राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. गांगुर्डे यांनी विविध सामाजिक, शैक्षणिक, उद्योग, राजकीय व सहकारी क्षेत्रात त्यांनी प्रदीर्घ काळ केलेल्या कार्याची दखल घेत दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संस्था (संघ), नाशिक यांच्यातर्फे त्यांना कोहिनूर राष्ट्रीय पुरस्कार-२०२५ देऊन सन्मानित करण्यात आला. गांगुर्डेंनी सामाजिक उपक्रमांपासून ते शैक्षणिक प्रबोधन, सहकारी संस्था विकास, महिला सबलीकरण व युवकांना प्रेरणा देणाऱ्या कार्यशैलीपर्यंतचा प्रवास हा प्रेरणादायी आणि लोकहितकारी आहे.

## निधन वार्ता ▸▸

### शैलेंद्र कापडणीस



**नामपूर :** शरद जोशीप्रणीत शेतकरी संघटनेचे माजी बागलाण तालुकाध्यक्ष तसेच विद्यमान नाशिक जिल्हा उपाध्यक्ष शैलेंद्र जिभाऊ कापडणीस (वय ५८, रा. द्याने) यांचे हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, मुलगी, पत्नी, भाऊ व बहीण असा परिवार आहे.

### वीणा वाघमारे



**नाशिक :** येथील वीणा विजय वाघमारे (वय ७५) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, मुलगी, सून, जावई, नात व नातू असा परिवार आहे.

### आशाबाई बोराडे



**पंचवटी :** जेलरोड-पंचक येथील आशाबाई मुरलीधर बोराडे (वय ७५) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, मुलगी, जावई, सुना, नातू असा परिवार आहे. त्या उत्पादन शुल्क विभागातील कर्मचारी सुरेश बोराडे, तसेच सामाजिक कार्यकर्ते अजित बोराडे यांच्या त्या मातोश्री, तर माजी नगरसेवक रतन बोराडे यांच्या काकू होत.

# येवला तालुक्यात २९ टँकरद्वारे पाणीपुरवठा

## विहिरींनी गाठला तळ; जनावरे, हरणांची पाण्यासाठी वणवण

**येवला : प्रतिनिधी**

येवला तालुक्यात यंदाच्या वर्षी उन्हाने मोठा कहर केला आहे. उन्हाच्या तीव्रतेमुळे तालुक्यातील ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याची टंचाई भासत आहे. विहिरी कोरड्याठाक पडल्या आहेत. हातपंपांना पाणी नाही. तालुक्यातील अनेक गावांत असणाऱ्या तलावातील पाणी आटले आहे.



तालुक्यातील ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होऊ नये, यासाठी येवला पंचायत समितीच्या पाणीपुरवठा विभागाकडून टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याचे नियोजन करण्यात आले आहे. पंचायत समितीच्या वतीने येवला तालुक्यातील ३१ गावे, ४१ वाड्यांना २९ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. ज्या गावांना पिण्याच्या पाण्याची टंचाई भासेल अशा गावांनादेखील प्रस्ताव आल्यानंतर टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येणार आहे. असे असले, तरी ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याची टंचाई भासू नये यासाठी पाणीपुरवठा करणाऱ्या टँकरच्या संख्येत अधिक प्रमाणात वाढ करण्यात यावी. गावातील वस्त्यांवरदेखील पिण्याच्या पाण्याचा टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा, अशी मागणी ग्रामीण भागातील ग्रामस्थांनी केली आहे.

येवला तालुक्यातील अनेक खेड्यांत हातपंपांना पाणी आहे. मात्र, हातपंप नादुरुस्त आहेत. अशा नादुरुस्त हातपंपांची पंचायत समितीच्या पाणीपुरवठा विभागाने दुरुस्ती करावी. त्यामुळे पाणीचे स्रोत निर्माण होऊन पाणीटंचाईला आळा बसेल. दुरुस्त केलेल्या हातपंपांचे पाणी ग्रामस्थांना मिळेल, यासाठी पंचायत समितीच्या पाणीपुरवठा विभागाने यासंदर्भात तालुक्यातील कोणत्या भागात नादुरुस्त हातपंप आहे, याचा सर्व्हे करून सर्व हातपंप दुरुस्त करणे आवश्यक आहे. तालुक्यातील बऱ्याच गावांतील विहिरींनी तळ गाठला आहे, तर काही विहिरींना जेमतेम पाणी शिल्लक असल्याने सर्वत्र पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. जनावरांना चारा-पाणी नसल्याने शेतकऱ्यांची पंचायत झाली आहे. गवत वाळले आहे आणि जनावरांना पिण्यासाठी पाणी नाही आणि त्यातच उन्हाची तीव्रता अधिक असल्याने जनावरांचेदेखील मोठ्या प्रमाणात हाल होताना दिसून येत आहे. जनावरांच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाल्यामुळे तालुक्यातील काही जनावरे पाळणाऱ्या ग्रामस्थांनी आपली जनावरे इतर ठिकाणी आपल्या नातेवाइकांकडे पोहोच केली आहे.

हरणांचीदेखील अन्न व पाण्यासाठी भटकंती सुरू आहे. तालुक्यातील राजापूर, ममदापूर, खिर्डीसाठे, नगरसूल शिवार, तसेच इतर ठिकाणी हरणांची कळप कायमस्वरूपी वास्तव्याला आहेत. मात्र, उन्हाच्या तीव्रतेमुळे असंख्य हरणे वाड्या-वस्त्यांवर पाण्यासाठी तसेच अन्नाच्या शोधासाठी वणवण भटकंती करीत असतात. अशा परिस्थितीत विहिरीत पडून अनेक हरणांना आपला जीव गमवावा लागला आहे. तसेच कुत्र्याच्या हल्ल्यात अनेक हरणे गंभीर जखमी झाली आहेत. ही परिस्थिती टाळण्यासाठी वन विभागाने हरणांसाठी पाण्याची आणि अन्नाची व्यवस्था करणे आवश्यक आहे.

तालुक्यातील राजापूर, ममदापूर या भागात हरणांची संख्या अधिक प्रमाणात आहे. या ठिकाणी वन विभागाने हरणांसाठी पिण्याच्या पाण्याचे पाणवठे बांधले असले, तरी या बांधलेल्या पाणवठ्यात पुरेसे पाणी नसल्याने हरणांची पाण्यासाठी वणवण होत असते. हा प्रकार नेहमीच दरवर्षी उन्हाळ्यात पाहावयास मिळतो.

काही सामाजिक बांधिलकी असलेल्या संघटनांच्या पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्या वतीने हरणांसाठी याठिकाणी पाणी उपलब्ध करून दिले जाते. त्यामुळे हरणांना पाणी मिळते. याठिकाणी हरणांचे कळप मोठ्या प्रमाणावर आहेत. येथे वन विभागाने अधिक प्रमाणात पाणवठे निर्माण करणे, ही काळाची गरज आहे.

### शहरात पाच दिवसांआड पाणीपुरवठा

येवला शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या तलावातील पाण्याचा साठा कमी झाला आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊन येवला शहरात नगरपालिकेच्या वतीने पाच दिवसांआड पाणीपुरवठा करण्यात येत आहे. उन्हाच्या तीव्रतेमुळे पाण्याचे बाष्पीभवन होते. त्यामुळे भविष्यात शहरात पिण्याच्या पाण्याची अधिक प्रमाणात टंचाई निर्माण होऊ नये यासाठी नियोजन म्हणून पालिका प्रशासनाच्या वतीने येवला शहरात पाच दिवसांआड पाणीपुरवठा करण्यात आला आहे.

# पाऊस, वादळामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान

## १४४ हेक्टरवरील पिकांना फटका; नुकसानीचे पंचनामे होणार

**निफाड : प्रतिनिधी**

तालुक्यात अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्यामुळे सुमारे ३७४ शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तालुक्यात जवळपास १४४ हेक्टरवरील पिके जमीनदोस्त झाल्याने शेतकऱ्यांचा हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला आहे. नुकसान झालेल्या पिकांमध्ये प्रामुख्याने कांदा, उन्हाळी मका व भाजीपाला पिकांचा समावेश आहे.



मे महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात म्हणजेच दोन दिवसांपूर्वी निफाड तालुक्यात वादळासह पाऊस बरसला. वादळाचा वेग प्रचंड असल्याने अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडली, तर काही ठिकाणी जनावरे दगावली.

दरम्यान, बुधवारी (दि. ७) देखील दुपारनंतर वादळाला सुरुवात झाली होती. मंगळवारी (दि. ६) वादळ व पावसामुळे तालुक्यातील १४४ हेक्टर क्षेत्रावरील पिकांना फटका बसला आहे. एकूण ३७४ शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. यात ८२ हेक्टर क्षेत्रातील कांदा पिकाचे नुकसान झाले आहे. ३६ हेक्टर क्षेत्रावरील उन्हाळी मका पिकाला फटका बसला आहे.

याबरोबरच २५ हेक्टर क्षेत्रावरील भाजीपाला पिकाचे नुकसान झाले असून, नुकसान झालेल्या सर्व पिकांचे पंचनामे करण्यात येणार आहेत, असे तालुका कृषी अधिकारी सुधाकर पवार यांनी म्हटले आहे. याबरोबरच पाचोरे बुद्रुक येथे वीज पडून म्हैस मृत्युमुखी पडली आहे.

> **तालुक्यातील शेतकरी नगदी पिकांना अधिक महत्त्व देत असल्याने अवकाळी पावसामुळे सर्वाधिक नुकसान उन्हाळ कांदा पिकाचे झाले आहे. त्याखालोखाल मका पिकाला फटका बसला असून, त्यानंतर टोमॅटो, गाजर, मेथी, मिरची, कोथिंबीर, कोबी, फ्लॉवर आदी भाजीपाला पिके वाया गेली आहेत. अवकाळीमुळे शेतकऱ्यांची हातची पिके वाया गेली. त्यामुळे या सर्व पिकांचे पंचनामे करण्यात येतील.**
>
> **- सुधाकर पवार,** तालुका कृषी अधिकारी, निफाड

> **माझे पंधरा ट्रॅक्टर कांदा काढून पडला आहे. अचानक पाऊस आल्याने प्लास्टिक कागद टाकला. मात्र, खालून पाणी गेल्याने सुमारे दोन ट्रॅक्टर कांदा सडून नुकसान झाले आहे. आमच्याकडे गारादेखील पडल्याने त्याचा फटका भाजीपाला पिकालासुद्धा बसला आहे.**
>
> **- हर्षल सांगळे, शेतकरी, शिवरे**

दिंडोरी, नांदूर मध्यमेश्वर येथे बेदाणा उत्पादक व्यापाऱ्यांचे शेड जमीनदोस्त झाल्याने त्याचे मोठे नुकसान झाले. नांदगाव, येवला, मालेगाव, परिसरातून मेंढपाळ मोठ्या संख्येने गोदाकाठ परिसरात दाखल झाले आहेत. मात्र, पावसामुळे संपूर्ण शिवार ओलेचिंब होऊन शेतात पाणी साचल्याने या कुटुंबांना रात्र जागून काढावी लागली. मुक्या प्राण्यांचेदेखील हाल झाले. अनेक ठिकाणी चाळीवरील पत्रे उडाले असून, चाळी दुरुस्तीच्या कामात शेतकरी व्यस्त आहेत.



# मनमाड बाजार समितीच्या हंगामी सभापतिपदी बिडगर

**मनमाड : प्रतिनिधी**

येथील बाजार समितीच्या संचालक मंडळाची मंगळवारी (दि. ६) आयोजित केलेल्या सर्वसाधारण सभेसाठी सभापती दीपक गोगड अनुपस्थित होते. त्यामुळे सभेला हजर असलेल्या दहा संचालकांनी एकमताने ठराव मांडून ॲड. गंगाधर बिडगर यांची हंगामी सभापतिपदी निवड केली. त्यानंतर त्यांच्या अध्यक्षतेखाली सभेचे कामकाज झाले.

सत्ताधारी गटातील दहा संचालकांनी सभापतीविरुद्ध दंड थोपटून सभा घेण्यासाठी उपोषण केले होते. त्याची दखल घेत सहकार विभागाचे जिल्हा उपनिबंधक फैयाज मुलाणी यांनी बाजार समितीच्या संचालकांना सात दिवसांची नोटीस देऊन सभा बोलाविण्याचा आदेश दिला होता. त्यानुसार ही सभी घेण्यात आली, अशी माहिती हंगामी सभापती ॲड. बिडगर यांनी दिली. या सभेत सभापती दीपक गोगड यांचे सर्व अधिकारी काढून घेणे, सचिवांचे निलंबन रद्द करणे आणि कर्मचाऱ्यांचा थकीत पगार अदा करणे आदी ठराव एकमताने मंजूर करण्यात आले आहेत.

या सभेला संजय पवार, किशोर लहाने, कैलास भाबड, विठ्ठल आहेर, अशोक पाटील, सुभाष उगले, दशरथ लहिरे, मधुकर उगले व सहाय्यक निबंधक चंद्रकांत विघ्ने आदींसह बाजार समितीचे कर्मचारी उपस्थित होते. हंगामी अध्यक्ष गंगाधर बिडगर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेत सभापती गोगड यांचे अधिकार काढून घेण्यात यावेत, त्यांनी मनमानी पद्धतीने निलंबित केलेल्या सचिवांचे निलंबन रद्द करणे आदी ठराव मंजूर करण्यात आले आहेत.

# समर्पण भावनेने कर्म केल्यास जगण्याचा खरा आनंद : पद्मश्री पतंगे

**नाशिक : प्रतिनिधी**

प्रत्येकाला ईश्वराने एक प्रकारची शक्ती दिली असून, तो त्याच्या क्षमतेनुसार त्याचा वापर करत असतो. म्हणूनच समर्पण भावनेने कर्म केल्यावर योगसाधना प्राप्त होते व जगण्याचा खरा आनंद मिळतो, असे प्रतिपादन संविधानाचे अभ्यासक पद्मश्री रमेश पतंगे यांनी केले.



सार्वजनिक वाचनालयाच्या मु. शं. औरंगाबादकर सभागृहात ज्ञानसाधना बहुद्देशीय विकास संस्थेतर्फे कमल ताडगे यांच्या स्मरणार्थ जिल्हास्तरीय शिक्षकेतर कर्मचारी उत्कृष्ट सेवा पुरस्कार सोहळा घेण्यात आला. त्यावेळी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते.

सावाना आणि नाशिक एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष प्रा. दिलीप फडके अध्यक्षस्थानी होते. नाशिक एज्युकेशन सोसायटीचे कार्यवाह राजेंद्र निकम, सामाजिक कार्यकर्ते अजित ताडगे, उद्योजक राजेश उपासनी, निवृत्त शिक्षिका कल्पना भामरे, ज्ञानसाधना बहुउद्देशीय विकास संस्थेचे अध्यक्ष राजाराम गायकवाड, उपाध्यक्ष वसंत पाटील, खजिनदार संगीता जाधव, विश्वस्त जयश्री उपासनी, सल्लागार सुहास कुलकर्णी, जगदीप कव्हाळ, प्रा. अमोल अहिरे, विश्वस्त संदीप पवार, सावानाचे ग्रंथसचिव देवदत्त जोशी, समीर जोशी आदी उपस्थित होते. प्रा. वसुधा जोशी यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. अमोल अहिरे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अर्चना डोकेफोडे, दिनेश पवार, अरविंद दिघे, किशोर ठाकूर, संजय परदेशी, ओमकार डावरे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

### यांचा झाला सन्मान

**लिपिक :** शरद केदारे (कुलसचिव), नंदू हिले, रेवती बुरकुले, संदीप मोरे, दीपक सोनवणे, दिगंबर जोशी, आरती रत्नपारखी, तुषार डोके (कार्यालयीन अधीक्षक), यशोधन मंडलिक, दशरथ बोराडे, रामदास धूम, विकास शेजवळ, भावेश चंद्रात्रे. **ग्रंथपाल :** विलास सोनार, स्नेहा पर्वते, उज्ज्वला कळमकर, स्वाती डावरे, प्रियंका कर्डक, संजय पवार, प्रज्ञा जोशी, राजाराम वाघ, किरण गीते, भारत गाडे. प्रयोगशाळा सहाय्यक : रमेश जेजुरकर, राजेंद्र मिश्रा, विकास जोशी, हरिष गवळी. **शिपाई/सेवक :** कचरू बोडके, शरद पिंगळे, माणिलाल पाठक, दिगंबर माळी, शिवाजी हिरे, दिगंबर निकम, चंद्रभान गायकवाड, उदय कुवर, दीपक साळवे, किरण गायकवाड.

# लासलगाव बाह्य वळण रस्त्याच्या कामाला तत्काळ सुरुवात

## माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळांच्या सूचनेनंतर प्रांताधिकारी, शेतकऱ्यांच्या बैठकीत निर्णय

**लासलगाव : वार्ताहर**

लासलगाव शहरातील बाह्य वळण रस्त्याच्या कामाला तत्काळ सुरुवात करण्याच्या सूचना प्रांताधिकारी शशिकांत मरुंगळे यांनी संबधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. लासलगाव बाह्य वळण रस्त्याचा प्रश्न मार्गी लागून वाहतुकीचा प्रश्न मार्गी लागणार आहे.



**लासलगाव : बाह्य वळण रस्त्याच्या भूसंपादनासंदर्भात आयोजित केलेल्या बैठकीला उपस्थित प्रांताधिकारी शशिकांत मंगरूळे, तहसीलदार विशाल नाईकवाडे, स्वीय सहाय्यक बाळासाहेब लोखंडे, बांधकाम विभागाचे उपअभियंता प्रकाश घोडे व शेतकरी बांधव.**

**(छायाचित्र : समीर पठाण)**

राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांच्या सूचनेनुसार बुधवारी शासकीय विश्रामगृह, लासलगाव येथे लासलगाव बाह्य वळणरस्त्याच्या भूसंपादनासंदर्भात बैठक घेण्यात आली. यावेळी प्रांताधिकारी शशिकांत मंगरूळे, तहसीलदार विशाल नाईकवाडे, बांधकाम विभागाचे उपअभियंता प्रकाश घोडे, शाखा अभियंता गणेश चौधरी, स्वीय सहाय्यक बाळासाहेब लोखंडे यांच्यासह लासलगाव, टाकळी, पिंपळगाव नजिक येथील मंडल अधिकारी, तलाठी व शेतकरी बांधव उपस्थित होते.

राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांच्या विशेष प्रयत्नांतून लासलगाव बाह्य वळण रस्त्याचे काम सुरू करण्यात आले आहे. या बाह्य वळण रस्त्यावरील रेल्वे उड्डाणपुलाचे कामदेखील पूर्ण झाले आहे. मात्र, काही शेतकरी बांधवांचे भूसंपादन राहिल्याने रस्त्याचे काम रखडले होते.

याबाबत शेतकरी बांधवांशी चर्चा करून प्रश्न तत्काळ मार्गी लावण्याच्या सूचना माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी प्रांताधिकाऱ्यांना केल्या होत्या. त्यानुसार काल प्रांताधिकारी मंगरूळे यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक घेण्यात आली.

यावेळी बाधित शेतकरी बांधवांशी सकारात्मक चर्चा होऊन तत्काळ काम करण्याच्या सूचना प्रांताधिकारी मंगरूळे यांनी संबंधित अधिकारी व ठेकेदारांना दिल्या आहेत.



### अनकुटे सोसायटीत महाराष्ट्र दिन उत्साहात

**येवला :** तालुक्यातील अनकुटे येथील विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या वतीने महाराष्ट्र दिन तसेच कामगार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेचे चेअरमन महेंद्र पगारे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी संस्थेचे व्हाइस चेअरमन संपत गोरे, सरपंच सुनीता गायकवाड, उपसरपंच भीमराज गायकवाड, माजी उपसरपंच गौतम पगारे, संचालक अरुण पवार, मनोहर गायकवाड, सुदाम गायकवाड, कैलास गायकवाड, गणेश वाघ, अरुण दाणे, सचिव श्रीमती निरभवण, ग्रामसेवक श्रीमती सोनवणे, श्रीमती कळसकर आदी उपस्थित होते.

गांवकरी



# सिन्नरला अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्याचा फटका

## बहुतेक ठिकाणी ५ ते १० तास बत्ती गुल, 'महावितरण'चे ४२ लाखांचे नुकसान

**सिन्नर : प्रतिनिधी**

**गेल्या दोन दिवसांपासून सिन्नर शहर आणि तालुक्यात अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्याने धुमाकूळ घातल्याने बहुतेक ठिकाणी ३३ आणि १२ केव्ही उच्चदाब आणि लघुदाब वाहिनीचे पोल उन्मळून पडल्याने शहरासह तालुक्यात वेगवेगळ्या भागात सुमारे ८ ते १० तास बत्ती गुल होती. महावितरणचे वादळी वाऱ्यामुळे सुमारे ४२ लाखांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. कडक उन्हाळा असला तरी सुमारे १८ ते २० किलोमीटर वेगाने वारे वाहत असल्याने तापमानात ३ ते ४ डिग्रीची घट झाल्याचे पाहायला मिळाले. दुसरीकडे उष्णतेमुळे हैराण झालेल्या नागरिकांना सोसाट्याच्या वाऱ्यामुळे काहीसा दिलासा मिळाला.**

महावितरणच्या सिन्नर २ उपविभागात लघुदाब वाहिनीचे ३०, ११ केव्हीचे १५ पोल उन्मळून पडले. तर ५ रोहित्र खराब झाले. सिन्नर शहरातून मातोश्री हॉस्पिटल जवळून जाणाऱ्या ३३ केव्ही लाईनवर दोन वृक्ष उन्मळून पडल्याने तेथील दोन पोल जमीनदोस्त झाले. परिणामी, दापूर उपकेंद्र आणि नांदूरशिंगोटे उपकेंद्रात सुमारे सात ते दहा तास वीजपुरवठा खंडित होता. उपकार्यकारी अभियंता विठ्ठल हारक यांच्यासह त्या - त्या उपकेंद्रातील अधिकाऱ्यांनी तातडीने कार्यवाही करत उन्मळून पडलेले पोल पुन्हा उभे करत वीजपुरवठा सुरळीत केला. सिन्नर -१ विभागात लघुदाब वाहिनीचे ३५ आणि उच्चदाब वाहिनीचे १२ पोल उन्मळून पडले. सोनांबे, आटकवडे, कुंदेवाडी, बेलू, माळेगाव, डुबेरे, ठाणगाव, मुसळगाव, माळेगाव एमआयडीसीतील काही भाग यामुळे प्रभावित झाला होता. त्या - त्या भागातील उच्च आणि लघुदाब वाहिनीचे पोल पुन्हा उभे करून येथील वीजपुरवठा पूर्ववत केल्याची माहिती उपकार्यकारी अभियंता हेमंत बनसोडे यांनी दिली.



### फळे, भाजीपाल्याचे २१ हेक्टर क्षेत्र बाधित

सोनांबे परिसरात सुमारे अर्धा ते पाऊण तास जोरदार गारपीट झाली. या गारपिटीत १८ शेतकऱ्यांचे ५ हेक्टरवरील भाजीपाला पीक उद्ध्वस्त झाले. कोनांबे परिसरातील १५ शेतकऱ्यांचे पाच हेक्टरवरील टोमॅटोचे नुकसान झाले. तर वडगाव सिन्नर येथे ९ शेतकऱ्यांचा ३ हेक्टर शेतात पडलेला कांदा भिजला. हरसुले येथे १२ शेतकऱ्यांचा ५ हेक्टरवर कांदा भिजून नुकसान झाले. नायगाव येथे ३ शेतकऱ्यांचे २ हेक्टर तर वडझिरे येथे १ शेतकऱ्याचे एक हेक्टर असे तीन हेक्टर आंब्याच्या बागेचे वादळी वाऱ्यामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. प्राथमिक स्वरूपात ही नुकसानीची आकडेवारी प्राप्त झाल्याची माहिती तहसीलदार सुरेंद्र देशमुख, नायब तहसीलदार सागर मुंदडा यांनी दिली.



### दोन ठिकाणी घरांची पडझड

जायगाव येथील राजेंद्र पुंडलिक गायकवाड यांच्या विटा – सिमेंटच्या राहत्या घरावर झाड पडून नुकसान झाले. त्यामुळे पत्रेही उडून गेले. याशिवाय, पास्ते येथील रमेश धोंडीराम माळी यांच्याही राहत्या घरावर झाड पडून पत्रे फुटल्यामुळे नुकसान झाले. दोन्हीही ठिकाणी कुठल्याही प्रकारे जीवितहानी झाली नाही.



## पिंपळगाव प्रीमिअर लीगमध्ये 'सिन्नर रॉयल्स ४० प्लस'चा दबदबा

**सिन्नर : प्रतिनिधी**

नाशिक जिल्ह्यातील पिंपळगाव प्रीमियर लीग २०२५ या टेनिस क्रिकेटच्या मानाच्या स्पर्धेत सिन्नर रॉयल्स ४० प्लस या संघाने तृतीय क्रमांकाचे बक्षीस पटकावून सिन्नर तालुक्याचे नाव उज्ज्वल केले आहे.

सिन्नरच्या ४० वर्षे पार केलेल्या खेळाडूंनी असे खेळाचे प्रदर्शन सादर केले की नवखेही फिके पडतील! दमदार खेळी, जिद्द, चिकाटी आणि संघभावनेचा उत्तम आदर्श त्यांनी घालून दिला. वय म्हणजे केवळ एक आकडा आहे हे या संघाने सिद्ध केलं.

संघमालक किरण जामकर व योगेश मंडलिक यांनी विशेष परिश्रम घेतले. कर्णधार नवनाथ माळी यांच्या नेतृत्वाखाली व नियोजक किरण गोजरे, शरद गोजरे, नवनाथ निकम व प्रा. गणेश शिरसाठ यांच्या उत्कृष्ट नियोजनाच्या जोरावर तसेच योगेश हिरे, राकेश सांगळे, जगन पाचोरे, बाळा पानसरे, अभि भावसार, सचिन म्हस्के यांनी सर्वोत्तम खेळाचे प्रदर्शन केले. संघ सहकारी सुनील शिरसाठ, दिगंबर मुसमाडे, सचिन उगले, अनिल शेळके, सोमा कुसरे, प्रसाद पाटोळे यावेळी उपस्थित होते. तसेच या स्पर्धेतील अंतिम दिवशी संघाला पाठिंबा देण्यासाठी सिन्नर स्पोर्ट्स असोसिएशनचे अध्यक्ष किरण भंडारी यांचीही उपस्थिती लाभली.

# अडचणींवर मात करून ध्येय गाठा : अक्षय पवार

## धोंडवीरनगर येथे नागरी सत्कार सोहळा

**सिन्नर : प्रतिनिधी**

प्रत्येक विद्यार्थी, तरुणाने आपले ध्येय ठरवून, त्या पद्धतीने अभ्यासाची तयारी करावी. आपल्या आवडत्या क्षेत्रात एक-एक पाऊल पुढे टाकत घवघवीत यश संपादन करावे. अडचणी येत असतात. अडचणींवर मात करून आपल्याला शिक्षण पूर्ण करायचे असते. पालक आपल्याला साथ देत असतात. आपण त्यांच्या स्वप्नपूर्तीसाठी व आपले ध्येय गाठण्यासाठी सातत्यपूर्ण अथक परिश्रम करावे. कुठे अडचण आल्यास आमच्यासारख्या मित्रांशी सल्लामसलत करून योग्य निर्णय घ्यावा, असे आवाहन यूपीएससी उत्तीर्ण सनदी अधिकारी अक्षय नलिनी विलास पवार यांनी केले.

तालुक्यातील धोंडवीरनगर येथे ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या वतीने गावचे भूमिपुत्र यूपीएससी परीक्षेत ६०४ व्या रँकने पास होऊन धोंडवीरनगरच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवणारे अक्षय नलिनी विलास पवार यांचा भव्य नागरी सत्कार सोहळ्यात मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

धोंडवीरनगरचे सरपंच विश्वास शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात व्यासपीठावर सनदी लेखापाल व श्रीनाम फाउंडेशनचे संस्थापक भारत सोनवणे, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक वाळूंज सर, उपसरपंच रतन सोनवणे, सदस्य संजय पवार, शालिनी पवार, नितीन सोनवणे, शिवाजी सोनवणे, कविता पवार व अक्षयचे वडील विलास पवार, आई नलिनी पवार व इतर ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

यूपीएससी, एमपीएससी व त्याव्यतिरिक्तही जीवन जगण्यासाठी व उत्कृष्ट ध्येय गाठण्यासाठी खूप काही आहे, त्या दिशा आपण शोधाव्या आणि त्याला गवसणी घालण्यासाठी प्रयत्न करावा. मी जरी यूपीएससी उत्तीर्ण होऊन सनदी अधिकारी झालो असलो तरी तमाम धोंडवीरनगरकरांच्या सेवेसाठी तत्पर राहील. यानंतर धोंडवीरनगरमधील प्रत्येक विद्यार्थ्याला मला जितके शक्य असेल तितके मार्गदर्शन व मदत करण्यासाठी मी कटिबद्ध राहील, अशी ग्वाही अक्षय पवार यांनी दिली.

तत्पूर्वी अक्षय पवार यांचे गावात आगमन होताच धोंडवीरनगर गावातून ढोल-ताशाच्या गजरात, फुलांची उधळण करत भव्य दिव्य मिरवणूक काढण्यात येऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी महिलांनी अक्षयचे औक्षण करत आशीर्वाद दिला. गावातील फुले स्मारकाला पुष्पहार अर्पण करत थोरामोठ्यांचे आशीर्वाद घेत अक्षय विचारमंचावर विराजमान झाला. धोंडवीरनगरचे माजी सरपंच भाऊसाहेब पवार यांनी अक्षयला संविधानाची प्रत देऊन सन्मान केला. यापुढे लोकसेवेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची सतत आठवण ठेवून उल्लेखनीय कामगिरी करावीस, अशी अपेक्षा व्यक्त केली. धोंडवीरनगरचे पोलीसपाटील बाळासाहेब पवार यांना नुकताच राज्यस्तरीय राज्यपाल आदर्श पोलीसपाटील पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्यामुळे त्यांचाही यावेळी शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

प्रास्ताविक माजी सरपंच भाऊसाहेब पवार यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. कृष्णा सोनवणे यांनी केले. बाळासाहेब पवार यांनी आभार मानले.

कार्यक्रमास सोपान पडवळ, माजी सैनिक घोटेकर, सुभाष पवार, सचिन पवार, नितीन पवार, दशरथ पवार, तानाजी शिंदे, शशिकांत सोनवणे, योगेश पवार, हभप बाळकृष्ण पवार आदींसह महिला बचत गटांच्या कार्यकर्त्या, आशा कार्यकर्त्या व ग्रामस्थ उपस्थित होते.

## कृषी सहाय्यक संघटनेचे सिन्नरला कार्यालयासमोर धरणे

### आंदोलनाचा तिसरा टप्पा; आज सामुहिक रजेवर जाणार

**सिन्नर : प्रतिनिधी**

कृषी सेवक पद रद्द करून नियमित नियुक्ती करावी यासह विविध मागण्यासाठी महाराष्ट्र राज्य कृषी सहायक संघटनेच्या सिन्नर शाखच्यावतीने काल (दि.७) तालुका कृषी अधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले.

कृषी सहाय्यकांच्या विविध मागण्यांसंदर्भात वारंवार पाठपुरावा करुनही शासनाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत नसल्याने संघटनेने आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. ६ टप्प्यांमध्ये आंदोलनाचे नियोजन करण्यात आले असून पहिल्या टप्प्यात सोमवारी (दि.५) पासून काळ्याफिती लावून कामकाज करण्यात आले. मंगळवारी (दि.६) कृषी सहाय्यक सर्व शासकीय व्हाट्सअप ग्रुप मधून बाहेर पडले. काल (दि.७) तालुका कृषी अधिकारी कार्यालयासमोर तालुक्यातील सर्व कृषी सहाय्यकांनी धरणे आंदोलन केले. यावेळी कृषी



सहाय्यकांनी जोरदार घोषणाबाजी करत मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, आज (दि.८) सर्व कृषी सहाय्यक एक दिवसाच्या सामूहिक रजेवर जाणार आहेत. त्यानंतर शुक्रवारी (दि.९) सर्व कृषी सहाय्यक सर्व प्रकारच्या ऑनलाईन कामकाजावर बहिष्कार टाकणार असून दि.१५ मे पर्यंत मागण्या मान्य झाल्या नाही तर कामकाज बंद आंदोलन सुरू केले जाईल असा इशारा यावेळी देण्यात आला. यावेळी कृषी सहाय्यक संघटनेचे जिल्हा कार्याध्यक्ष भास्कर आव्हाड, तालुकाध्यक्ष श्याम गडाख, नितीन खिंडकर, दिपक कुसळकर, केवलसिंग पवार आदींसह तालुक्यातील सर्व कृषी सहाय्यक उपस्थित होते.

**कृषी सहाय्यकांच्या मागण्या**

कृषी सेवक पद रद्द करून नियमित नियुक्ती करावी., कृषी सहाय्यकांच्या पदनामात बदल करून सहाय्यक कृषी अधिकारी करावे., कामकाजासाठी लॅपटॉप द्यावा, ग्राम स्तरावर कामकाजासाठी मदतनीस द्यावा, विविध निविष्ठा वाहतूक करण्यासाठी भाड्याची तरतूद करावी, आकृतीबंध मंजुरी देऊन कृषी पर्यवेक्षक ही पदे वाढवून कृषी सहाय्यकांच्या पदोन्नतीतील कुंठीत अवस्था दूर करावी, रोजगार हमी योजनेअंतर्गत लक्ष्य देताना क्षेत्रिय अडचणींचा विचार करावा.

## शेतकऱ्यांसाठी खरीप हंगामपूर्व नियोजन कार्यशाळा

### कृषिमंत्री ॲड. कोकाटेंच्या संकल्पनेतून कृषी विभागाचा उपक्रम

**सिन्नर : प्रतिनिधी**

राज्याचे कृषिमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांच्या संकल्पनेतून तालुका कृषी अधिकारी सिन्नर व राष्ट्रीय केमिकल फर्टिलाइझर्स यांच्या संयुक्त विद्यमाने काल (दि.६) येथील रामकमल लॉन्समध्ये तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी खरीप हंगामपूर्व नियोजन २०२५ कार्यशाळा- मेळावा घेण्यात आला.

तालुका कृषी अधिकारी ज्ञानेश्वर नाठे यांनी कार्यशाळेचे प्रास्ताविक केले. सकाळच्या सत्रात पिंपळगाव बसवंत येथील कांदा व द्राक्ष संशोधन केंद्राचे डॉ. राकेश सोनवणे यांनी कांदा व टोमॅटो पिकाबद्दल मार्गदर्शन केले. कुंदेवाडी येथील कृषी संशोधन केंद्राचे डॉ. योगेश पाटील यांनी माती तपासणी, मका व सोयाबीन लागवड व उत्पादन तंत्रज्ञानाबद्दल माहिती दिली. राष्ट्रीय केमिकल फर्टिलाइझर्सचे चेतन पाटील



यांनी त्यांच्या उत्पादनांबद्दल तर सुनील भिसे यांनी सोयाबीन ग्राम बीजोत्पादनाबद्दल माहिती दिली. पाणी फाउंडेशनचे प्रतिनिधी अजिंक्य गुरव यांनी डिजिटल शेतीशाळा व गटशेतीबद्दल माहिती देऊन संबंधित व्हिडिओ दाखवले.

दुपारच्या सत्रात शेतकऱ्यांना माती नमुना काढण्याची पद्धत, सोयाबीन बियाणे बीजप्रक्रिया, बियाणे उगवण क्षमता चाचणी, टोकन पद्धतीने सोयाबीन व मका लागवड, गादी वाफा पद्धतीने कांदा रोपवाटिका तयार करणे, हुमणी कीड व्यवस्थापन, लाईट ट्रॅपद्वारे, फेरोमन ट्रॅप, स्टिकी ट्रॅप प्रात्यक्षिक, बीबीएफ तंत्रज्ञान पद्धतीने लागवड, कीटकनाशकांची सुरक्षित हाताळणी, सीआरए फळबाग लागवड तंत्रज्ञान, जैविक निविष्ठा उत्पादन निर्मिती व जलतारा प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले होते व प्रत्यक्ष डेमो करून दाखविण्यात आले. कार्यशाळेचे सूत्रसंचालन बीटीएम निफाड संदीप बच्छाव यांनी केले. कार्यशाळा यशस्वीतेसाठी तालुक्यातील सर्व मंडळ कृषी अधिकारी, कृषी पर्यवेक्षक व कृषी सहाय्यक यांनी विशेष परिश्रम घेतले.

# नव्या पिढीला संस्कार मिळाले तरच संस्कृती टिकेल

## ठाणगावला दत्तचरित्र कथेत शंकर महाराज शेवाळे यांचे मार्गदर्शन

**ठाणगाव : वार्ताहर**

कलियुगात संस्कारक्षम पिढी घडविणे ही काळाची गरज बनली आहे. प्रभूंना जपा, दत्त महाराज तुम्हाला जपल्याशिवाय राहणार नाही, असा संदेश शंकर महाराज शेवाळे यांनी दिला.

ठाणगाव (ता. सिन्नर ) येथे श्री स्वामी समर्थ आध्यात्मिक व बालसंस्कार केंद्रातर्फे आयोजित श्री दत्तचरित्र संगीतमय चरित्रकथा कार्यक्रमात ते बोलत होते. पाश्चिमात्य संस्कृतीमुळे नवी पिढी संस्कार विसरली आहे. संस्कार नसल्याने संपूर्ण पिढी दु:खी, व्यसनी बनून अनेक संकटांशी झगडत आहे. योग्य वेळी संस्कार मिळाले तर संस्कृती टिकेल, संस्कृती टिकली तर धर्म टिकेल. विश्वाचे चालक, मालक श्रीदत्त महाराज आहेत. विश्वासाने सेवा मार्गात आल्यास सर्व अडचणी दूर होतील, असे शेवाळे महाराज यांनी विविध दृष्टांतातून सांगितले. यावेळी भगवंताची पूजा करताना स्त्रियांनी एकटीने करू नये. पती-पत्नीने सेवा




केल्यास त्याचे फळ लवकर प्राप्त होते. अंतःकाळात सुद्धा प्रभूचे स्मरण कसे करता येईल, याकडे संसार सागरातून तरायचे तर दत्त नावाने भवसागर तरुन जाता येऊ शकतो. माणसाने चिंता करू नये. चिंतेमुळे मानवाला अनेक विकार जडले जातात. तेव्हा चिंता करत बसू नका. भगवंताला शरण जा. दत्तप्रभू नरसिंह महाराजांची आराधना करावी. एक निष्ठेने भगवंताकडे बघून आपले नामस्मरण करत रहा. नरसिंह सरस्वती जन्माला आले तेव्हा ते ओमकाराचा जप करत होते. पण ते रडले नाही. या कलियुगामध्ये माणूस जन्माला आल्यापासून सतत रडत असतो, तेव्हा जीवनभर रडण्यापेक्षा भगवंताला शरण जा, त्याच्यात तुमच्या जीवनाचे सार्थक झाल्याशिवाय राहणार नाही.

### स्वत:साठी नव्हे, दुसऱ्यासाठी मागा

मन ताब्यात येण्यासाठी नमन केल्याशिवाय पर्याय नाही. परमेश्वराकडे काहीही मागताना दुसऱ्यासाठी मागा. आपल्या जीवनात काहीही कमी पडणार नाही. अध्यात्मावर सर्वांचा समान अधिकार आहे. प्रभू दत्तात्रेयांच्या इच्छेत मिळून रहा. आपल्या हातून कुणाची अवहेलना करू नका. मुलगा, मुलगी असा भेद करू नका, असे शेवाळे महाराज यांनी विविध दृष्टांतातून सांगितले.

---

**महत्त्वाचे**



## ठाणगाव विद्यालयाचा बारावीचा निकाल १०० टक्के

**ठाणगाव :** येथील रयत शिक्षण संस्थेच्या पुंजाजी रामजी भोर व डॉ. अण्णासाहेब शिंदे कनिष्ठ महाविद्यालयाचा एचएससी परीक्षेचा विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के, कला शाखेचा ९५ टक्के निकाल लागला आहे. विज्ञान शाखेतून आरती कारभारी बिन्नर-६४.६३ टक्के (प्रथम), तेजश्री सुदाम भालेराव-६३.५० (द्वितीय), भाग्यश्री सुदाम शिंदे -६२.५० (तृतीय), कला शाखेमध्ये ६५ पैकी ६२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यात मोहिनी संदीप बैरागी-६५.१७ टक्के (प्रथम), पूजा नंदू मुरकुटे-६२.८३ (द्वितीय), प्रियंका दत्तू सदगीर-६०.१७ टक्के (तृतीय) क्रमांक पटकावला. गुणवंत विद्यार्थ्यांना शाळेचे प्राचार्य के. एल. तळपाडे, एस. पी. रेवगडे, डी. एम. शिंदे, डी. व्ही. वाळूंज, व्ही. एस. वाकचौरे, एच. डी. कापडणीस यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे रयत शिक्षण संस्थेचे व्हा. चेअरमन भगीरथ शिंदे, पालक-शिक्षक संघ, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.



## सिन्नरला एमपीएससी-यूपीएससी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा गुणगौरव

**सिन्नर :** येथील श्री एज्युकेशन सोसायटीच्या वतीने बहुजन समाजातील स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण होऊन उच्चशिक्षित व वरच्या पदावर नियुक्त झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार व गौरव सोहळा उत्साहात झाला. संस्थेचे अध्यक्ष डॉ. जी. एल. पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात व्यासपीठावर संस्थेच्या उपाध्यक्ष लताताई पवार, सरचिटणीस डॉ. सुशील पवार, गोविंद मोरे, दत्ता वायचळे, मधुकर पवार, राज्यपाल पुरस्कारप्राप्त आदर्श पोलीसपाटील बाळकृष्ण पाटील आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस सरस्वती माता व शिक्षणाच्या प्रणेत्या सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून पूजन करण्यात आले. उपशिक्षक सुभाष सांगळे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी यूपीएससी उत्तीर्ण अक्षय पवार, समिता कातकाडे, सुजाता जाधव, एमपीएससी उत्तीर्ण मयुरी काळोखे, उज्ज्वला लोंढे, पूजा लोंढे, मनोज पवार, मिलिंद पवार, वृषाली जाधव, वनाधिकारी सचिन लोंढे, आदर्श पोलीसपाटील बाळकृष्ण पाटील आदींचा मान्यवरांच्या हस्ते गुलाबपुष्प, शाल, श्रीफळ व ट्रॉफी देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी या विद्यार्थ्यांनी शिक्षणाचे महत्त्व व आपण या परीक्षेत कोणत्या प्रकारे अभ्यास करून यश संपादन केले, याबद्दल मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांनी भरपूर मार्क मिळवण्याकरिता प्रयत्न करावे, असे आवाहन केले. सूत्रसंचालन विद्यालयाचे उपशिक्षक अशोक चौरे यांनी केले. उपशिक्षक रामकृष्ण मानकर यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका कल्पना खैरे, प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सविता शुक्ल, इंग्लिश मीडियमचे मुख्याध्यापक रवी मोरे आदींसह विद्यालयातील सर्व उपशिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.



## मंजूर बंधाऱ्याच्या दुरुस्तीचे काम वेळेत व उच्च दर्जाचे करा

### आ. आशुतोष काळेंच्या सूचना

**वावी : वार्ताहर**

मंजूर येथील कोल्हापूर टाइप बंधारा एक नव्हे, दोन नव्हे तर तब्बल तीन वेळेस पुराच्या पाण्याने वाहून गेल्यामुळे या भागातील शेतकऱ्यांचे भविष्य अंधःकारमय झाले होते. त्यामुळे या बंधाऱ्याची तातडीने दुरुस्ती व्हावी, अशी शेतकऱ्यांची मागणी होती व २०१९ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी या बंधाऱ्याचे शाश्वत व टिकाऊ काम करण्यासाठी निधी देणार असल्याचा शब्द मंजूर बंधाऱ्याच्या लाभधारक क्षेत्राच्या गावांतील शेतकऱ्यांना दिला होता. त्या शब्दाची पूर्तता करून राज्याचे मुख्यमंत्री तथा अर्थमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या सहकार्यातून ४१ कोटी रुपये निधी मंजूर बंधाऱ्याच्या दुरुस्तीसाठी दिला आहे. अशा मोठ्या कामासाठी शासनाकडून वारंवार निधी मिळत नाही. त्यामुळे मिळालेल्या निधीतून मंजूर बंधाऱ्याच्या दुरुस्तीचे काम वेळेत व उच्च दर्जाचे करा, अशा सूचना आ. आशुतोष काळे यांनी पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांना व संबंधित ठेकेदाराला दिल्या.

आ. आशुतोष काळे यांनी बुधवार, दि. ७ रोजी पाटबंधारे विभागाचे अधिकारी व मंजूर बंधाऱ्याच्या लाभक्षेत्राच्या गावांतील शेतकऱ्यांच्या समवेत मंजूर बंधाऱ्याच्या सुरू असलेल्या दुरुस्तीच्या कामाची पाहणी केली. यावेळी सुरू असलेल्या कामाचा पाटबंधारे विभागाचे अधिकारी व संबंधित ठेकेदाराकडून माहिती जाणून घेत आढावा घेतला. यावेळी ते बोलत होते.

ते म्हणाले की, कोपरगाव तालुक्याच्या पश्चिम भागातील मंजूर, चास नळी, हंडेवाडी, धामोरी, मायगाव देवी, कारवाडी, वेळापूर, बक्तरपूर आदी गावांतील शेती आणि शेतकऱ्यांसाठी महत्त्वपूर्ण असलेला मंजूर बंधारा तीन वेळेस वाहून गेल्यामुळे मंजूर बंधाऱ्याच्या लाभधारक क्षेत्रातील शेतकरी हवालदिल झाले होते. त्यामुळे मागील काही वर्षांपासून बंधाऱ्याची तातडीने दुरुस्ती व्हावी अशी शेतकऱ्यांची मागणी होती.

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक
# गांवकरी

■ gavakari.in ■ gavkarinews.com

■ नाशिक, गुरुवार, दि. ८ मे २०२५



▸▸ सुरगाणा तालुक्यात वादळी वाऱ्यामुळे गोपाळनगर येथील शाळेचे पत्रे उडाले ▸▸ नाशिक आज



▸▸ सिडकोत रस्त्यावर झाडे कोसळली ▸▸ नाशिक आज

## कारवाईपूर्वी १५ दिवसांत काय घडले?



- ▸▸ **२२ एप्रिल :** पहलगाममधील बैसरन व्हॅलीमध्ये दहशतवाद्यांनी पर्यटकांवर अंदाधुंद गोळीबार करत २६ जणांना ठार केले तर १७ जण जखमी झाले. भारताने या हल्ल्यासाठी ताबडतोब पाकिस्तानला जबाबदार धरले आणि पाकिस्तानी दहशतवादी गट द रेझिस्टन्स फ्रंट (टीआरएफ) आणि लष्कर-ए-तैयबा (एलईटी) यांच्यावर भ्याड हल्ला करण्याचा आरोप केला.
- ▸▸ **२३ एप्रिल :** भारताचा जलद प्रतिसाद राष्ट्रीय तपास संस्थेने तपास सुरू केला आणि गृह मंत्रालयाच्या आदेशानुसार, एनआयने पहलगाम हल्ल्याचा तपास हाती घेतला.
- ▸▸ **सिंधू पाणी करार निलंबित :** पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सुरक्षा मंत्रिमंडळ समितीच्या बैठकीत १९६० चा सिंधू पाणी करार अनिश्चित काळासाठी स्थगित करण्याचा निर्णय घेतला गेला.
- ▸▸ **अटारी-वाघा सीमा बंद :** भारताने पंजाबमधील अटारी-वाघा सीमा तपासणी नाका बंद केला, ज्यामुळे दोन्ही देशांमधील व्यापार आणि हालचाल पूर्णपणे ठप्प झाली.
- ▸▸ **पाकिस्तानी नागरिकांवर कारवाई :** भारताने पाकिस्तानी नागरिकांचे सर्व व्हिसा (सार्क, वैद्यकीय, इ.) तात्काळ प्रभावाने रद्द केले आणि पाकिस्तानी नागरिकांना ४८ तासांच्या आत भारत सोडण्याचे आदेश दिले. भारताने इस्लामाबादमधील भारतीय मिशन आणि नवी दिल्लीतील पाकिस्तान उच्चायोगातील कर्मचाऱ्यांची संख्या ५५ वरून ३० पर्यंत कमी केली. पाकिस्तान उच्चायोगातील संरक्षण, नौदल आणि हवाई दल सल्लागारांना पर्सोना नॉन ग्राटा घोषित करण्यात आले आणि एका आठवड्यात भारत सोडण्याचे आदेश दिले गेले.
- ▸▸ **२४-२७ एप्रिल :** सिंधू जल संधी कराराला स्थगिती दिल्याच्या प्रत्युत्तरात पाकिस्तानकडून शस्त्रसंधीचे उल्लंघन केले गेले. पाकिस्तानी सैन्याने बारामुल्ला, कुपवाडा, पूंछ आणि अखनूर सारख्या भागात नियंत्रण रेषेवर सतत गोळीबार सुरू केला. भारतीय लष्कराने याला जोरदार प्रत्युत्तर दिले जात आहे.
- ▸▸ जम्मू आणि काश्मीरमध्ये सुरक्षेच्या कारणास्तव ४८ पर्यटन स्थळे बंद करण्यात आली तर बैसरण खोऱ्यात सुरक्षा व्यवस्था आणखी कडक करण्यात आली.
- ▸▸ **२८-३० एप्रिल :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरक्षा आढावा बैठकीत सशस्त्र दलांना पूर्ण ऑपरेशनल स्वातंत्र्य दिले आणि हल्ल्याला प्रत्युत्तर देण्याची वेळ, लक्ष्य आणि पद्धत ठरवण्याचे अधिकार सैन्यावर सोपवले.
- ▸▸ भारताने पाकिस्तानला फायनान्शियल ॲक्शन टास्क फोर्समध्ये पुन्हा ग्रे लिस्टमध्ये टाकण्याची प्रक्रिया सुरू केली. तांत्रिक गुप्तचर सूत्रांच्या माध्यमातून भारताने पहलगाम हल्ल्यात टीआरएफ आणि लष्कर-ए-तैयबाची भूमिका दर्शविणारे पुरावे सादर केले. अमेरिका, ब्रिटन आणि फ्रान्स सारख्या २० हून अधिक सदस्य देशांनी भारताला पाठिंबा दिला.
- ▸▸ **१ मे :** भारताने पाकिस्तानी विमानांसाठी आपले हवाई क्षेत्र पूर्णपणे बंद केले. यासोबतच पाकिस्तानहून येणाऱ्या सर्व टपाल आणि पार्सल सेवा (हवाई आणि जमीन) तत्काळ बंद करण्यात आल्या
- ▸▸ **२-६ मे :** अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी भारत-पाकिस्तानच्या नेत्यांशी संवाद साधला आणि दोन्ही बाजूंना तणाव कमी करण्याचे आवाहन केले.
- ▸▸ **७ मे :** ऑपरेशन सिंदूरफ अंतर्गत भारताने पाकिस्तानमधील मुरीदके, कोटली, मुझफ्फराबाद आणि बहावलपूर अशा नऊ दहशतवाद्यांच्या अड्ड्यांवर अचूक लष्करी हल्ले केले. यामध्ये लष्कर-ए-तैयबा आणि दहशतवादी तळांना लक्ष्य करण्यात आले.

# सरकारला पूर्ण पाठिंबा; मात्र भारताला सतर्क राहावे लागेल

## शरद पवार : नरेंद्र मोदी अन् राजनाथ सिंह यांना केला फोन

**पुणे : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पार्टीचे अध्यक्ष शरद पवार यांनी ऑपरेशन सिंदूरच्या निमित्तानं भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्याशी संवाद साधला आहे.**



शरद पवार यांनी त्यांच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवरील पोस्टद्वारे नरेंद्र मोदी आणि राजनाथ सिंह यांच्याशी साधलेल्या संवादाबद्दल माहिती दिली. ते म्हणाले, ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान आणि संरक्षणमंत्री यांच्याशी संवाद साधला. भारतीय सशस्त्र दलांच्या प्रयत्नांचे कौतुक केले आणि त्यांनी केलेल्या कारवाईसाठी त्यांचे अभिनंदनही केले. या कठीण काळात सरकारला आमचा पूर्ण पाठिंबा असल्याची ग्वाही दिली.

संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली उद्या सर्वपक्षीय बैठकीचे आयोजन केले जाणार आहे. या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून खासदार सुप्रिया सुळे सहभागी होतील. भारतीय सैन्य दलांच्या ऑपरेशन सिंदूरनंतर शरद पवारांनी सकाळी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी केंद्र सरकारच्या सोबत असल्याचे सांगितले. गेल्या आठवड्यात जे काही काश्मीरमध्ये घडले, त्यामुळे साहजिक देशात लोकांमध्ये एक अस्वस्थता होती. भारत आणि पाकिस्तान यांमध्ये पीओके जो त्यांनी ४८ मध्ये घेतला, तिथेच हे हल्ला करण्याचे स्थान केंद्रित केल्याचे दिसत आहे. हिंदुस्थान आणि पाकिस्तान बॉर्डर ओलांडून आपण जाऊ इच्छित नव्हतो आणि त्याची काळजी भारतीय हवाई दलाने घेतली आहे. काश्मीरमधील विधानसभेत हल्ल्याच्या विरोधात ठराव झाला. ओमर अब्दुल्ला यांनी स्वच्छ भूमिका दहशतवादाविरोधात घेतली, असं शरद पवार म्हणाले.

या हल्ल्याच्या नंतर अमेरिका, जपान आणि इतर देश यांनी भारताला समर्थन दिलं आहे. काळजी करण्यासारखी गोष्ट आहे की, चीनने समर्थन दिलं नाही, त्यामुळं सतर्क राहण्याची स्थिती आहे. पाकिस्तान माहिती नाही पण त्यांना त्यांची ताकद आणि भारताची ताकद माहिती आहे. या गोष्टीत आपल्याला सावध राहावे लागेल. पाकिस्तानची आर्थिक कोंडी कशी करता येईल हे धोरण चुकीचं नाही. या मोहिमेला ऑपरेशन सिंदूर हे जे नाव दिलं ते योग्य दिलं गेलं, असंही शरद पवार म्हणाले.



## दहा पाकिस्तानी जवान ठार

**नवी दिल्ली :** भारताने पाकिस्तानी दहशतवाद्यांना ठार करण्यासाठी राबवलेल्या ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानच्या सैन्याने आता सीमेवर शस्त्रसंधीचे उल्लंघन करत भारतीय सैन्यावर गोळीबार केला. त्यामध्ये दहा भारतीय नागरिकांचा मृत्यू झाला. भारताच्या प्रत्युत्तरात १० पाकिस्तानी जवान ठार झाले आहेत. सीमेवर परिस्थिती चिघळू नये अशी भारताची इच्छा आहे. परंतु पाकिस्तानने तणाव वाढवला तर त्याला उत्तर देणार असल्याचं भारताने आधीच स्पष्ट केले आहे.

## सहा वर्षांनंतर संधी साधलीच दहशतवाद्यांचे ते २ तळही बेचिराख

**नवी दिल्ली :** ऑपरेशन सिंदूर राबवत भारतानं पहलगाम हल्ल्याचा बदला घेतला आहे. पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील ९ दहशतवादी तळ बेचिराख केले. यातील ५ तळ पाकिस्तानमधील, तर ४ तळ पीओकेमधील आहेत.

विशेष म्हणजे, २०१९ मध्ये झालेल्या बालाकोट एअर स्ट्राइकवेळी भारतीय सैन्यानं सोडून दिलेल्या २ तळांवरही यंदा स्ट्राइक करण्यात आला. भारतीय सैन्याच्या हल्ल्यात दोन्ही तळ जमीनदोस्त झाले.

ऑपरेशन सिंदूरमध्ये दहशतवाद्यांचे ९ तळ उद्ध्वस्त करण्यात आले. त्यामध्ये बहावलपूर आणि कोटलीमधील तळांचादेखील समावेश आहे. हे दोन्ही तळ बालाकोट एअर स्ट्राइकवेळीही भारतीय सैन्याच्या रडारवर होते. पण दोन्ही तळांवरील हल्ला आक्रमक कारवाई मानला जाण्याची शक्यता असल्यानं त्यांच्यावर क्षेपणास्त्रं डागली गेली नाहीत. विशेष म्हणजे बहावलपूरमध्ये जैश-ए-मोहम्मदचं मुख्यालय आहे.

## भारतीय सेनेच्या शौर्याला सलाम : उद्धव ठाकरे

**मुंबई :** भारतीय सैन्याने पाकड्यांच्या दहशतवादी स्थळांवर केलेला हल्ला अभिमानास्पद आहे.



पहलगाममध्ये २६ मायभगिनींचे कुंकू पुसणाऱ्या दहशतवाद्यांचा खात्मा करून सैन्याने बदला घेतल्याचे उद्धव ठाकरे म्हणाले. पाकिस्तानचे भारतातील स्लीपर्स सेल उद्ध्वस्त करून दहशतवादाचे समूळ उच्चाटन करणे गरजेचे आहे. भारतीय सैन्य सर्व प्रकारच्या परिस्थितीशी सामना करण्यास सक्षम असल्याचे ऑपरेशन सिंदूरने ते दाखवून दिले. भारतीय सेनेच्या शौर्याला शिवसेनेचा सलाम, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

# अतिरेक्यांना शोधून काढण्यात केंद्र सरकारला अद्याप यश नाही

## ऑपरेशन सिंदूरनंतर राज ठाकरेंची मोदींवर टीका

**मुंबई :** पहलगाम दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून भारतीय सैन्याने मंगळवारी रात्री पाकव्याप्त काश्मीरमध्ये विमानांच्या सहाय्याने क्षेपणास्त्रांचा मारा करून दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले. या पार्श्वभूमीवर देशभरातून पंतप्रधान मोदी आणि केंद्र सरकारच्या निर्णयक्षमतेचे कौतुक होत असताना मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी मोदींना खडे बोल सुनावले आहेत.



पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील अतिरेक्यांना शोधून काढण्यात केंद्र सरकारला अद्याप यश आलेले नाही. दहशतवाद्यांच्या पुढच्या पिढ्यांनाही लक्षात राहील, असा धडा शिकवणे गरजेचे होते. अशावेळी पाकिस्तानशी युद्ध करणे किंवा मॉकड्रिल आणि एअरस्ट्राइक या गोष्टी फायद्याच्या नाहीत. पाकिस्तान हा अगोदरच बर्बाद झालेला देश आहे. त्यांना आणखी काय बर्बाद करणार? अमेरिकेत दहशतवाद्यांनी ट्विन टॉवर पाडले आणि पँटागॉनवर हल्ला केला तेव्हा अमेरिकेन त्या दहशतवाद्यांना शोधून ठार मारले. त्यामुळे दहशतवादी हल्ल्याला युद्ध हे प्रत्युत्तर नसते. त्यामुळे देशात मॉकड्रिल करण्याऐवजी कोम्बिंग ऑपरेशन करा. देशातील आपलेच प्रश्न संपत नाही, अशा परिस्थितीत युद्धाला सामोरे जाणे योग्य गोष्ट नाही, असे परखड मत राज ठाकरे यांनी व्यक्त केले.

सरकार जिथे चुकते तिथे चुका दाखवल्याच पाहिजेत. पहलगाम दहशतवादी हल्ल्यावेळी पंतप्रधान मोदी सौदी अरेबियात होते. तो दौरा अर्धवट सोडून ते भारतात आले आणि थेट बिहारला प्रचाराला गेले. ही गोष्ट करण्याची गरज नव्हती. त्यानंतर मोदी केरळमध्ये अदानींच्या बंदराचे उद्घाटन करायला गेले. यानंतर त्यांनी फिल्म इंडस्ट्रीशी संबंधित व्हेव कार्यक्रमाला उपस्थिती लावली. इतकी गंभीर परिस्थिती असताना या गोष्टी टाळता आल्या असत्या, असे खडे बोल राज ठाकरे यांनी सुनावले.



# आधी सिंधू, मग सिंदूर

## सोशल मीडियावर सैन्याचे कौतुक

**नाशिक : प्रतिनिधी**

काश्मीरमध्ये निष्पाप नागरिकांना जीव गमवावा लागल्यानंतर देशात संतापाची लाट उसळली होती. त्याचा बदला म्हणून भारतीय लष्कराने ऑपरेशन सिंदूरअंतर्गत पाकव्याप्त भागात एअर स्ट्राइक करत ठोस कारवाई केली. या कारवाईचे पडसाद काल (दि.७) सोशल मीडियावर उमटले. या कारवाईनंतर भारतीय जवानांचे आणि देशाचे नेतृत्व करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे जोरदार कौतुक करीत नागरिकांकडून विविध जोशपूर्ण संदेश व्हायरल होत आहेत. सोशल मीडियावर ऑपरेशन सिंदूर संदेशचा मोठा ट्रेंड दिसून आला.

राजकीय वर्तुळातही या कारवाईचे समर्थन होत असून, देश फक्त सहन करीत नाही तर प्रत्युत्तर देतो, असा निर्धार पुन्हा एकदा दिसून आला. अनेकांनी पाकिस्तानमध्ये रात्री दोन वाजता सूर्योदय झाला असल्याचे संदेश, असे कुठे असते का? मॉकड्रिल पाकिस्तानमध्ये करणार असे सांगितले नाही. अखेर न्याय झालाच, ऑपरेशन सिंदूर ज्यांच्या कपाळावर सिंदूर होता त्यांच्या आयुष्याचा अर्थ बदलला आणि भारताने त्या सिंदुराचा मान राखण्यासाठी इतिहास घडविला. आधी सिंधू, मग सिंदूर, आज धूर, कदाचित उद्या फक्त..., मॉकड्रिल भारतात आणि बॉम्ब फुटले पाकिस्तानात जय हिंद, सायरन वाजला की, सगळ्यांनी लाईट बंद करायची आणि पार्किंग एरियात यायचे आणि गो पाकिस्तान गो म्हणायचे, ५६ इंच घर मे घुस के मारा आदी संदेश नेटकऱ्यांनी व्हायरल केले. राजकारण बाजूला ठेवत ऑपरेशन सिंदूरचे कौतुक केले. यामध्ये राज ठाकरे यांनी पहलगाम हल्ला झाला त्या दहशतवाद्यांवर कठोर कारवाई व्हायला हवी. युद्ध हा काही पर्याय होऊ शकत नाही. मॉकड्रिल करण्यापेक्षा कोम्बिंग ऑपरेशन करा, असेही संदेशात म्हटले आहे.

## सायरन वाजला अन्.. 'केटीएचएम'मध्ये मॉकड्रिल

# शत्रूशी सामना करण्यासाठी हैं तय्यार हम..!

**नाशिक : प्रतिनिधी**

**गंगापूर रोडवरील केटीएचएम महाविद्यालय परिसरात शत्रू राष्ट्राची लढाऊ विमाने घिरट्या घालत असल्याचा संदेश जिल्हाधिकारी कार्यालयाला प्राप्त होताच, घटनास्थळी सायरन वाजवत अलर्ट देण्यात आला. मात्र, परिसरातील नागरिक सावध होत नाही तोच चार बॉम्बस्फोट अन् हवाई हल्ला झाला.**

प्रशासनाकडून तत्काळ घटनास्थळी बचावकार्यासाठी रुग्णवाहिका, अग्निशमन दल, गृहरक्षक दल, नागरी संरक्षण दलाचे कर्मचारी यांना पाचारण करत मदतकार्य करण्यात आले. परिसरात मोठी धावपळ सुरू होती. पोलीस प्रशासनाकडून गर्दीवर नियंत्रण ठेवण्यात येत होते.

यात दहा नागरिक गंभीर जखमी झाले, तर पहिल्या मजल्यावरील तीन नागरिकांना अग्निशमन दलाच्या जवानांकडून त्यांना रोप-वेने रेस्कू करत वाचविण्यात आले. हे बचावकार्य जवळपास अर्ध्या तासाहून अधिक वेळानंतर संपले.

बॉम्बस्फोट व हवाई हल्ल्यानंतरच्या बचावकार्याच्या थराराचे मॉकड्रिल बुधवार, दि. ७ मे रोजी केटीएचएम महाविद्यालयातील प्रांगणात प्रशासनाकडून करण्यात आले. शस्त्रूच्या कारवायांशी सामना करण्यासाठी सज्ज असल्याचे दाखवून दिले.

पहलगाम (जम्मू-काश्मीर) येथे झालेल्या भारतीय पर्यटकांवरील हल्ल्यानंतर आक्रमक झालेल्या भारताने पाकिस्तानवर मंगळवारी (दि. ६) रात्री एअर स्ट्राइक करत ऑपरेशन सिंदूर राबवून चोख प्रत्युत्तर दिले.

भारत-पाकिस्तान दरम्यान युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाल्याचे चित्र असल्याने केंद्रीय गृहमंत्रालयाद्वारे देशभरातील संवेदनशील जिल्ह्यांत बुधवारी (दि. ७) मॉकड्रिल करण्याचे निर्देश राज्यांना दिले होते. त्यानुसार नाशिक शहरात मॉकड्रिल झाले.

याप्रसंगी जिल्हाधिकारी जलज शर्मा, निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र वाघ, मविप्रचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, नागरी संरक्षण दलाचे उपनियंत्रक अतुल जगताप, सहाय्यक उपनियंत्रक देवेंद्र बावस्कर, भद्रकालीच्या विभागीय क्षेत्ररक्षक मंगला काकड, सरकारवाडा विभागीय क्षेत्ररक्षक मीनाक्षी गवळी, पंचवटीचे विभागीय क्षेत्ररक्षक मनोहर जगताप, सातपूरचे विभागीय क्षेत्ररक्षक शुभम क्षीरसागर, मुख्य अग्निशमन अधिकारी संजय बैरागी, उपमुख्य अग्निशमन अधिकारी आर. एम. बैरागी, इन्सिडंट कमांडर कंट्रोलर योगेंद्र पाटील आदी उपस्थित होते.

> मॉकड्रिलच्या माध्यमातून प्रशासनाशी समन्वय व सुसज्जता याचा अंदाज घेण्यात आला. नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत संरक्षण देण्यासाठी जिल्हा प्रशासन व नागरी संरक्षण दल सदैव सज्ज राहील.
> **- जलज शर्मा, जिल्हाधिकारी**



















### ब्लॅकआउटसंबंधी लवकरच सूचना

मॉकड्रिलसह ब्लॅकआउट करण्याच्या सूचना केंद्रीय गृहविभागाकडून देण्यात आल्या होत्या. मात्र, बुधवारी (दि. ७ मे) फक्त मुंबईत ब्लॅकआउट करण्यात आला. नाशिक शहरात किती वेळासाठी आणि कधी ब्लॅकआउट करायचा, यासंबंधीच्या सूचना लवकरच देण्यात येतील, अशी माहिती जिल्हाधिकारी शर्मा यांनी दिली.

### अशा प्रकारे दिली जाते हवाई हल्ल्याची सूचना

हवाई हल्ल्याची सूचना सर्वप्रथम रडारमार्फत वायुदलाला प्राप्त होते. त्यानंतर वायुदलाकडून हल्ल्याची सूचना नागरी संरक्षण दलाला दिली जाते. नागरी संरक्षण दलाकडून जिल्हा प्रशासनाला कळविले जाते. जिल्हा प्रशासनाकडून शत्रूची विमाने आल्याचा सायरन वाजून नागरिकांना अलर्ट करण्यात येते.

### बचावकार्याचा थरार

नागरी संरक्षण दलाच्या प्रशिक्षित स्वयंसेवकांनी बॉम्बहल्ल्यामुळे ठिकठिकाणी लागलेली आग स्टीअर पंपाचा वापर करून विझवली, तर गंभीर दहा जखमींना घटनास्थळी प्राथमिक उपचार केले. हवाई हल्ल्यातील जखमींना रुग्णालयात हलविण्यासाठी त्वरेने दोन रुग्णवाहिकांनाही पाचारण करण्यात आले. त्याद्वारे जखमींना रुग्णालयात हलविले.

यावेळी परिसरातील गर्दी गृहरक्षक दलाच्या जवानांनी नियंत्रणात आणली. याचवेळी एनसीसी व एनवायकेचे विद्यार्थीही मदतीला धावून आले. त्यांनी जखमींना बँडेज बांधत फर्स्ट एड पोस्टवर पोहोचविण्यास मदत केली. यावेळी अग्निशमन दलाच्या जवानांनी पहिल्या मजल्यावर लागलेली आग पाण्याचा फवारा मारून विझवली. यावेळी शिडी लावून गंभीर जखमींना खाली आणण्यात आले. एका जखमीला रोप-वेच्या सहाय्याने रेस्क्यू करण्यात आले.



◀◀ पाकवर हवाई हल्ला; शेअर बाजार घसरला ◀◀ पान ३


नाशिक आज

# गांवकरी

■ नाशिक, गुरुवार, दि. ८ मे २०२५





◀◀ नेस्ले इंडियाच्या स्वयंचलित वितरण केंद्राचे उद्घाटन ◀◀ पान ३

## महत्त्वाचे ▶▶▶▶

### बावनकुळे यांच्या विधानाचा निषेध

**कसबे-सुकेणे :** भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी नुकतेच काँग्रेस पक्ष फोडा व काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते भाजपात सामील करा, असे विधान केले होते. या विधानाचा निफाड तालुका काँग्रेसतर्फे समाचार घेण्यात आला. बावनकुळे यांचे ते विधान हास्यास्पद असल्याचे सांगितले. काँग्रेस पक्ष एक विचारधारा असून, स्वातंत्र्यपूर्व काळापासून अनेक लोक या पक्षाशी जोडले गेले आहेत. हा पक्ष संपणारा नसून, भविष्यात निश्चितपणे पुन्हा उभारी घेणार आहे. त्यामुळे बावनकुळे यांनी केलेले विधान मागे घ्यावे व देशातील जनतेची माफी मागावी, असे मत निफाड तालुका काँग्रेसचे अध्यक्ष बाबूराव ऊर्फ विजय जाधव यांनी व्यक्त केले आहे.

### मोकाट कुत्र्यांबाबत आयुक्तांना निवेदन

**नाशिकरोड : प्रतिनिधी** पळसे गावात गेल्या आठवड्यात पिसाळलेल्या कुत्र्याने दहा-बारा नागरिकांना चावा घेऊन गंभीर जखमी केले होते. त्या पार्श्वभूमीवर काल नाशिक महापालिका आयुक्त मनीषा खत्री यांची पळसे येथील शिष्टमंडळाने भेट घेतली. त्यांना महापालिका मोकाट कुत्रे ग्रामीण भागात सोडत असल्याबाबत शिवसेना उपजिल्हाप्रमुख सुनील गायधनी, माजी सरपंच अजित गायधनी यांनी निवेदन देऊन चर्चा केली. यावेळी शिष्टमंडळाने पळसेसह ग्रामीण भागात महापालिका पथकाकडून रात्री अंधाराचा फायदा घेत मनपा हद्दीत पकडलेली भटकी कुत्री नाशिकरोडच्या पूर्व भागातील ग्रामीण भागात सोडली जातात. संबंधित विभागाला सूचित करून मोकाट कुत्रे ग्रामीण भागात सोडू नये, यासंदर्भात शिष्टमंडळाने आयुक्त खत्री यांच्याशी चर्चा केली. शहानिशा करून योग्य विचार करत संबंधितांना तशा सूचना देऊ, असे आयुक्त खत्री यांनी सांगितले. यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख सुनील गायधनी, माजी सरपंच अजित गायधनी, दिलीप गायधनी, शिवसेना शाखाप्रमुख प्रकाश गायधनी, सुनील पवार आदी उपस्थित होते.

### तालाभिषेक बैठकीत प्रकट मुलाखत

**नाशिक : प्रतिनिधी**
पवार तबला अकादमी आणि अल्पारंभ एज्युकेशनल अ‍ॅण्ड कल्चरल फाउंडेशन आयोजित नाशिककरांसाठी 'तालाभिषेक बैठक' ही संगीत मैफल १० मे रोजी सायंकाळी सहा वाजता होणार आहे. हा कार्यक्रम विशाखा सभागृह, कुसुमाग्रज स्मारक, गंगापूर रोड येथे होईल. पहिल्या दिवशी ज्येष्ठ शास्त्रीय गायिका, रचनाकार व गुरू विदुषी डॉ. अलका देव-मारुलकर यांची प्रकट मुलाखत आयोजित केली आहे. ज्येष्ठ पत्रकार वंदना अत्रे त्यांच्याशी संवाद साधतील. या संगीत संवादात डॉ. मारुलकर यांच्या शिष्या शिवानी दसककर आणि कल्याणी तत्त्ववादी त्यांना गायन साथ करतील. ईश्वरी कदडी (संवादिनी), तर सुजित काळे व सारंग तत्त्ववादी (तबला) साथसंगत करतील. दुसऱ्या दिवशी ११ मे रोजी सायंकाळी सहा वाजता अकादमीचा विद्यार्थी अद्वय पवार याचे स्वतंत्र तबलावादन होईल. गायक पं. अविराज तायडे यांचा षष्ट्यब्दिपूर्तीनिमित्त ज्येष्ठ शास्त्रीय गायिका डॉ. अलका देव मारुलकर यांच्या हस्ते अभीष्टचिंतन सोहळा होणार आहे. मैफलीच्या उत्तरार्धात पं. अविराज तायडे यांचे शिष्य ज्ञानेश्वर कासार यांचे गायन होईल.

# दोन हजार हेक्टर क्षेत्राला अवकाळीचा तडाखा

## सुमारे साडेआठ हजार शेतकऱ्यांचे नुकसान

**नाशिक : प्रतिनिधी**

जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून झालेल्या अवकाळी पावसामुळे जिल्ह्यातील ३४३ गावांतील ८ हजार ६४१ शेतकऱ्यांना फटका बसला असून, १ हजार ९३० हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहेत. यात कांदा, गहू, टोमॅटो, भाजीपाला या पिकांसह द्राक्ष, आंबा, डाळिंब या फळबागांचे नुकसान झाले आहे.

अवकाळीचा सर्वाधिक फटका सुरगाणा तालुक्याला बसला आहे. तालुक्यातील १४१ गावे बाधित झाले असून, ३ हजार ८४४ शेतकऱ्यांचे ५०३ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. वादळी वाऱ्यासह झालेल्या अवकाळी पावसामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मोठे नुकसान सहन करावे लागले आहे. तर जिल्ह्याच्या काही तालुक्यांत गारपीटदेखील झाल्याने नुकसानीचे प्रमाण वाढले आहे. एप्रिल महिन्याच्या सुरुवातीलादेखील जिल्ह्यातील काही तालुक्यांना अवकाळी पावसाचा फटका बसला होता. वातावरणात बदल होऊन ऐन उन्हाळ्यात कोसळत असलेल्या अवकाळी पावसामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना शासनाकडून मदत मिळावी, अशी अपेक्षा शेतकऱ्यांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

| तालुका | बाधित गावे | शेतकरी | हेक्टर |
|---|---|---|---|
| मालेगाव | ८ | ३७० | २०० |
| सटाणा | १३ | ८५५ | ३१६ |
| नांदगाव | २ | २८ | १६.४० |
| कळवण | ६६ | ९६२ | ३५७.५० |
| दिंडोरी | ३२ | २२४ | ८७.६० |
| सुरगाणा | १४१ | ३८४४ | ५०३ |
| नाशिक | ४ | १५ | ८.५० |
| त्र्यंबकेश्वर | ९ | ६७ | २८.५० |
| पेठ | १२ | १५४ | ७८ |
| इगतपुरी | ११ | १०६ | १४४.३० |
| निफाड | २७ | ३७४ | २१ |
| सिन्नर | ६ | ५८ | १३९.७० |
| चांदवड | १२ | १५८४ | १३९.७० |
| एकूण | ३४३ | ८६४१ | १९३० |

### कांदापिकाचे सर्वाधिक नुकसान

अवकाळीमुळे जिल्ह्यातील ७९५ हेक्टरवरील कांदापिकाचे नुकसान झाले आहे. तर ३३२ हेक्टरवरील भाजीपाला मातीमोल झाला आहे. ६९५ हेक्टरवरील फळबागांचे नुकसान झाले आहे. ५२४ हेक्टरवरील आंब्याच्या फळबागांचे नुकसान झाले आहे.



वादळी वाऱ्यामुळे रस्त्यावर कोसळलेले झाड हटवताना महापालिकेचे कर्मचारी. (छायाचित्र : दिलीपराज सोनार)

## सिडकोत रस्त्यावर कोसळली झाडे

### तातडीने बाजूला करून वाहतूक सुरळीत

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

बेमोसमी वादळी वाऱ्यासह पावसामुळे मोरवाडीतील शाळेच्या आवारात, तसेच मनपा सिडको विभागीय कार्यालय, कामटवाडे रोडवरील श्री सप्तशृंगीदेवी मंदिरासमोर रस्त्यालगत असलेले जुने कडुनिंबाचे झाड कोसळले. काही काळ रस्त्यावरील वाहतूक पूर्णतः ठप्प झाली होती. स्थानिकांनी तातडीने महापालिकेला माहिती दिल्यानंतर उद्यान व बांधकाम विभागाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी तत्काळ झाड तोडण्याचे काम सुरू केले.

झाड कोसळल्याने दोन्ही बाजूंच्या वाहनांची वाहतूक अडथळ्यामुळे थांबली होती. रस्त्याच्या मधोमध झाड आडवे कोसळल्याने अपघाताची शक्यता निर्माण झाली होती. मात्र, स्थानिक नागरिकांनी जागरूकतेने वाहनांना इतर मार्गाने वळवले. महापालिकेच्या उद्यान विभागाचे कर्मचारी व बांधकाम विभागाच्या मदतीने जेसीबीच्या सहाय्याने झाडाच्या फांद्या बाजूला करण्यात आल्या. फांद्या तोडण्याच्या कामासाठी एक तास लागला. काम पूर्ण झाल्यानंतर रस्ता पुन्हा वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. महापालिकेच्या यंत्रणेने वेळीच प्रतिसाद दिला नसता तर मोठा अपघात होऊ शकला असता, असे रहिवाशांनी सांगितले.

मनपाच्या सिडको विभागीय कार्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळ असलेले वाळलेले झाड उन्मळून पडले. मोरवाडी येथील शाळेच्या प्रांगणात असलेले जुने झाड कोसळले. सुदैवाने कोणतीही जीवितहानी व वित्तहानी झाली नाही. दरम्यान, या तिन्ही ठिकाणी उन्मळून पडलेली झाडे अग्निशमन दलाचे जवान, तसेच मनपा कर्मचारी व नागरिकांच्या मदतीने तत्काळ हटविण्यात आले.

या घटनेमुळे शहरातील जुन्या झाडांची तपासणी करणे, त्यांची वेळोवेळी छाटणी करणे किती आवश्यक आहे, हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. महापालिकेने अशा धोकादायक झाडांची नोंद घेऊन योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

## नाशिकरोडला पावसाने झोडपले

**नाशिकरोड : वार्ताहर**

नाशिकरोड व परिसरात गारांसह जोरदार पाऊस झाला. ऐनवेळी आलेल्या पावसाने रस्त्याच्या कडेला असणाऱ्या दुकानदारांची तारांबळ उडाली.

अनेकांना आपले विक्री साहित्य आवरणे मुश्कील झाले. या पावसाबरोबरच सोसाट्याचा वारा असल्याने नाशिकरोडमधील आनंदनगर, धोंगडे मळा, चेहडी पंपिंग, जेलरोड परिसरातील रस्त्यांवर छोटी-मोठी सुमारे ४० च्या वर झाडे कोसळली. त्यामुळे अग्निशमन दलाला येणाऱ्या दूरध्वनीवरील तक्रारींना आम्हाला सामोरे जाणे कठीण झाले, अशी माहिती नाशिकरोड अग्निशमन दलाचे लिडींग फायरमन एम. के. साळवे यांनी दिली. रात्रीही ९ च्या सुमारास परिसरात पुन्हा वादळी वाऱ्यासह पावसाने जोरदार हल्ला केला. त्यात टपोऱ्या गारांचा वर्षाव होत होता. त्यातही झाडे पडल्याने आमच्या फायरमनने शक्य होईल तेवढी रस्त्यावर आडवी पडलेली झाडे तोडून रस्ता वाहनांसाठी मोकळा करून दिला. काल दि. ७ रोजी सकाळपासून रात्रीपर्यंत हे काम चालू होते, असेही ते म्हणाले.

तब्बल अडीच ते तीन तास हा पाऊस झाल्याने संध्याकाळी असलेल्या विवाहसोहळ्यास आलेल्या पाहुण्यांना रात्री साडेदहा वाजेपर्यंत मंडपातच राहावे लागले. झाडे पडल्यामुळे रस्त्यावर वाहनांची कोंडी झाली होती. त्यात वारा, पाऊस, गारा यांचा वर्षावही होत होता. जेलरोड, नाशिकरोड पूर्व भाग, विहितगाव ते थेट भगूरपर्यंत या बेमोसमी पावसाने सर्वांचीच त्रेधातिरपीट उडविली. त्यात विजेचा लपंडावही सुरू होता.

### पावसामुळे घरांचेही नुकसान

अवकाळीमुळे जिल्ह्यातील २९९ घरांची पडझड झाली आहे. यात पेठ तालुक्यातील सर्वाधिक १०१ घरांची पडझड झाली आहे. तर त्याखालोखाल कळवण तालुक्यातील ५९, बागलाण तालुक्यातील २२, मालेगाव तालुक्यातील २१ घरांचे नुकसान झाले आहे. त्याचप्रमाणे एका कांदाचाळ, दोन शाळा व एका प्राथमिक आरोग्य केंद्राचे नुकसान झाले आहे.

## अवकाळीचा तडाखा; शहरात ३५ झाडे कोसळली

### विजेच्या लपंडावामुळे नागरिक त्रस्त

**नाशिक : प्रतिनिधी**



शहरात अवकाळी पावसासह वादळी वाऱ्याच्या तडाख्यात मंगळवारी (दि. ६) रात्री वेगवेगळ्या भागांत ३५ झाडे कोसळल्याची घटना घडली. सुदैवाने यात जीवितहानी झाली नसल्याचे अग्निशमन दलाने म्हटले आहे.

दरम्यान, शहरातील सहाही विभागांत मंगळवारी रात्री दहापासून ते मध्यरात्रीपर्यंत जोरदार वादळामुळे गुलमोहरासह इतर झाडे उन्मळून पडली. वाऱ्याबरोबरच पावसाच्या जोरदार सरींमुळे विजेचा लपंडाव रात्रभर सुरू होता.

जिल्ह्यातील काही भागांत दोन-तीन दिवसांपूर्वी वादळी वाऱ्यासह गारपीट झाली. त्यानंतर मंगळवारी शहरात सायंकाळी आकाशात आभाळ दाटून आल्याचे चित्र होते. साधारणतः रात्री दहानंतर शहरात विजांच्या कडकडाटासह वादळी वारे व पावसाने दमदार हजेरी लावली. अनेक ठिकाणी वीजवाहिन्यांवर झाडांच्या फांद्या पडल्याने संबंधित परिसरात वीजपुरवठा खंडित झाला. महावितरणने खबरदारीचा भाग म्हणून शहरातील वीजपुरवठा खंडित केल्याचे चित्र होते. गेल्या काही दिवसांपासून तीव्र उन्हामुळे नागरिक त्रस्त असून, नागरिकांनी दुपारी घराबाहेर पडणे बंद केले आहे. मंगळवारी शहरातील बहुतेक भागांत रात्री वीजपुरवठा खंडित झाल्याने नागरिकांचे हाल झाले. कमालीचा उकाडा तसेच डासांच्या प्रादुर्भावामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागला. वीजपुरवठा खंडित असल्याने नागरिक महावितरणशी संपर्क साधून वीजपुरवठा सुरळीत कधी होणार? याबाबत चौकशी करत होते. दरम्यान, अग्निशमन दलाच्या मुख्य कार्यालयासह विभागातील कार्यालयात बुधवारीही (दि. ७) झाडे कोसळल्याच्या तक्रारी येत होत्या.

**शहरात पडलेली झाडे**

| | |
|---|---|
| नाशिकरोड | १० |
| सिडको | १० |
| सातपूर | ०५ |
| पंचवटी | ०५ |
| शिंगाडा तलाव | ०६ |

## शेतमालाचे पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत द्यावी

### 'माकपा'ची तहसीलदारांकडे मागणी

**नाशिक : प्रतिनिधी**

अवकाळी पावसामुळे सुरगाणा तालुक्यातील शेतकऱ्यांचे आंब्यासह कांदा, मका, चवळी, तुती, पोल्ट्रीफार्म, बांधकाम सुरू असलेली घरे, कडबा यांचे नुकसान झाले. शाळेचे पत्रेही उडून गेले. याबाबत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षातर्फे तहसीलदार, कृषी अधिकारी, गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात येऊन पंचनामे करण्याची मागणी करण्यात आली.

शासनाने संबंधित तलाठी, कृषी अधिकारी, ग्रामसेवक यांना शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसान झालेल्या शेतमालाचे त्वरित पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी म्हणून मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षातर्फे तहसीलदार, कृषी अधिकारी, गटविकास अधिकारी यांना इंद्रजित गावित, भिका राठोड, विजय घांगळे, वसंत बागूल, देवीदास गावित, भरत पवार, चंद्रकांत वाघेरे, सरपंच गिरीश गायकवाड, प्रल्हाद चौधरी, मुकुंदा गावित, शिवराम गावित, केदू वाघमारे, शिवदास सहारे, चंदर वाघमारे यांच्यासह ग्रामस्थांतर्फे तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.



**"सुरगाणा तालुक्यात वादळी वारा व पावसामुळे बोरीपाडा (चा), गोपाळनगर येथील शाळेचे पत्रे उडाले, तसेच संरक्षक भिंत पडली. जिल्हा परिषद शाळा खांदुर्डी-काठीपाडा येथील शाळेचे छत उडून गेले. पावसामुळे शालेय साहित्याचेही नुकसान झाले. लवकरच शासनाकडे नवीन इमारत व संरक्षक भिंतीसाठी पाठपुरावा करणार आहोत.**

**- रोहिणी वाघेरे, सरपंच, ग्रा.पं., काठीपाडा**

## मंत्री तटकरेंच्या उपस्थितीत आज योजनांचे लोकार्पण

**नाशिक : प्रतिनिधी**

जिल्हा परिषद नाशिक अंतर्गत महिला व बालविकास विभाग तसेच आरोग्य विभागाच्या वतीने एकूण १४ विविध उपक्रमांचा लोकार्पण व लाभार्थी वितरण कार्यक्रम महिला व बालविकास मंत्री ना. अदिती तटकरे यांच्या हस्ते गुरुवारी दि. ८ मे रोजी सकाळी १० वाजता महाकवी कालिदास कलामंदिर येथे होणार आहे.

जिल्हा परिषदेच्या महिला व बालविकास विभाग व आरोग्य विभागाच्या वतीने नाशिक जिल्ह्यात विविध नावीन्यपूर्ण उपक्रम आयोजित करण्यात आले आहे. त्यात १०० टक्के स्वमालकीच्या अंगणवाडी केंद्राचे विद्युतीकरण, डिजिटल अंगणवाडीचे उद्घाटन, पिंक रिक्षा वाटप, मेन्स्टुअल कप वाटप, आरबीएसके पोर्टलचे अनावरण इत्यादी विविध उपक्रमांचा लोकार्पण सोहळा तसेच महिला व बालविकास विभागाच्या विविध योजनांच्या लाभार्थ्यांना लाभ वाटप राज्याच्या महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांच्या हस्ते करण्यात येईल, अशी माहिती जिल्हा परिषदेच्या महिला व बालविकास विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रताप पाटील यांनी दिली.

## सुप्रीम निकालानंतर इच्छुकांना नगरसेवकपदाचे वेध

**नाशिक : प्रतिनिधी**



स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चार महिन्यांत घ्या, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतर गेल्या तीन वर्षांपासून महापालिका निवडणुकीची तयारी करणाऱ्या इच्छुकांच्या आशा पल्लवित झाल्या असून, त्यांना नगरसेवकपदाचे वेध लागले आहेत.

सन २०१७ च्या महापालिका निवडणुकीनंतर मनपाची निवडणूक न झाल्याने २०२२ पासून शहरात प्रशासकीय राजवट सुरू आहे. प्रशासकीय राजवटीत नागरिकांची कामे होत नाहीत, असा आरोप राजकीय नेत्यांकडून करण्यात येत होता. त्याचप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकर व्हाव्यात, अशी मागणी करण्यात येत होती. अखेर सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानंतर सप्टेंबरच्या आधी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होण्याची शक्यता आहे. परिणामी, गेल्या काही वर्षांपासून नगरसेवक होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या इच्छुकांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. निवडणुका होतील, या आशेवर इच्छुकांकडून मोठ्या प्रमाणात जनसंपर्क साधत प्रभागातील नागरिकांसाठी वेगवेगळे कार्यक्रम, शिबिरे घेतली. त्याचप्रमाणे सणावाराच्या काळात बॅनरबाजी करीत नागरिकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला. मात्र, निवडणुकाच होत नसल्याने इच्छुकांना सर्व खर्च डोईजड झाला. अखेर आता निवडणुकांचा मार्ग मोकळा झाल्याने राजकीय पक्षांकडून पुन्हा तयारीला सुरुवात करण्यात येणार आहे. सन २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत महायुतीने दणदणीत विजय मिळविल्याने महायुतीचे पारडे जड मानण्यात येते. विरोधी पक्षांकडूनही विधानसभेतील पराभवाची कसर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भरून काढण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

### इच्छुक सुरक्षित पर्यायाच्या शोधात

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार असल्याने इच्छुक सुरक्षित पर्यायाच्या शोधात आहेत. विधानसभा निवडणुकीत महायुतीला भरभरून यश मिळाल्याने सर्वांचा ओढा महायुतीकडे आहे. महाविकास आघाडीतील इच्छुकांकडून सुरक्षित पर्यायाच्या शोधात भाजप, शिवसेनेत प्रवेश करणाऱ्यांची संख्या वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे येत्या काळात पक्षांतरांचे जोरदार वारे वाहणार आहेत. महायुतीतही महाविकास आघाडीतील इच्छुक आल्यास महायुतीतीलही अनेक नेते दुसऱ्या पक्षात प्रवेश करण्याचा अंदाज आहे.**

अग्रलेख



# अखेर निवडणुकांचा मार्ग मोकळा

न्यायाला विलंब म्हणजे न्याय नाकारण्यासारखे असते. आज या उक्तीची पुन्हा आठवण झाली ती, सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भात दिलेल्या एका निर्णयामुळे. उशिरा का होईना; परंतु सर्वोच्च न्यायालयाने तारीख पे तारीखमध्ये न पडता निवडणुकांचा मार्ग मोकळा केला ते बरे झाले. त्याबदल सर्वोच्च न्यायालयाचे आभार मानावे तेवढे कमीच आहेत. सत्तेतून समाजकारण आणि समाजकारणातून विकासाची प्रगती व्हावी, यासाठी पंचायत राज कायदा करणाऱ्या भारत देशात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतून निवडून आलेल्या प्रतिनिधींना जनतेचे प्रश्न मांडण्याची चांगली संधी मिळते. निधीचे वाटप गरजूंपर्यंत पोहोचण्यास मदत होते. महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदांच्या निवडणुका दर पाच वर्षांनी होतात. त्यातून लोकप्रतिनिधी निवडून येतात. महाराष्ट्रातील या निवडणुकांना गेले तीन ते साडेतीन वर्षे सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या एका याचिकेमुळे खो बसला होता. त्यामुळे आयुक्त दर्जाचा सनदी अधिकारी प्रशासकाच्या भूमिकेतून महापालिकेचा कारभार सांभाळत होता. लोकसभा, विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीनंतर आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कधी होणार याकडे सर्वांच्या नजरा लागल्या होत्या. राज्यातील रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चार महिन्यांत घेण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी दिल्याने, गुडघ्याला बाशिंग बांधून बसलेले राजकीय पक्षाचे माजी नगरसेवक, इच्छुक पदाधिकाऱ्यांना दिलासा मिळाला आहे. त्याचबरोबर, नागरी सुविधासंदर्भात स्थानिक पातळीवर कोणाकडे बाजू मांडायची या विवंचनेत असलेल्या सर्वसामान्य नागरिकांना आधार मिळणार आहे. राज्यातील ओबीसी आरक्षणाच्या मुद्यावर या निवडणुकांचे घोंगडं इतकी वर्ष प्रलंबित होते. मात्र, यंदाच्या निवडणुका घेताना, सन २०२२ मध्ये सादर झालेल्या बांठिया कमिशनच्या अहवालानुसार आधी अस्तित्वात असलेल्या ओबीसी आरक्षणानुसारच घेण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाकडून दिल्याने, ओबीसी आरक्षणाला सध्या तरी धक्का बसणार नाही, हे अधोरेखित झाले. १९९४ ते २०२२ पर्यंत ओबीसी आरक्षणाची जी परिस्थिती होती, तीच परिस्थिती कायम राहणार आहे. तसेच, सर्वोच्च न्यायालयाने या संदर्भातील याचिका पुढील सुनावणीसाठी ठेवली आहे. त्यावरील निकाल कधी लागेल हे आता सांगणे कठीण आहे. मात्र, यातून सुवर्णमध्य काढून सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्रात निवडणूक कार्यक्रम जाहीर करा असे आदेश राज्य निवडणूक आयोगाला देण्याचा शहाणपणा याआधी ज्यांच्याकडे हे प्रकरण सुनावणीसाठी आले त्यांनी घेतला असता तर, बरं झालं असते.

बांठिया कमिशनच्या अहवालानंतर ऑगस्ट २०२२ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत परिस्थिती 'जैसे थे' ठेवण्याचे निर्देश दिले होते. यासंदर्भात दाखल सर्व याचिकांवर मंगळवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. ज्यात केंद्र सरकारतर्फे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी प्रलंबित निवडणुका व्हायला हव्यात, अशी भूमिका मांडली, तर विरोधक याचिकाकर्त्यांकडून ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ इंदिरा जयसिंह यांच्याकडून निवडणुका या २०२० च्या बांठिया कमिशन रिपोर्टमधील शिफारशींनुसारच घ्याव्यात, असा युक्तिवाद करण्यात आला होता. राज्यात पाच वर्षांपेक्षा अनेक प्रकरणात प्रशासक कार्यरत आहे. लोकप्रतिनिधींनी लोकल बॉडी चालवल्या पाहिजेत अशी राज्यघटनेत तरतूद आहे. पण त्या विपरीत हे सुरू आहे. औरंगाबाद आणि नवी मुंबईत पाच वर्षांपेक्षा अधिक काळ प्रशासकांचा आहे, ही बाब सर्वोच्च न्यायालयाच्या निदर्शनास आली होती. लोकशाहीसाठी हे योग्य नसल्याचे ही कोर्टाच्या लक्षात आले. विशेष म्हणजे सुनावणी दरम्यान ओबीसी आरक्षणाशी संबंधित कुठल्याही याचिकेचा या निवडणुकांवर परिणाम होणार नाही. कारण यापुढे येणारे निकाल हे न्यायालयाच्या अंतिम निकालावर अवलंबून असतील. आरक्षणाच्या मुद्द्यावर इतकी वर्षे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका न घेणे हे योग्य नाही. भारतीय संविधानाने नागरिकांना दिलेल्या मूलभूत अधिकारांचे रक्षण होणेही तितकेच गरजेचे आहे, अशी टिप्पणी यावेळी सर्वोच्च न्यायालयाने केली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे राज्यातील मुंबई, ठाणे, पुणे, नाशिकसह १४ महापालिकेच्या निवडणुका येत्या सप्टेंबरपर्यंत होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. आपल्या देशात न्यायव्यवस्थेला आदराचे स्थान आहे. त्यामुळे न्यायालयाकडून आलेल्या निर्णयाकडे प्रशासन ही गांभीर्याने पाहतो. मात्र, गेल्या काही वर्षातील न्यायालयाकडून आलेले निर्णय, निकाल पाहता, ते व्यक्तीसाक्षेप असल्याचे दिसून आले आहेत. न्यायदानाच्या खुर्चीत जो बसतो, तो आपल्या आकलनशक्तीने कायद्याच्या भाषेत त्याचे प्रमाण ठरवून निर्णय देत असतो. त्यामुळे, अनेकदा असे म्हटले जाते की, न्यायालयाकडून मिळतो तो न्याय नव्हे, तर केवळ एक निर्णय असतो. भारताने लोकशाही प्रणाली स्वीकारली आहे. जनतेतून निवडून आलेले प्रतिनिधी राज्य कारभार सांभाळतात. त्यामुळे स्थानिक पातळीवर 'मिनी राज्य कारभार' चालविणाऱ्या महापालिकासारख्या निवडणुका गेले तीन वर्षे झाल्या नाहीत, ही बाब न्यायालयाच्या निदर्शनास येऊनही या आधीच्या खंडपीठाने त्याकडे तितकेसे गांभीर्याने का घेतले नाही, असा मनात प्रश्न उपस्थित झाला, तर ती चूक म्हणता येत नाही.

# 'ऑपरेशन सिंदूर'चे 'बहावलपूर'

दि. २२ एप्रिलपासून संपूर्ण देश अस्वस्थ होता. युद्धस्य कथा रम्य: या उक्तीनुसार विविध वयोगटातील मंडळी उतावीळ झालेली होती आणि महत्त्वाचे म्हणजे, यावेळी कधी नव्हे ते ज्येष्ठ नागरिक यामध्ये सर्वांत पुढे होते. याच काळात एक विनोद ऐकायला मिळत होता, ज्येष्ठ नागरिकांच्या ग्रुपमधून. 'रात्रीतून रोज तीन वेळा उठतो आणि टीव्ही लावून पाहतो युद्ध सुरू झाले का?' असो! सर्वांत प्रथम भारतीय सैन्याचे आपण धन्यवाद मानू या! अभिनंदन करू या! भारतातील सर्व पक्षांचे एकमताने समर्थन असल्याने, त्यांचेही धन्यवाद मानले पाहिजे. संसदीय इतिहास बघितला तर या सर्व पक्षांचे आपणास फक्त दोनच घटनांमध्ये एकमत दिसून येते. संसदेमध्ये एकमताने सर्वांचे 'वेतन व भत्ते' वाढवण्यासाठी. रात्रभर विविध मुद्द्यांवर संसद गाजवणारे हे पक्ष मात्र स्वतःचे 'वेतन व भत्ते' वाढवण्याचा विषय आला, की एका मिनिटाच्या आत हा विषय संपवतात. आणि सर्वानुमते एकमताने वेतन व भत्ते मंजूर करतात.

दुसरी घटना म्हणजे परकीय आक्रमणावेळी! दुसरे कारण मात्र पूर्ण समर्थनीय आहे. संपूर्ण देश एकजूट आहे हे जगासमोर दिसून येते. त्यामुळे पुनश्च सर्वांचे धन्यवाद व अभिनंदन! मंगळवारी सहा मेच्या रात्री एक ते दोनच्या दरम्यान भारताने नऊ ठिकाणी वायुदलाद्वारे हल्ले केले. काही सीमारेषेपासून आठ किलोमीटर तर काही सीमारेषेपासून शंभर किलोमीटरपर्यंत होते. पाकिस्तानचा पंजाब प्रांत सोडला तर बाकी प्रांतामध्ये कोणताही विकास नाही. कोणत्याही इतर प्रांताला महत्त्व नाही. ते सर्व उपेक्षित प्रांत आहेत. त्यामध्ये सिंध प्रांत बलुचिस्तान, आझाद काश्मीर, गिलकिट बाल्टीस्थान येतात. पंजाब प्रांत सोडला तर इतर ठिकाणी कितीही हल्ले झाले, कितीही वाईट परिस्थिती आली तरी पाकिस्तानी राजकीय व मिलिटरी शासकांना फारसा फरक पडत नाही. पण महत्त्वाची बाब म्हणजे, या 'ऑपरेशन सिंदूर' नावाच्या भारताने केलेल्या हवाई हल्ल्यांमध्ये एका हल्ल्याचे ठिकाण असे आहे की, जे आपल्या सीमारेषेपासून तब्बल १०० किलोमीटर दूर आहे.

पाकिस्तानचा मुख्य प्रांत म्हणजे पंजाबमधील आहे. त्याचे नाव बहावलपूर. हे पंजाबमधील महत्त्वाचे शहर. पूर्ण पाकिस्तानमधील बाराव्या क्रमांकाचे शहर. हे स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये बहावलपूर संस्थान म्हणून प्रसिद्ध होते. हे संस्थान अब्बासी घराणे चालवत होते आणि १८०२ मध्ये ब्रिटिशांशी तह करून त्यांनी त्यांच्या संरक्षणात राहणं स्वीकारले होते. संस्थानाचे शासक नवाब म्हणून ओळखले जात. संस्थानांना भारत अथवा पाकिस्तान यामध्ये सामील होण्याचा किंवा स्वतंत्र राहण्याचा पर्याय देण्यात आला होता. बहावलपूरचे नवाब सादिक मोहम्मद खान यांनी पाकिस्तानमध्ये सामील होण्याचा निर्णय घेतला. १४ व १५ ऑगस्टला भारत व पाकिस्तानच्या फाळणीच्या पार्श्वभूमीवर जी एकूण ११ संस्थानं पाकिस्तानमध्ये सामील झाली. त्यामधील सर्वांत प्रथम सामील झालेले संस्थान म्हणजे बहावलपूर. नवाबाला पाचवे नवाब असे म्हणत. तो बॅरिस्टर जिना यांचा खास मित्र होता. सुरुवातीस संस्थानास काही प्रमाणात स्वायत्तता देण्यात आली होती, परंतु १९५५ मध्ये पाकिस्तान सरकारने अंतर्गत सर्व पश्चिम पाकिस्तानी संस्थानांचे एकत्रिकरण केले. या बहावलपूर संस्थानमध्ये लोकसंख्येच्या दृष्टीने मुस्लिम जनता बहुसंख्य असल्याने तसेच हे संस्थान पंजाब भागात असल्याने भारताने या संस्थानचा भारतात विलीनीकरण संबंधी विचारच केला नव्हता. या धोरणानुसार बहावलपूरचे स्वतंत्र अस्तित्व समाप्त होऊन ते पश्चिम पाकिस्तान प्रांतात समाविष्ट झाले. पाकिस्तानमध्ये सामील होणारे हे पहिले संस्थान ठरले. तरीही सामील होण्यास ५ ऑक्टोबर १९४७ हा दिवस उजाडला. विशेष म्हणजे, याच नवाब सादिक मोहम्मद





भारताभोवतालचे अस्वस्थ वर्तमान

हेमंत चोपडे
७३५०७०५०९१

खानने पाकिस्तान उभारणीसाठी सात करोड रुपये दिले. आणि बहावलपूर हे पश्चिम पाकिस्तानचा एक भाग झाले. या नावाचा सन्मान म्हणून आणि मैत्रीला जागत मोहम्मद अली जिना म्हणजे पाकिस्तानकडून सादिक मोहम्मद खान यांना वर्षाचे ३२ लाख रुपये सन्मान राशी मिळण्याची व्यवस्था केली. आजच्या घडीला मात्र या नावाचे वंशज राजकीयदृष्ट्या उपेक्षित आहेत. त्यांना राज्य व देशपातळीवर कुठेही किंमत नाही. स्थानिक लोकांमध्ये संस्थानाच्या विलीनीकरणानंतर असंतोषही निर्माण झाला. विशेषत: १९७० नंतर जेव्हा प्रांत पुन्हा विभागले गेले, परंतु बहावलपूरला स्वतंत्र प्रांतिक दर्जा देण्यात आला नाही.

सिंधू नदीच्या परिक्षेत्रातील हा प्रांत. जैश-ए-महम्मदचे हेडक्वार्टर बहावलपूर अशा या बहावलपूर संस्थानच्या मुख्य शहरात, म्हणजे बहावलपूरमधील जैश-ए-मोहम्मदचे मुख्यालय भारतीय सेनेने ऑपरेशन सिंदूर अंतर्गत केलेल्या हल्ल्यामध्ये उद्ध्वस्त केले आहे. मौलाना मसूद अझहर हा या आतंकवादी संघटनेचा संस्थापक. जैश-ए-मोहम्मद ही एक पाकिस्तानस्थित इस्लामी दहशतवादी संघटना याच शहरातील त्याची संघटना. कारगिल युद्धानंतर हे इस्लामसाठी मरण्यास तयार असणारे तरुण दहशतवादी तयार करणे व त्यास प्रशिक्षण देणे यासाठीचे प्रशिक्षण केंद्र.

कारगिल युद्धानंतर २००० मध्ये जैश-ए-मोहम्मद संघटनेची त्याने स्थापना केली. मौलाना मसूद अजहर हा भारताच्या ताब्यात होता. त्याला भारताने पकडलेले होते. पण कंधार प्रकरणात १९९९ मध्ये इंडियन एअरलाइन्स-८१४ अपहरण प्रकरणात भारताने स्वत:हून त्याला अफगाणिस्तानमध्ये सोडले होते. यानेच नंतर भारतामध्ये झालेल्या अनेक हल्ल्यांत प्रमुख खलनायकी भूमिका निभावली आहे. २००१ मधील भारतीय संसदेवरचा हल्ला, २०१६ मधील उरी हल्ला तसेच २०१९ मधील पुलवामा हल्ला, यामध्ये ४० जवान शहीद झाले होते आणि याची जबाबदारी जैश-ए- मोहम्मदचा म्होरक्या मौलाना मसूद अजहरने घेतली होती. भारताने याला मोस्ट आतंकवादी म्हणून घोषित केले होतेच. तसेच २०१९ मध्ये संयुक्त राष्ट्र संघानेसुद्धा आंतरराष्ट्रीय दहशतवादी घोषित केले. या ठिकाणाहून आंतरराष्ट्रीय दहशतवादी कारवायांचे कूट नियोजन होत असे. या सर्वांस ऑपरेशन सिंदूरने हरताळ फासला आहे. या कारवाईत बहावलपूरमधील ''मारकज सुभान अल्लाह'' या जैशच्या मुख्य प्रशिक्षण केंद्राचा मोठ्या प्रमाणावर नाश झाला आहे.

आजच्या दिवशी बहावलपूरमधील जैश-ए-मोहम्मदचे मुख्यालय पूर्णपणे निष्क्रिय झाले असून, भारतीय कारवाईमुळे त्याच्या दहशतवादी कारवायांना मोठा आघात बसला आहे. त्याचे कुटुंब पूर्णपणे संपले असून, तो एकटाच आता जिवंत आहे.

पाकिस्तानमध्ये विलीन झालेल्या प्रत्येक प्रांताचा असा वेगळा इतिहास आहे. जगातील एकमेव आपला भारत देश आहे, जो तीन-चार दशकापासून जागतिक आतंकवादी व त्यांच्या संघटनेविरुद्ध एकाकी लढतो आहे. अमेरिकेचे ट्वीन टॉवर्स पडल्यानंतर मात्र जगाचा आतंकवाद्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. आणि जगाची दिशाच बदलली.

असे असले तरी भारताला नेहमी एकाकी, स्वावलंबी, स्वयंपूर्ण व सजग राहूनच भविष्यात वाटचाल करावी लागणार आहे. याप्रसंगी 'वाहिद अली वाहीद' नावाच्या कवीच्या ओळी महत्त्वाच्या वाटतात-

**''द्वंद्व कहा तक पाला जाये**
**युद्ध कहाँ तक टाला जाये**
**तू ही है राणा का वंशज**
**फेक जहाँ तक भाला जाये**
**दोनो और लिखा हो भारत**
**सिक्का वही उछाला जाये**
**इस बिगडैल पडोसी को अब,**
**फिर सीसे मे ढाला जाये!''**

# सावित्रीमाईंच्या मुलींचे यश कौतुकास्पद...

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा इयत्ता बारावीच्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही बारावीच्या निकालात मुलींनी बाजी मारली आहे. आणि आम्हीसुद्धा मुलांपेक्षा काही कमी नाहीत हे सिद्ध करून दाखवले आहे. आणि मुलींना तुच्छ समजल्या जाणाऱ्या पुरुषप्रधान संस्कृतीला जबरदस्त चपराक मारली आहे. मुलींना शिक्षणापासून वंचित ठेवणाऱ्या, मुलींना उच्च शिक्षण शिकू न देणाऱ्या, त्यांना घराचा उंबरठा ओलांडू न देणाऱ्या आणि मुली शिकून काय करणार आहेत? असे म्हणणाऱ्या सनातनी पालकांना मुलींनी चांगलाच धडा शिकवला आहे.

मुलींकडे तुच्छतेने बघण्याचा पालकांचा दृष्टिकोन आतातरी बदलायला पाहिजे. कारण आजकाल महिला कोणत्याच क्षेत्रात मागे नाहीत. तर पुरुषांपेक्षा दोन पावले पुढेच आहेत आणि पुरुषप्रधान संस्कृतीला लाजवेल असे उल्लेखनीय कार्य करून भारताला जगाची महासत्ता बनवण्याचे स्वप्न पाहत आहेत. भारताचे नाव जगाच्या कानाकोपऱ्यात घेऊन जात आहेत. क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले यांची प्रेरणा घेऊन अन्यायाविरुद्ध लढा उभारत आहेत. आपल्या हक्क व अधिकारासाठी प्रशासनाला वेठीस धरत आहेत. प्रत्येक क्षेत्रात मानाचे अढळ स्थान प्राप्त करत आहेत. असे कोणतेच क्षेत्र नाही की, त्या क्षेत्रात महिलांनी आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटवला नाही. प्रत्येक क्षेत्रात पुरुषांपेक्षा अप्रतिम व अलौकिक कार्य करण्यात महिला आघाडीवर आहेत. म्हणूनच आजकाल महिलांची प्रगती पाहून सनातनी पुरुषांना त्यांच्या अलौकिक कार्याचा हेवा वाटत आहे. आणि त्यांच्या पोटात पोटशूळ उठत आहे. पण अशा सनातनी व धर्मांध मंडळींना न घाबरता महिला दिमाखाने आपले



कार्य करतच आहेत. सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक व राजकीय क्षेत्रात महिलांनी आपला एक वेगळाच दबदबा निर्माण केला आहे. आणि प्रशासनामध्येदेखील महिला पावरफुल बनून काम करत आहेत. आता राजकीय क्षेत्रातसुद्धा महिलांचा सहभाग वाढत आहे, ही खूप खूप आनंदाची बाब आहे. देशाच्या राष्ट्रपतिपदापर्यंत महिला मजल मारत आहेत. सामाजिक क्षेत्रातसुद्धा महिलांचा सहभाग वाढला आहे. अतिशय उत्कृष्टपणे महिला सामाजिक कार्य करत आहेत, ही खूप खूप अभिमानास्पद बाब आहे. पण खेदाची बाब अशी की, आजकाल काही पुरुष आपल्या मुलींना उच्च शिक्षण शिकवू देत नाहीत. मुलींना दहावीपर्यंतच शिक्षण शिकवतात आणि मनपसंत स्थळ बघून तिचे लग्न लावून देतात. कारण कॉलेजजीवनात गेल्यावर मुली बिघडतात. आणि आपल्या प्रतिष्ठेला कलंकित करतात, असे काही पालकांना वाटते. म्हणून मुलींना उच्च शिक्षण शिकवायला काही पालक घाबरतात. काही काही पालकांचा

चंद्रकांत कांबळे
७४९८७१५६६१

तर असा गैरसमज झालेला असतो की, मुलींना उच्च शिक्षण शिकवणे म्हणजे आपली सामाजिक प्रतिष्ठा कमी करून घेणे होय. मान्य आहे की, कॉलेजजीवनात गेल्यावर काही मुली बिघडतात. कोणाच्यातरी प्रेमात पडून, शेवटी लव्ह मॅरेज करतात. शिक्षणाच्या नावाखाली नको त्या गोष्टी करतात. आणि आई-वडिलांची व घराची मान खाली घालतात. म्हणून मुलींना उच्च शिक्षण शिकवणे आई-वडिलांना नको वाटतं आहे. पण सगळ्याच मुली तशा नसतात. काही मुली ध्येयाने प्रेरित होऊन व आई-वडिलांचे कष्ट डोळ्यासमोर ठेवून खूप खूप अभ्यास करतात. नको त्या फंदात पडत नाहीत. अभ्यासाशिवाय इतरत्र वेळ घालवत नाहीत. खूप खूप उच्च शिक्षण शिकणे व आई-वडिलांचे स्वप्न साकार करणे हेच त्यांचे जीवन ध्येय बनलेले असते. अशा शीलवान व गुणवान मुलींना मनापासून सलाम करावा वाटतो. आणि शिक्षणाच्या नावाखाली प्रेमाचा बाजार मांडणाऱ्या मुलींना एवढेच सांगावे वाटते की, मुलींनो, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुलेंनी सनातनी व धर्मांध लोकांना विरोध करून तुमच्यासाठी शिक्षणाची दारे खुले करून दिली. म्हणून आपणही प्रेमाच्या फंदात न पडता, आई-वडिलांना बेईमान न होता, सावित्रीमाई फुले, माता रमाई, किरण बेदी व प्रतिभाताई पाटील या कर्तृत्ववान महिलांचा आदर्श घेऊन उच्च शिक्षणाचा पर्वत लीलया सर करावा. पालकांनी आपल्या मुलींना पहिल्यांदा सुसंस्कारी बनवा... त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून द्या.. त्यांना यशस्वी व आदर्श महिलांच्या यशोगाथा सांगा... सावित्रीबाई फुले व सिंधुताई सपकाळ या महामातांचा जीवन संघर्ष त्यांना ज्ञात करून द्या... म्हणजे त्या प्रेमाच्या भानगडीत पडणार नाहीत... फक्त अभ्यास आणि अभ्यासच करतील... आणि आपले व आपल्या गावकऱ्यांचे नाव उंचावतील. कारण सावित्रीमाई फुलेंच्या लेकीत खूप टॅलेंट व प्रत्येक क्षेत्र हाताळण्याचा जबरदस्त हातखंडा आहे. म्हणूनच आजकाल प्रत्येक क्षेत्रात महिला पुरुषांपेक्षा उल्लेखनीय काम करत आहेत. दहावी व बारावी बोर्ड परीक्षेत घवघवीत यश संपादन करून मुलांपेक्षा पुढे जात आहेत. म्हणूनच सावित्रीमाईंच्या मुलींच्या यशाचे कौतुक होणे, ही काळाची गरज आहे.

# ऑपरेशन सिंदूर : न्याय झाला, जय हिंद

जम्मू-काश्मीरमधून कलम ३७० आणि कलम ३५ (अ) हटवल्यानंतर तेथील जनजीवन हळूहळू सुरळीत होत होते. शासन तेथील लोकांचा विश्वास संपादन करण्यात यशस्वी होत होते आणि पर्यटकांची संख्या वाढू लागली होती. या पार्श्वभूमीवर जम्मू-काश्मीरमध्ये शांतता, सद्भावना आणि कायदा-सुव्यवस्था निर्माण झालेला पाकिस्तान आणि दहशतवादी गटांना सहन होत नव्हती. भारतात अराजकता माजावी, जातीय आणि धार्मिक दंगे व्हावेत, असा उद्देश ठेवून पाकिस्तान आणि दहशतवादी गट सतत कटकारस्थान करत असतात. भारतीयांना धर्माच्या आधारे विभागण्याचा आणि एकमेकांबद्दल द्वेष निर्माण करण्याचा प्रयत्न पहलगाम हल्ल्यातून स्पष्ट दिसून आला.

या हल्ल्यातून कोणताही मोठा धार्मिक संघर्ष उभा राहिला नाही, ही गोष्ट महत्त्वाची आहे. आपल्या राजकीय, सामाजिक आणि धार्मिक नेत्यांनी संयम दाखवून ''हम सब एक है!'' हा संदेश आपल्या बोलण्यातून आणि कृतीतून दिला. जम्मू-काश्मीरमधील नागरिक रस्त्यावर उतरून या हल्ल्याचा निषेध करण्यासाठी एकवटले. तेथील विधानसभेने एकमताने ठराव करून पहलगामच्या हल्ल्यावर कठोर शब्दांत प्रहार केला.

या सर्व घटनांनंतर ७ मे रोजी रात्री १ च्या सुमारास भारताने पाकिस्तानातील ९ दहशतवादी तळांवर हल्ला केला. या कारवाईत कोणतेही पाकिस्तानी सैन्यदल किंवा आर्थिक केंद्र लक्ष्य करण्यात आले नव्हते. भारतीय लष्कराने केवळ दहशतवादी तळांवर अचूक आणि प्रभावी प्रहार केला. याचा व्हिडिओ प्रसारित करण्यात आला. ''प्रहारय सन्निहितः जया प्रतिष्ठा:'' असे त्यावर लिहिले होते. ''हल्ला करण्यास सज्ज आणि जिंकण्यासाठी प्रशिक्षित'', असा याचा अर्थ होतो. दुसऱ्या पोस्टरमध्ये ''न्याय झाला, जय हिंद'' असे ठळकपणे लिहिले होते. भारतीय हल्ल्याचा मुख्य उद्देश दहशतवाद्यांना ठार मारणे हा होता. बहावलपूर, मुरीदके, गुलपूर, लष्कर कॅम्प सवाई, बिलाल कॅम्प, कोटली बर्नाला कॅम्प, सरजाल कॅम्प, मेहमूना कॅम्प या दहशतवादी

जनमनाचे प्रतिध्वनी

प्रशिक्षण तळांवर हल्ला करण्यात आला. भारताने केलेला हा हल्ला इतका गुप्त आणि अचूक होता की, पाकिस्तानला काहीच कल्पना आली नाही.

७ मे रोजी भारतातील सुमारे २५० जिल्ह्यांमध्ये सुरक्षेबाबत जनजागृतीसाठी मॉक ड्रिल घोषित करण्यात आली होती. पाकिस्तानचे लक्ष तिकडे वळवण्यात आले. त्यांना वाटले की, मॉक ड्रिलनंतर भारत हल्ला करेल. मात्र, छत्रपती शिवाजी महाराजांच्या गनिमी काव्याच्या तंत्रानुसार शत्रूला गाफील ठेवून हल्ला करण्याची युक्ती यशस्वी ठरली. यानंतर ''ऑपरेशन सिंदूर''विषयी माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत भारतीय लष्कराने विशेष नियोजन केले होते. या परिषदेत कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंग एक मुस्लिम आणि एक हिंदू महिला लष्करी अधिकारी यांना बोलण्याची जबाबदारी देण्यात आली. या निवडीसाठी भारतीय संरक्षण दल, संरक्षण मंत्रालय आणि सरकारचे विशेष अभिनंदन केले पाहिजे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यातून धार्मिक द्वेष पसरवण्याच्या प्रयत्नाला या पत्रकार परिषदेतून भारतीय एकता, अखंडता आणि सार्वभौमत्वाचा पुरस्कार करत ठाम प्रत्युत्तर देण्यात आले. या पत्रकार परिषदेत आमच्या महिला अधिकारी सोफिया आणि व्योमिका यांचे धैर्य, वक्तृत्व आणि प्रतिनिधित्व पाहून पाकिस्तानच नव्हे तर संपूर्ण जग भारताच्या ''विविधतेतून एकता'' या तत्त्वाचा नक्कीच आदर्श घेईल.

**- किशोर जाधव,**
**९९२२८८२५४१**

# भगवंताचे अनुसंधान राखावे

शरीर जीर्ण झाल्यावर त्याला काही ना काही तरी होतच राहते. आजारपणामुळे मनाला टोचणी लागली तर जपावे आणि त्याचा मनावर परिणाम होऊ देऊ नये. आपल्या आजाराचा, म्हातारपणाचा आपण फायदा करून घ्यावा. आपण आपल्या दुखण्यामधून भगवंताचे अनुसंधान टिकवायला शिकले पाहिजे. अनुसंधानात असले की प्रपंचात मजा आहे; अडचणी आणि संकटे यांचीसुद्धा मजा वाटेल. भगवंताच्या अनुसंधानात राहिले तर प्रपंचाची मजा वाटेल.कोणतीही गोष्ट एकदा ओळखली की मग तिची नाही भीती वाटत. विषय जोवर ओळखले नाहीत तोवरच ते आपल्याला त्रास देतात. याकरिता, ज्या ज्या गोष्टी होत असतात, त्या त्या भगवंताच्या इच्छेनेच होत आहेत, ही जाणीव ठेवून वृत्ती आवरण्याचा प्रयत्न करावा. परमार्थाच्या आड आपले आपणच येत असतो. आपली वृत्ती जिथे जिथे वावरते तिथे तिथे भगवंताची वस्ती असते. म्हणून वृत्ती जरी कोणतीही उठली तरी तिथे भगवंताची आठवण केली तर ती चटकन् मावळते. आपण नेहमी आपल्या उपास्य देवतेचे स्मरण करीत असावे. त्याच्या पायावर मस्तक ठेवावे, आणि त्याची अनन्य भावाने प्रार्थना करावी की, हे भगवंता, तुझ्या आड येणारे हे विषय तुझ्या कृपेशिवाय नाही दूर होणार. तुझ्या प्राप्तीशिवाय कशातही सुख नाही असे भासू लागले, तरी वृत्ती आड आल्याशिवाय रहात नाही. माझ्या अज्ञानाने मी आज स्वत:च्याच आड येत आहे. तरी तुझी, म्हणजे पर्यायाने माझीच, ओळख मला पटावी, आणि त्यात मी तुला पाहावे,



विचारधन

गांवकरी ('गांवकरी प्रकाशन'चे व्यापारचिन्ह) गांवकरी प्रकाशन
संस्थापक संपादक : स्व. द.शं. तथा दादासाहेब पोतनीस
संपादक, मुद्रक, प्रकाशक : वंदन अ. पोतनीस
मुख्य कार्यालय :'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक-४२२००१. फोन : २३०५०८०, २३०५०८१, २३०५०८२, २५९४५४६
विभागीय कार्यालये :
सिन्नर : हिरालाल टॉवर्स, बसस्टँडजवळ. ०२५५१-२२२५७८.
मालेगाव : पांजरापोळ शॉपिंग कॉम्प्लेक्स, शिवाजी पुतळा. २५५४-२३४२००
दिंडोरी : गाळा नं. २५, मार्केट कमिटीजवळ, निळवंडी रोड. ०२५५७-२२२५५५.
'गांवकरी प्रकाशन'साठी 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक येथे मुद्रित व प्रकाशित.
e-mail Id :-
1. gavmaha123@gmail.com
2. advtgvk@rediffmail.com
RNI REG. No.1934/57

## बाजार - कंपन्या - मनोरंजन



### 'धर्मरक्षक अहिल्यादेवी होळकर' चित्रपटाच्या पोस्टरचे अनावरण; २३ मे रोजी प्रदर्शित होणार

**मुंबई :** इतिहासाच्या सोनेरी पानांमध्ये अजरामर झालेली बरीच कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वे अलीकडच्या काळात रुपेरी पडद्यावर अवतरलेली पाहायला मिळाली आहेत. या व्यक्तिरेखांच्या आधारे इतिहासातील सुवर्ण अध्याय आजच्या पिढीसमोर आले आहेत. आपल्या पराक्रमाने इतिहास गाजवणाऱ्या थोर व्यक्तिमत्त्वांपैकी एक महाराणी अहिल्याबाई होळकर होत्या. इ. स. १७६७ ते इ. स. १७९५ या काळात राज्य करणाऱ्या भारतातील माळव्यातील तत्त्वज्ञानी महाराणी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अहिल्याबाईंची कहाणी चित्रपटरूपात जगासमोर येणार आहे. 'धर्मरक्षक अहिल्यादेवी होळकर - एक युग' या चित्रपटात शूर पराक्रमी महाराणींची यशोगाथा पाहायला मिळणार आहे. २३ मे रोजी हा चित्रपट संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज लोकनेते व माजी लोकसभा सदस्य छ. उदयनराजे भोसले यांच्या हस्ते नुकतेच 'धर्मरक्षक अहिल्यादेवी होळकर' चित्रपटाच्या पोस्टरचे अनावरण करण्यात आले. याप्रसंगी चित्रपटाचे निर्माते-दिग्दर्शक, कलाकार राहुल राजे, सुहास जाधव, संदेश कदम व तंत्रज्ञांची टीम उपस्थित होती. 'धर्मरक्षक अहिल्यादेवी होळकर'च्या संपूर्ण टीमचे कौतुक करत श्री. छ. उदयनराजे भोसले यांनी चित्रपटाला भरभरून शुभेच्छा दिल्या. दिग्दर्शक सुशांत सोनवले म्हणाले की, इतिहासाच्या पाठ्यपुस्तकातील पराक्रमी व्यक्तिरेखा आजच्या पिढीसमोरच नव्हे, तर सदासर्वकाळ आदर्श निर्माण करणाऱ्या आहेत. या चित्रपटाच्या निमित्ताने एका लढाऊ महाराणीची शौर्यगाथा जगासमोर येणार आहे. हा चित्रपट केवळ एक कलाकृती नव्हे, तर अहिल्याबाईंच्या चरित्रगाथेचे डॉक्युमेंटेशन ठरावे, अशी भावनाही दिग्दर्शक सुशांत सोनवले यांनी यावेळी व्यक्त केली.




### 'अष्टपदी'चे नवीन पोस्टर प्रेक्षकांच्या भेटीला

**मुंबई :** 'अष्टपदी' या आगामी मराठी चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख नुकतीच घोषित करण्यात आली आहे. 'अष्टपदी' चित्रपटाचे नवीन लक्षवेधी पोस्टर प्रदर्शित करण्यात आले आहे. 'अष्टपदी' ३० मे रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. अनोखे शीर्षक, नामवंत कलाकार, सर्जनशील दिग्दर्शन, आशयघन कथानक आणि दर्जेदार निर्मिती असलेला हा चित्रपट सिनेसृष्टीत सुरुवातीपासूनच चर्चेचा विषय ठरला आहे. निर्माते उत्कर्ष जैन आणि महेंद्र पाटील यांनी महश्री प्रॉडक्शन आणि युवराज सिने क्रिएशनच्या बॅनरखाली 'अष्टपदी' चित्रपटाची निर्मिती केली आहे. निर्माते उत्कर्ष जैन यांनीच या चित्रपटाचे दिग्दर्शनही केले आहे. 'अष्टपदी'ची कथा, पटकथा व संवादलेखन महेंद्र पाटील यांचे असून, महेंद्र पाटील हे या चित्रपटाचे क्रिएटिव्ह दिग्दर्शक आहेत. रिलीज करण्यात आलेल्या पोस्टरला लग्नाच्या मंडपाची पार्श्वभूमी आहे. त्यावर मुख्य भूमिकेतील कलाकारांसह सहाय्यक भूमिकेतील कलाकारही आहेत. आपणा सर्वांना लग्नातील सप्तपदी माहीत आहे, पण अष्टपदी म्हणजे नेमके काय? याबाबतचे कुतूहल वाढले आहे. या आणि अशा बऱ्याच प्रश्नांची उत्तरे प्रेक्षकांना सिनेमागृहात मिळणार असल्याचे सांगत उत्कर्ष जैन म्हणाले की, 'अष्टपदी'मध्ये प्रेक्षकांना आजवर कधीही न पाहायला मिळालेले कथानक पाहायला मिळणार आहे. चित्रपटातील सर्वच कलाकारांनी दमदार अभिनय केला आहे. संतोष जुवेकरचे आजवर कधीही समोर न आलेले रूप प्रेक्षकांसमोर येणार आहे. त्याच्या जोडीला मयुरी कापडणे असल्याने दोघांची केमिस्ट्रीही प्रेक्षकांचे लक्ष वेधणार आहे.

### निखिल आर्य 'तेनाली रामा' मालिकेत दिसणार

**मुंबई :** सोनी सबवरील 'तेनाली रामा' ही मालिका त्यातील



चातुर्याच्या, सुजाणतेच्या गोष्टींमुळे आणि अनपेक्षित कलाटण्यांमुळे प्रेक्षकांना आवडत आहे. कहाणी पुढे सरकत आहे आणि अधिक खोलातदेखील जात आहे. अशा वेळी हमखास एखाद्या नव्या पात्राची कथेत एंट्री होते. नव्याने दाखल होत असलेली व्यक्तिरेखा काहीशी अबोल आहे, आसपास काय चालले आहे, याचे निरीक्षण करणारी आहे आणि आपला आवाज न चढवता सगळ्यांचे लक्ष वेधून घेणारी आहे. कोतवालाच्या या वेधक भूमिकेत प्रसिद्ध अभिनेता निखिल आर्य दाखल होत आहे. हा कोतवाल शांत राहून राज्याचे संरक्षण करणारा, कायद्याचे काटेकोर पालन करणारा आहे.आपल्या भूमिकेविषयी बोलताना निखिल आर्य म्हणाला, कोतवालाची भूमिका करणे एक मस्त आव्हान आहे. ज्याच्या मौनात ताकद आहे, अशी व्यक्तिरेखा क्वचितच साकारायला मिळते. त्याच्यात काही तरी तीव्र असे आहे. तो सगळीकडे उपस्थित असतो, नेहमी सतर्क असतो पण कधीच जास्तचा शब्द बोलत नाही. त्याच्या छोट्या छोट्या हालचालींमध्येच मजा दडलेली आहे- भुवई उंचावणे, तिरपा कटाक्ष टाकणे हेच जणू त्याचे संवाद आहेत.

# सिंगापूरच्या धर्तीवर विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणार

## शालेय शिक्षणमंत्री भुसे यांचे प्रतिपादन



**नाशिक : प्रतिनिधी**

**सिंगापूर शहर शिक्षण क्षेत्रात अग्रेसर आहे. त्याअनुषंगाने विद्यार्थ्यांना सिंगापूरच्या धर्तीवर गुणवत्तापूर्ण, दर्जेदार व अत्याधुनिक तंत्रज्ञानासह शिक्षण देण्याबरोबरच त्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी शिक्षण विभागाच्या माध्यमातून सर्वांना सहभागी करून घेऊ, असे प्रतिपादन राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी केले.**

शिर्डी येथे शिक्षणमंत्री भुसे यांच्या उपस्थितीत शालेय शिक्षण विभागाच्या माध्यमातून शैक्षणिक चर्चासत्र, सिंगापूर अभ्यास दौरा, समृद्ध अनुभव कार्यक्रम आयोजित केला होता. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी प्रधान सचिव रणजितसिंह देओल, शिक्षण आयुक्त राहुल रेखावर, एमपीएससीच्या सहसंचालक सरोज जगताप, बालभारतीचे संचालक कृष्णकुमार पाटील, प्रकल्प संचालक संजय यादव आदी अधिकारी व विविध जिल्ह्यांतील शिक्षक उपस्थित होते.

सिंगापूरचा अभ्यासदौरा यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्या ४८ शिक्षकांचे शिक्षणमंत्र्यांनी अभिनंदन केले. यावेळी शिक्षकांनी शालेय शिक्षणमंत्र्यांच्या अभ्यासदौऱ्यात आलेल्या अनुभवांचे सादरीकरण ऐकले. श्री. भुसे म्हणाले, की शिक्षण प्रणालीत देश, राष्ट्र व प्रथम देशाचा नागरिक घडविण्यास प्राधान्य दिले आहे. विद्यार्थ्यांना शिक्षण विभागाच्या माध्यमातून अत्याधुनिक तंत्रज्ञानासह त्यांना रोजगाराभिमुख व कौशल्यपूर्ण शिक्षण देण्यात येणार आहे. तसेच शिक्षकांनी सिंगापूरमध्ये विविध शाळांना दिलेल्या भेटी व तज्ज्ञांच्या अनुभवाचा शिक्षकांच्या गुणवत्तावाढीसाठी निश्चितच उपयोग होईल. महाराष्ट्राला सिंगापूरसारखी शिक्षणप्रणाली अनुसरण्यासाठी सर्वांच्या सहकार्याने प्रयत्न करणार आहोत, असेही त्यांनी सांगितले.

शिक्षण विभागाच्या माध्यमातून शिक्षकांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील. शिक्षकांचे अशैक्षणिक कामे कमी करून ती सुसह्य करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

श्री. देओल म्हणाले, की शिक्षकांनी सिंगापूरचा अभ्यासपूर्ण दौरा केला आहे. महाराष्ट्राला शिक्षण क्षेत्रात अग्रेसर करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत. विद्यार्थी नियमित शाळेत येण्यासाठी व त्यांची पटसंख्या वाढविण्यासाठी शिक्षकांनी प्रयत्न करावेत. शिक्षण विभाग निपुण ॲपसारख्या विविध ॲपच्या माध्यमातून विविध सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील आहे.

यावेळी विद्यार्थी व शिक्षकांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक घटकांचे सहा शिक्षकांच्या गटाने सविस्तर सादरीकरण केले. शाळेत नावीन्यपूर्ण उपक्रम राबविलेल्या उपक्रमशील शिक्षकांनी मनोगत व्यक्त केले.

# पाकवर हवाई हल्ला ; शेअर बाजार घसरला

## जागतिक बाजारातील मिश्र संकेत; बाजारात सुरुवातीपासूनच कमकुवतपणा



**मुंबई :** भारत-पाकिस्तानमधील वाढत्या भू-राजकीय तणावाच्या पार्श्वभूमीवर बुधवारी भारतीय शेअर बाजाराचे बेंचमार्क रेड झोनमध्ये उघडले. पाकिस्तानमधील दहशतवाद्यांच्या अड्ड्यावर भारताने केलेल्या हवाई हल्ल्यानंतर बुधवारी म्हणजे ७ मे रोजी सकाळी भारतीय शेअर बाजारात मोठी घसरण दिसून आली. बाजारात सुरुवातीपासूनच कमकुवतपणा दिसत होता आणि व्यवहार सुरू होताच घसरण तीव्र झाली.

बुधवारी सकाळी बाजाराच्या प्री-ओपनिंगला, सकाळी ९.१० वाजता बीएसई सेन्सेक्स सुमारे ६९२.२७ अंक घसरून ७९,९४८.८० वर तर निफ्टी ५० निर्देशांक १४६.३० अंक किंवा ०.६०% घसरून २४,२३३.३० वर व्यवहार करत होता. बुधवारी सकाळी भारताने पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील नऊ दहशतवादी तळांवर क्षेपणास्त्र हल्ला केला. पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याच्या प्रत्युत्तरात झालेल्या या ऑपरेशनला लष्कराने 'ऑपरेशन सिंदूर' असे नाव दिले. या हल्ल्यामुळे भारतीय शेअर बाजाराने सावध सुरुवात केली, पण काही मिनिटांत पुन्हा हिरवागार झाला. बुधवारी सेन्सेक्स आणि निफ्टीने घसरणीसह ओपनिंग केली, पण नंतर वेग पकडला.

बँकिंग आणि पेट्रोलियम शेअर्समधील नफावसुली व भारत-पाकिस्तानमधील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर गुंतवणूकदारांनी सावध भूमिका घेतल्याने मंगळवारी स्थानिक शेअर बाजार घसरले. क्षेत्रीय निर्देशांकात ऑटो वगळता सर्व निर्देशांक लालेलाल झाले. PSE बँक, रिअल्टी, एनर्जी, कमोडिटी, पीएसई आणि फायनान्शियल सर्व्हिसेसचे शेअर्स सर्वाधिक घसरले.

### युद्धाच्या शक्यतेने बाजारात घबराट

भारत आणि पाकिस्तानमधील वाढत्या तणावामुळे शेअर बाजारात ही घसरण झाली असून, मंगळवारी रात्री उशिरा भारताने 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत पाकिस्तान आणि पीओकेमधील ९ दहशतवादी तळांवर हवाई हल्ले केले. यानंतर भू-राजकीय तणावाचा परिणाम बाजारात स्पष्टपणे दिसून येत आहे.

### कोणते शेअर्स फोकसमध्ये असणार?

दरम्यान, आजच्या व्यवहारात ईमुद्रा, KEI इंडस्ट्रीज, पिरामल एंटरप्रायझेस, आरती ड्रग्ज, ॲप्ट्स व्हॅल्यू हाऊसिंग फायनान्स इंडिया, कान्साई नेरोलॅक पेंट्स, श्रीराम फायनान्स, सन फार्मास्युटिकल इंडस्ट्रीज, लाइफ इन्शुरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया, प्रेस्टिज इस्टेट्स प्रोजेक्ट्स, रेस्टॉरंट ब्रँड्स एशिया आणि गुजरात मिनरल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनचे शेअर्स फोकसमध्ये असतील.

# नेस्ले इंडियाच्या स्वयंचलित वितरण केंद्राचे उद्घाटन

**नाशिक :** नेस्ले इंडियाने अलीकडेच महाराष्ट्रातील भिवंडी येथे आपले अद्ययावत वितरण केंद्र (डिस्ट्रिब्युशन सेंटर-डीसी) सुरू केले. तंत्रज्ञान हे प्रगतीला चालना देणारे प्रेरक बल आहे हा नेस्ले इंडियाचा दृढविश्वास या डिस्ट्रिब्युशन सेंटरच्या रूपाने साकार झाला आहे. वेअरहाऊसच्या कामकाजासाठी एक डिजिटल ट्विन किंवा डिजिटल प्रतिरूप म्हणावे असे प्लॅनिंग टूल वापरणारे नेस्ले इंडियाचे हे पहिलेच डीसी आहे, जे वेअरहाऊसच्या अधिक चांगल्या नियोजनास व सुसज्जतेस मदत करणारे आहे.

या डिस्ट्रिब्युशन सेंटरमध्ये असलेल्या सुमारे २०,००० पॅलेट पोझिशन्स आणि चॉकलेट साठविण्यासाठीचे सर्वांत मोठे शीतगृह यांच्या साथीने कंपनी या उद्योगक्षेत्रातील मालाच्या पुरवठ्यासाठीच्या निकषांचा दर्जा उंचावत आहे. सात महिन्यांच्या विक्रमी काळात पूर्ण झालेले




हे डिस्ट्रिब्युशन केंद्र अद्ययावत तंत्रज्ञानाने सुसज्ज आहे, ज्यात स्वतंत्र रिपॅकिंग सेंटर आणि भाताची पहिली शटल रॅकिंग सिस्टिम ही वेअरहाऊसमधील जागेचा अधिक काटेकोरपणे वापर करण्यास मदत करणारी सघन रॅकिंग यंत्रणा यांचा समावेश आहे. याखेरीज हे डिस्ट्रिब्युशन सेंटर संपूर्णतः या डिजिटली चालणारे आहे - ज्यामुळे त्याचे कामकाज पेपरलेस झाले आहे.

नेस्ले इंडियाच्या सप्लाय चेन विभागाचे प्रमुख वरुण गुप्ता म्हणाले, कार्यक्षमता, चपळता, सुरक्षितता आणि शाश्वतता हे आमच्या पुरवठा साखळीचे अविभाज्य भाग आहेत. उत्पादन व माहितीच्या वहनामध्ये परिपूर्ण एकतानता साधत या तत्त्वांना साध्य केले जाते. भिवंडी डिस्ट्रिब्युशन सेंटर म्हणजे आमच्या टीमकडील नवसंकल्पना आणि लक्षणीय प्रयत्न यांचे मूर्त उदाहरण आहे, ज्यायोगे ऑप्टिमल शटल रॅकिंग, डिजिटलाइज्ड कार्यान्वयन, आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि मशीन लर्निंगवर आधारित समन्वयित नियोजन आणि आमच्या ग्राहकांसाठी आगळ्यावेगळ्या, सर्व प्रकारच्या माध्यमांद्वारे उपलब्ध सेवा यांचा मेळ साधला गेला आहे.

नेट झीरो उद्दिष्टांप्रति आमच्या बांधिलकीशी सुसंगती साधत, सानंद-भिवंडी मार्गावरील आमच्या २५ टक्के मालवाहतुकीसाठी आता पर्यायी इंधनाचा वापर केला जात आहे, ज्यामुळे हरित वायूचा उत्सर्ग कमी होत आहे व कार्यक्षमता वाढत आहे. आमच्या मालवाहतुकीमध्ये शाश्वततेशी संबंधित उद्दिष्टे आणखी मोठ्या प्रमाणात समाविष्ट करण्यासाठी आमच्या लॉजिस्टिक्स टीमने एक 'ऑपरेशन्स कमांड हब' आणि एक 'लॉजिस्टिक्स ऑपरेशन्स कॉम्पिटन्स सेंटर' सुरू केले आहे. ते पुढे म्हणाले, नेस्ले इंडिया आणि तिच्या लॉजिस्टिक्स पार्टनर्समधील सातत्यपूर्ण भागीदारीमुळे हे शक्य झाले आहे. या भागीदारीचा एक भाग म्हणून नेस्ले इंडिया सानंद-भिवंडी मार्गावरील पर्यायी वाहनांची संख्या यापुढेही सातत्याने वाढवित राहील.



# बँक ऑफ इंडिया इन्व्हेस्टमेंट मॅनेजर्सची नाशकात शाखा

**नाशिक :** बँक ऑफ इंडिया इन्व्हेस्टमेंट मॅनेजर्स प्रायव्हेट लिमिटेडला नाशिक, महाराष्ट्र येथे नवीन शाखेच्या उद्घाटनाची घोषणा करताना खूप आनंद होत आहे. ही शाखा ७ मे २०२५ पासून कार्यरत झाली असून, ती टिळकवाडीतील रामायण बंगल्यासमोर एबीएच कॅपिटल या मध्यवर्ती ठिकाणी आहे. ही नवीन सुविधा प्रमुख शहरी केंद्रांमध्ये उपस्थिती वाढवण्याच्या वचनबद्धतेला अधोरेखित करते.

या उद्घाटन समारंभाचे नेतृत्व बँक ऑफ इंडिया इन्व्हेस्टमेंट मॅनेजर्स प्रायव्हेट लिमिटेडचे सीईओ श्री. मोहित भाटिया यांनी केले. यावेळी बँक ऑफ इंडियाच्या नाशिक झोनचे झोनल मॅनेजर श्री. संजय कुमार सिन्हा, बँक ऑफ इंडिया इन्व्हेस्टमेंट मॅनेजर्स प्रायव्हेट लिमिटेडचे सहकारी आणि नाशिक विभागातील इतर म्युच्युअल फंड भागीदार उपस्थित होते. हा कार्यक्रम कंपनीच्या विस्तार धोरणात एक महत्त्वाचा टप्पा आहे, ज्याचा उद्देश वैयक्तिक आणि संस्थात्मक गुंतवणूकदारांच्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी तयार केलेल्या गुंतवणूक व्यवस्थापन सेवांची विस्तृत श्रेणी प्रदान करणे आहे. ही शाखा गुंतवणूकदारांना सुलभ आणि सेवा पुरवेल.

## ज्येष्ठ गायिका उत्तरा केळकर यांना स्व. अरुण पौडवाल कृतज्ञता पुरस्कार

**मुंबई :**

सुप्रसिद्ध अकॉर्डियन वादक, कुशल संगीत संयोजक आणि प्रतिभाशाली संगीतकार स्व. अरुण पौडवाल यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ देण्यात येणारा कृतज्ञता गौरव पुरस्कार यंदा सुप्रसिद्ध पार्श्वगायिका उत्तरा केळकर यांना जाहीर झाला आहे. शनिवार, दि. १० मे रोजी संध्याकाळी ७ वाजता सुप्रसिद्ध पार्श्वगायिका पद्मश्री डॉ. अनुराधा पौडवाल व पौडवाल कुटुंबीयांच्या उपस्थितीमध्ये अनुराधाजींच्या हस्ते पुरस्कार प्रदान सोहळा संपन्न होईल. हा समारंभ अनुराधाजींच्या खार (पश्चिम) येथील राहत्या घरी होणार आहे. शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह व रोख रक्कम रुपये - ५१,००० /- असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. या पुरस्कार सोहळ्याचे हे यंदाचे २८ वे वर्ष आहे.

**आजवर या पुरस्काराने सन्मानित झालेले मान्यवर**

पार्श्वगायक- जी. मल्लेश, संगीतकार - राम कदम, यशवंत देव , प्रभाकर जोग, दत्ता डावजेकर, अशोक पत्की, संगीत संयोजक - श्यामराव कांबळे, तालवादक - जयसिंग भोई, प्रमोद साने, संतूरवादक - उल्हास बापट, गीतकार - जगदीश खेबुडकर, शांताराम नांदगावकर, वंदना विटणकर, भावगीत गायक - अरुण दाते, गिटारवादक- रमेश अय्यर, सुनील कौशिक, ध्वनिमुद्रक - डी. ओ. भन्साळी, अविनंदन टागोर, हेमंत पारकर, सत्येन पौडवाल, युवा गायक - गिरीश संझगिरी, चंद्रशेखर महामुनी, मदन काजळे, त्यागराज खाडिलकर.

## रॉयल एनफील्ड क्लासिक ६५० लवकरच बाजारात

**नवी दिल्ली :** ब्रिटिश बाइक कंपनी रॉयल एनफील्डच्या बाइक्स भारतात खूप पॉप्युलर आहेत. क्लासिक ३५० बद्दल तरुणांमध्ये प्रचंड क्रेझ पाहायला मिळते. ब्रिटिश ऑटोमेकरची ही बाइक आता ६५० सीसी इंजिनसह लाँच होणार आहे. रॉयल एनफील्ड क्लासिक ६५० लवकरच इंडियात लाँच होणार आहे. ही बाइक क्लासिक ३५० आणि तिच्या पॅरेरल ट्विन इंजिनचे जबरदस्त कॉम्बिनेशन असेल. रॉयल एनफील्ड क्लासिक ६५० मध्ये ६४८ सीसी, एअर/ऑइल कूल्ड, पॅरलल ट्विन मिल इंजिन असेल. या इंजिनची आधीच टेस्टिंग घेण्यात आली आहे. इंजिनमध्ये ६-स्पीड गिअरबॉक्स असेल.

## एक्सॉनमोबिल ल्युब्रिकण्ट्स उच्च कार्यक्षम इंजिन ऑइल देण्याप्रति कटिबद्ध : परेरा

**जळगाव :** एक्सॉनमोबिल ल्युब्रिकण्ट्स प्रा. लि. या भारतातील मोबिल ब्रॅण्डेड ल्युब्रिकण्ट्सची विक्री करणाऱ्या एक्सॉनमोबिल सहयोगी कंपनीने त्यांच्या सुरू असलेल्या 'अनफर्गे टेबल जर्नी' मोहिमेचा भाग म्हणून नवीन जाहिरातीच्या लाँचची घोषणा केली.

या जाहिरातीमध्ये जगातील आघाडीचा सिन्थेटिक इंजिन ऑइल ब्रँड मोबिल १ वर विशेष प्रकाश टाकण्यात आला आहे. बॉलिवुड आयकॉन ऋतिक रोशन असलेली ही जाहिरात ऋतिकची ड्रायव्हिंग, ड्रिमर्स व डूअर्सचा देश म्हणून भारत आणि मोबिल १ ची कार्यक्षमता यांमधील शक्तिशाली समन्वयाला सादर करते, जेथे या सर्व बाबी समान आवड आणि सर्वोत्तमतेसाठी निरंतर प्रयत्नाद्वारे एकत्रित आल्या आहेत. एक्सॉनमोबिल ल्युब्रिकण्ट्स प्रायव्हेट लिमिटेडच्या व्यवस्थापकीय संचालक चार्लीन परेरा म्हणाल्या, दशकापासून मोबिल १ ने खडतर स्थितीमध्ये उत्तम कामगिरी करून दाखवली आहे, जेथे हे इंजिन ऑइल लॅब-टेस्टेड, रस्ता-संचालित आणि ट्रॅक-प्रमाणित आहे, तसेच इंजिन दीर्घकाळपर्यंत प्रवास केल्यानंतर देखील उत्तम स्थितीत राहतात. मोबिल १ ब्रँड सर्वांत नावीन्यपूर्ण आणि उच्च कार्यक्षम इंजिन ऑइल देण्याप्रति कटिबद्ध आहे, जे व्हेईकलमधील इंजिनला नवीन असल्याप्रमाणे कार्यरत ठेवतात, ज्यामुळे तुम्ही मुक्तपणे भारतात एक्स्प्लोअर करू शकता आणि जीवनाचा पुरेपूर आनंद घेऊ शकता.

२०२३ मध्ये मोबिलचे ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून सामील झालेले अभिनेते ऋतिक रोशन यांनी 'अनफर्गेटेबल जर्नी' मोहीम सुरू ठेवण्याबाबत आपला आनंद व्यक्त केला. या मोहिमेबाबत सांगताना ते म्हणाले, मोबिल १ ब्रँडसोबतचा माझा सहयोग नेहमी प्रभावी राहिला आहे. हा इंजिन ऑइल ब्रँड उच्च कार्यक्षमता व नावीन्यतेसाठी ओळखला जातो, जेथे या पैलूंमधून आत्मविश्वासपूर्ण ड्रायव्हिंगची खात्री मिळते.

# दुबईत मराठी भाषिकांचा आवाज अजून बुलंद : रवींद्र चव्हाण

**नाशिक :** व्यवसाय आणि नोकरीनिमित्त दुबईत राहणाऱ्या दीड लाख मराठी भाषिकांकरिता नुकतीच महाराष्ट्र परिषदेची स्थापना केली गेली. संयुक्त अरब अमिरातीत राहणाऱ्या भारतीय नागरिकांनी स्थापन केलेल्या इंडियन पीपल्स फोरम या व्यापक संस्थेची अंगीकृत संस्था म्हणून ही परिषद कार्यरत राहणार आहे. भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत दुबईत महाराष्ट्र कौन्सिलची मुहूर्तमेढ रोवली गेली.

स्थापना सोहळ्याप्रसंगी बोलताना रवींद्र चव्हाण म्हणाले की, महाराष्ट्र काउन्सिलच्या 'महा हेल्पलाइन' आणि 'युनायटेड महाराष्ट्र प्लॅटफॉर्म' या अत्यंत महत्त्वाच्या उपक्रमांमुळे दुबईस्थित मराठी माणसांचा आवाज अधिक बुलंद होईल आणि त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी अधिक बळ मिळेल. यामुळे महाराष्ट्राचा एकतेचा संदेश युएईमध्ये सर्वदूर पोहोचेल, असे प्रतिपादन रवींद्र चव्हाण यांनी केले.

युएईमध्ये राहणाऱ्या भारतीयांची सद्यःस्थिती, त्यांच्या समस्या आणि प्रश्न समजून घेऊन त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी भाजपाच्या वतीने सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल, असे आश्वासन रवींद्र चव्हाण यांनी दिले. दुबईत मराठमोळ्या पद्धतीने आणि मोठ्या दिमाखात संपन्न झालेल्या या सोहळ्यात युएईमधील व्यावसायिक आणि सामाजिक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाने महाराष्ट्राचे नाव उंचावणाऱ्या 'ग्लोबल महाराष्ट्रीय' व्यक्तिमत्त्वांचा सन्मान करण्यात आला.

इंडियन पीपल्स फोरम (आयपीएफ) याची स्थापना २०१३ मध्ये युएईमध्ये झाली होती. आयपीएफ ही युएईमधील भारतीय प्रवासी समुदायाला पाठिंबा देणारी सर्वांत मोठी सामाजिक-सांस्कृतिक संघटनांपैकी एक आहे.

राहुल तुळपुळे यांच्या नेतृत्वाखाली आयोजित परिषदेत



कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार निरंजन डावखरे, भारताचे युएई येथील राजदूत सतीश कुमार शिवन आयपीएफ युएई प्रमुख जितेंद्र वैद्य आणि शेकडो भारतीय विशेषतः मराठी भाषिक उपस्थित होते. रवींद्र चव्हाण यांची युएई दौऱ्यादरम्यान भारतीय दूतावासामध्ये भारताचे कॉन्सुलेट जनरल सतीश कुमार सिवन यांच्यासमवेत सदिच्छा भेट आणि चर्चा झाली. भारत-युएई व्यापारातील महाराष्ट्राची भूमिका, आदरणीय देवेंद्रजींच्या नेतृत्वात होऊ घातलेली महाराष्ट्राची औद्योगिक प्रगती आणि दुबईतील व्यावसायिकांना महाराष्ट्रात गुंतवणुकीच्या संधी अशा विविध विषयांवर चर्चा झाली. भाजपा कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी सांगितले की या व्यतिरिक्त दुबईतील 'दुबई बिजनेस कम्युनिटी' आणि 'दुबई महाराष्ट्र मंडळाच्या' सदस्यांसोबत महत्त्वपूर्ण बैठक झाली. त्यात कृतार्थ राजा, सागर देसाई, सबिना खोत, दिलावर दलवाई, प्रिया जाधव, प्रसाद दातार, सचिन जोशी, अमोल वैद्य, के. जी. नारकर, राकेश पाटील, शिरीष पटवर्धन, विजेंद्र सुर्वे, राहुल तुळपुळे, रवी चिटणीस, सुहास रेगे, रोहित आगले, आयपीएफचे राहुल तुळपुळे आणि भाजपा आमदार निरंजन डावखरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

### महाराष्ट्रीय उद्योजकांचा दुबईत दबदबा

'गल्फ एज्युकेशन अँड फायनान्स'चे विशाल साळुंखे, अक्षय पाटील, 'ज्युपिटर ग्लोबल मार्केट'चे सागर पाटील, 'अधीरा ज्वेलर्स'चे प्रकाश पवार आणि 'नमो रिफायनरी'चे विनायक देशमुख, या सांगली जिल्ह्याच्या दुबईस्थित सुपुत्रांनी आपल्या व्यावसायिक कर्तृत्वाने दुबईमध्ये महाराष्ट्राचे नाव उंचावले आहे. तसेच दुबईतील पेशवा रेस्टॉरंट येथे 'ब्ल्यू-कॉलर कामगार सेवा कार्यक्रम' संपन्न झाला. दुबईतील मराठी ब्लू-कॉलर कामगार, घरगुती सहाय्यक, समुदाय स्वयंसेवक कामगार यांचीही मोठी संख्या असून, त्यांचे दुबई आणि महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत मोलाचे सहकार्य आहे. सुरेश कुंभार, अनिता जाधव आणि गणेश माने या मराठी श्रमिकांचे कर्तृत्व युएईमध्येही अधोरेखित झाले आहे.

४

गांवकरी आरोग्य

गुरुवार, दि. ८ मे २०२५


# मानसिक आरोग्य आणि समाजातील कलंक

## जागरूकता, बदलाची गरज

कीर्ती रणशूर

**मानसिक आरोग्याबद्दलचा कलंक म्हणजे समाजात असलेली एक नकारात्मक मानसिकता. जेव्हा एखादी व्यक्ती मानसिक आजारामुळे त्रस्त असते, तेव्हा समाज तिला अनेक वेळा कमजोर म्हणून पाहतो.**

(भाग २)



मानसिक आजार व्यक्तीच्या यशस्वितेला थांबवत नाही. अनेक व्यक्तींनी मानसिक आरोग्याच्या आव्हानांना सामोरे जात यशस्वी कामगिरी केली आहे. खाली काही उदाहरणे दिली आहेत, ज्यात जॉन नॅश आणि भारतातील काही महत्त्वाच्या व्यक्तींचा समावेश आहे, ज्यांनी मानसिक आरोग्याच्या अडचणींवर मात केली आणि यश मिळवले आहे.


**१) जॉन नॅश (अमेरिका)**
**आजार : सिजोफ्रेनिया (स्किझोफ्रेनिया)**
**क्षेत्र : गणित, नोबेल पुरस्कार.**

जॉन नॅश एक प्रसिद्ध गणितज्ञ. आपल्या आयुष्याच्या बहुतेक काळात सिजोफ्रेनियाने ग्रस्त होते. मानसिक आरोग्याच्या गंभीर अडचणींचा सामना करत असताना, त्यांनी गेम थिअरीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले, ज्यामुळे त्यांना १९९४ मध्ये नोबेल पुरस्कार मिळाला. त्याची कथा चित्रपट- Beautiful Mind मध्ये दाखवली आहे.

नॅशची जिद्द, पत्नीचा पाठिंबा आणि निर्धार यांनी त्याला सिजोफ्रेनियाच्या गंभीर परिणामांवर मात करून गणित व अकादमिक क्षेत्रात आपले कार्य सुरू ठेवण्यास मदत केली.

**२) अब्राहम लिंकन (अमेरिका)**
**आजार : डिप्रेशन**
**क्षेत्र : अमेरिकेचे सोळावे अध्यक्ष**

अमेरिकेचे सोळावे अध्यक्ष अब्राहम लिंकन यांना जीवनभर दीप डिप्रेशन होतं. त्यांचं मानसिक आरोग्य आव्हान असतानाही त्यांनी गृहयुद्धादरम्यान देशाचे नेतृत्व केलं. गुलामगिरी संपवली आणि जगप्रसिद्ध गेटिसबर्ग भाषण दिलं. लिंकनची भावनिक प्रतिकारशक्ती आणि त्याच्या व्यक्तिमत्त्वातील दृढतेने त्याला वैयक्तिक अडचणींवर मात करत ऐतिहासिक बदल घडवून आणता आले.



**३) व्हिन्सेंट व्हॅन गॉग (नेदरलँड्स)**
**आजार : मानसिक आजार (संभाव्य बायपोलर डिसऑर्डर आणि डिप्रेशन)**
**क्षेत्र : कला**

व्हिन्सेंट व्हॅन गॉग, इतिहासातील एक प्रसिद्ध चित्रकार. डिप्रेशन आणि संभाव्य बायपोलर डिसऑर्डर यांसारख्या मानसिक आरोग्याच्या आव्हानांना सामोरे गेला. तरीही त्याने केवळ दहा वर्षांच्या कालावधीत २,१०० पेक्षा जास्त कलाकृती तयार केल्या, त्यात ८६० तेल चित्रेही समाविष्ट आहेत. त्याचे चित्र Starry Night ही आजही एक प्रसिद्ध कलाकृती आहे. ण त्याचे कार्य आजही संपूर्ण जगातील कलाकारांना प्रेरणा देत आहे.

**४) सुशांतसिंह राजपूत (भारत)**
**आजार : डिप्रेशन**
**क्षेत्र : बॉलिवूड अभिनेता**

सुशांतसिंह राजपूत, एक होनहार बॉलिवूड अभिनेता, मानसिक आरोग्याच्या समस्यांवर खूपच प्रामाणिक होता. त्याची डिप्रेशनशी लढाई असताना तो प्रसिद्ध झाला. त्याच्या दुःखद अंत झाला, तरी त्याच्या कामगिरीने व त्याच्या जीवनाशी संबंधित चर्चा सुरू करून मानसिक आरोग्याबद्दलच्या जागरूकतेला चालना दिली. सुशांतच्या मृत्युपश्चात मनोरंजन उद्योगातील मानसिक दबाव व मदतीच्या गरजेविषयी मोठी चर्चा सुरू झाली आहे.

मानसिक आजार असले, तरी योग्य उपचार, समर्थन व एकाग्रता असताना व्यक्ती यशस्वी होऊ शकते.

या उदाहरणांमधून हे सिद्ध होतं की, मानसिक आरोग्याच्या आव्हानांचा सामना करणाऱ्या व्यक्तींना त्यांची संपूर्ण क्षमता साधता येऊ शकते आणि समाजावर सकारात्मक प्रभाव ठेवू शकते.

जागतिक आरोग्य संघटनेनुसार, मानसिक आरोग्य म्हणजे एक अशी कल्याणकारी अवस्था आहे जिथे एखादी व्यक्ती स्वतःच्या क्षमतांची जाणीव ठेवू शकते. दैनंदिन जीवनातील ताणतणावांचा सामना करू शकते. उत्पादकपणे काम करू शकते आणि आपल्या समाजात सकारात्मक योगदान देऊ शकते.

---

## आयुर्वेद सर्वांसाठी..

(भाग ३)



# गर्भसंस्कार

**आम्हाला गर्भसंस्कार करायचं आहे, अशी इच्छा घेऊन अनेक गर्भिणी रुग्ण क्लिनिकला येतात. पण मुळात गर्भसंस्कार म्हणजे नेमकं काय? का करावे? ते कधीपासून करावे? आयुर्वेदात गरोदरपणात काही उपचार केले जातात का? अशा अनेकविध शंका असतात.**



शारीरिक आरोग्य, आहारविहार याचा विचार आवश्यक ठरतो. सध्याची दिनचर्या बघितली तर त्याचे सर्वाधिक दुष्परिणाम हे गर्भावर होऊ शकतात. अनियमित झोप, कॉम्प्युटर, मोबाईलचा अत्याधिक वापर, एकाच स्थितीत बराच काळ बसून ड्रायव्हिंग करणे, गर्भनिरोधकाचा अतिरिक्त वापर, शारीरिक श्रम कमी आणि मानसिक ताण अधिक, जंकफूड अशा अनेक घटकांचा परिणाम गर्भाच्या वाढीवर होऊ शकतो. यातील काही घटक पूर्णपणे टाळणे अशक्य आहे, पण थोड्या प्रमाणात बंधन पाळणे नक्कीच शक्य आहे.

आयुर्वेदशास्त्रात सुप्रजा म्हणजे निरोगी संततीप्राप्तीसाठी करावयाचा संस्कार असे वर्णन केलेले आहे. यात गर्भधारणा होण्यापूर्वीपासून सविस्तर विचार केला आहे.

**ध्रुवं चतुर्णा सान्निध्यात्**
**गर्भः स्यात् विधिपूर्वकम्।**
**ऋतुक्षेत्राम्बुबीजानां**
**साम्ग्र्यात् अङ्कुरो यथा।।**
**(सुश्रुत शारीरस्थान)**

डॉ. किरण कातकाडे
एमडी आयुर्वेद (मुंबई)
८६६८९९७४९२

ज्याप्रमाणे चांगले पीक येण्यासाठी योग्य ऋतू, मशागत केलेली जमीन, पुरेसे पाणी व संपन्न बीज या सर्व गोष्टी जुळून येणे आवश्यक असते त्याप्रमाणे उत्तम व संपन्न गर्भासाठी योग्य वेळ, निरोगी गर्भाशय व स्त्रीशरीर, गर्भाच्या विकासाला आवश्यक असणारे पोषण व संपन्न बीज या सर्व गोष्टींचा समन्वय आवश्यक असतो. पती-पत्नी त्यांचे मानसिक, शारीरिक आरोग्य...

बीजशुद्धी संस्कार, रसायन चिकित्सा, गर्भाधान संस्कार, गर्भिणी परिचर्या, सूतिका परिचर्या, नवजात बालक परिचर्या या सर्वांचा विचार आयुर्वेदशास्त्रात केला आहे. बीजशुद्धी संस्कार (Pre-conception Counselling) म्हणजे गर्भधारणा होण्याआधी करावयाची शारीरिक-मानसिक शुद्धी. पंचकर्म तसेच विशिष्ट आहारविहार व औषधी उपचार, मेडिटेशन व योगासन यांचा समावेश यात होतो.

(क्रमशः)

---

# चेहऱ्यावरील खड्डे अन् व्हॅम्पायर फेशियल

डॉ. सपना गोटी
डी अँण्ड एस ॲस्थेटिक्स,
क्लिनिकल सौंदर्यशास्त्रज्ञ व
होमिओपॅथिकतज्ज्ञ

सुंदर नितळ चेहरा कोणाला आवडत नाही म्हणा, पण चेहरा नेहमीच छान, टवटवीत असणाऱ्या व्यक्ती अगदी हातावर मोजण्याइतक्या असतील. मासिक पाळी, उन्हात सतत फिरणे, चुकीच्या आहारपद्धती, याचा परिणाम तुमच्या त्वचेवर होत असतो. काहींना मासिक पाळीच्या आधी किंवा नंतर चेहऱ्यावर पिंपल्स येतात, तर काहींना तेलकट पदार्थ खाऊन चेहऱ्यावर पिंपल्स येतात. हात न लावताही अनेकदा पिंपल्स गेले तरी त्याचे डाग राहतात. त्यांनाच आपण मुरुमांचे चट्टे म्हणतात. यामुळे तुमची त्वचा तुम्हाला इतरांपेक्षा अधिक खराब वाटू लागते.

**मुरुमांचे चट्टे म्हणजे काय?**

- ज्याप्रमाणे आरोग्याशी निगडित तक्रारींवर आपण त्याचवेळी योग्य इलाज करतो, तसेच चेहऱ्यावर काहीही झाले



असेल तर त्यावर योग्य वेळी इलाज करणे गरजेचे असते. मुरुमांचे चट्टे अथवा चेहऱ्यावरील खड्डे याबाबतीतही तसेच आहे. पिंपल्सचा योग्य वेळी इलाज नाही केला तर तुम्हाला त्याचा अधिक त्रास होऊ शकतो.

**चेहरा काळवंडणे :**

जर तुमच्या चेहऱ्यावर मुरुमांचे चट्टे जास्त काळासाठी राहिले तर तुमचा चेहरा काळवंडतो. कारण पिंपल्स गेल्यानंतर काळे डाग जाण्यासाठीचे उपाय करणे अनेक जण सोडून देतात.

काहींना कपाळावर पिंपल्स येतात. जर ते पिंपल्स तसेच राहिले तर त्याचे फक्त कपाळ काळे पडलेले दिसते.

**चेहऱ्यावर खड्डे पडणे :**

काही चेहऱ्यांवर मोठमोठे पिंपल्स येतात. त्यामुळे चेहऱ्यावरील खड्ड्यांमध्ये पूदेखील साचतो. अनेक जण ते हातानेच फोडतात. त्यामुळे तुमच्या चेहऱ्यावर खड्डे पडू शकतात. त्यामुळे तुमची त्वचा नितळ दिसायची आशा धूसर होते. एकदा तुमच्या चेहऱ्यावर खड्डे पडले की, मग तुमची त्वचा एकसारखी करण्यासाठी तुम्हाला अनेक इलाज करावे लागतात.

**चेहऱ्यावरील तेज निघून जाणे :**

आता तुमच्या त्वचेवर काळे डाग आणि खड्डे असतील तर तुमचा चेहरा कसा काय चांगला दिसू शकेल? तुमच्या त्वचेतील तेज निघून जाते.

**उपाय/उपचार**

सर्व पिंपल्स व त्यासंबंधी होणाऱ्या त्रासाबद्दल आपल्याला योग्य मार्गदर्शन होईल. यासाठी लोकल उपचार न घेता क्लिनिकल कॉस्मेटोलॉजिस्टकडून उपचार घेणे योग्य ठरेल. चेहऱ्यावरील पिंपल्स, काळे डाग यांना काही लोकल ॲप्लिकेशन व मेडिकेशनबरोबरच प्रोसिजरचीही गरज असते. चेहऱ्यावरील खड्ड्यांसाठी नेहमीच खूप लाभदायी आणि ग्लोबली स्वीकार केलेली पद्धत म्हणजेच पीआरपी केस व्हॅम्पायर फेशियल ही होय. व्यक्तीच्याच रक्तापासून कॉन्सन्ट्रेशन प्लाइमा बनवून तो त्वचेवर इन्फ्यूज केला जातो. यात उत्तम हिलिंग होऊन खड्डे फार चांगल्या पद्धतीने भरून निघतात.

---

# उन्हामुळे चेहरा काळा पडणे

**उन्हामुळे चेहरा काळवंडणे ही एक सामान्य समस्या आहे. विशेषतः उन्हाळ्याच्या महिन्यांत. याला सन टॅन असेही म्हणतात. जेव्हा आपली त्वचा जास्त प्रमाणात सूर्यप्रकाशाच्या अल्ट्राव्हायोलेट किरणांच्या संपर्कात येते, तेव्हा मेलॅनिन नावाचे रंगद्रव्य तयार होते. हे मेलॅनिन त्वचेला हानिकारक किरणांपासून वाचवण्याचा प्रयत्न करते आणि याच कारणामुळे त्वचा काळवंडलेली दिसते.**



**उन्हामुळे चेहरा काळवंडण्याची कारणे :**

**सूर्यप्रकाश :** थेट सूर्यप्रकाश आणि त्यातील अतिनील किरणे हे प्रमुख कारण आहे.

**सनस्क्रीनचा अभाव :**

सनस्क्रीन न लावल्यास त्वचा थेट किरणांच्या संपर्कात येते.

**जास्त वेळ उन्हात राहणे :** जास्त वेळ उन्हात फिरल्यास टॅन होण्याची शक्यता वाढते.

**त्वचेचा प्रकार :** काही लोकांची त्वचा इतरांपेक्षा जास्त संवेदनशील असते आणि त्यांना लवकर टॅन येते.

**उन्हामुळे काळवंडलेला चेहरा ठीक करण्यासाठी घरगुती उपाय : ॲलोवेरा (कोरफड)**

ॲलोवेरा जेल त्वचेला थंडावा देते. काळवंडलेपणा कमी करण्यास मदत करते. रात्री झोपण्यापूर्वी लावा व सकाळी धुवा.

**दही आणि मध :** दही नैसर्गिक ब्लिचिंग एजंट म्हणून काम करते. मध त्वचा मॉइश्चराइज ठेवते. दोन्ही एकत्र करून चेहऱ्याला लावा आणि २० मिनिटांनंतर धुवा.

**लिंबू आणि साखर :**

लिंबात नैसर्गिक आम्ल असते, जे टॅन कमी करण्यास मदत करते आणि साखर स्क्रबिंग करून मृत त्वचा काढते. लिंबाचा रस व साखर एकत्र करून हलक्या हाताने चेहऱ्याला मसाज करा. काही वेळाने धुवा. (लिंबू लावल्यानंतर लगेच उन्हात जाऊ नका.)

**काकडीचा रस :** काकडीचा रस त्वचेला शांत करतो. काळवंडलेपणा कमी करतो. कापसाच्या मदतीने रस चेहऱ्याला लावा आणि सुकल्यावर धुवा.

**बटाट्याचा रस :** बटाट्यामध्ये नैसर्गिक ब्लिचिंग गुणधर्म असतात. बटाट्याचा रस काढून चेहऱ्याला लावा आणि १५-२० मिनिटांनंतर धुवा.

**बेसन आणि हळद :** बेसन आणि हळदीचा लेप त्वचेसाठी खूप चांगला असतो. दोन्ही एकत्र करून पाण्यात किंवा दुधात मिसळून पेस्ट तयार करा आणि चेहऱ्याला लावा. सुकल्यावर धुवा.

**सनस्क्रीनचा वापर :** घराबाहेर पडण्यापूर्वी नेहमी एसपीएफ ३० किंवा त्याहून अधिक असलेले सनस्क्रीन लावा.

**कपड्यांचा वापर :** शक्य असल्यास पूर्ण बाह्यांचे कपडे आणि टोपी वापरा. जास्तीत जास्त पाणी प्या : पुरेसे पाणी प्यायल्याने त्वचा हायड्रेटेड राहते.

**उन्हात जाणे टाळा :** शक्यतो सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत उन्हात जाणे टाळा.

**चेहरा वारंवार धुवा :** दिवसातून दोन-तीन वेळा साध्या पाण्याने चेहरा धुवा.

---

# असे करा ध्यान..



ध्यान आपल्याला मानसिक सशक्त बनवते, ज्यामुळे आपण कोणत्याही परिस्थितीत प्रसन्न राहू शकतो.

आपल्याला आंतरिक शांती प्राप्त होते आणि आसपासच्या परिस्थितीवर प्रभाव करू शकतो.

भावनिक लवचिकता वाढते. प्रतिक्रिया व्यक्त करणे कमी होते. प्रतिसाद देण्याची क्षमता वाढते.

हा मनाला ताणतणाव मुक्त करण्याचा मार्ग आहे

**शांत परिसर :** शांत परिसरात ध्यान करणे योग्य. यामुळे अडथळे दूर होऊन तुम्ही ध्यानात खोलवर जाऊ शकता.

**नियमित ध्यान करा :** दिवसातून दोन वेळा सातत्याने ध्यान करणे उत्तम. यामुळेच प्रत्येक दिवसागणिक तुम्हाला ध्यानाचे सकारात्मक प्रभाव जाणवू लागतात.

**ध्यानापूर्वी हलका शारीरिक व्यायाम करा :** यामुळे शरीरातील विविध अवयवांमधील ताणतणाव निघून गेल्याने आरामदायी व्हाल आणि ध्यान आणखी आनंददायी बनेल.

**विचारांचे निरीक्षण करा :** विचारांना रोखण्याचा प्रयत्न करू नका. त्यांना येऊ द्या. त्यामुळे ध्यान विनासायास बनेल.

**घाई करू नका :** दहा-पंधरा मिनिटांचे ध्यान होतेय ना पाहा. डोळे उघडण्यासाठी घाई करू नका.

---

# ऑब्स्ट्रॅक्टिव्ह स्लीप ॲपनिया

## झोपेतला गुप्त धोका

डॉ. गौरी महाजन
कान-नाक-घसातज्ज्ञ, इंदोरवाला
ईएनटी इन्स्टिट्यूट

**तुम्ही मोठ्याने घोरताय, असे कोणीतरी तुम्हाला सांगितले आहे का? तुम्ही पुरेशी झोप घेतल्यावरही दिवसभर थकलेले वाटता का? झोपेत श्वास थांबतो असे जोडीदार सांगतो का? हे सर्व ऑब्स्ट्रॅक्टिव्ह स्लीप ॲपनिया या गंभीर स्थितीची लक्षणे असू शकतात.**

- **ऑब्स्ट्रॅक्टिव्ह स्लीप ॲपनिया म्हणजे काय?**

- ऑब्स्ट्रॅक्टिव्ह स्लीप ॲपनिया म्हणजे झोपेत श्वास घेण्याचा मार्ग अनेक वेळा अडवला जातो. त्यामुळे श्वास काही क्षणांसाठी थांबतो. काही वेळा तर ही घटना अनेक वेळा काहींमध्ये शंभरपेक्षा अधिक वेळा होऊ शकते. प्रत्येक वेळी जेव्हा श्वास थांबतो, तेव्हा शरीरात ऑक्सिजन कमी होतो आणि मेंदू झोपेमधून थोडा वेळ जागा होतो. यामुळे झोपेत खंड पडतो आणि शरीरावर ताण येतो.

- **हे गंभीर का आहे?**


- केवळ झोपच बिघडवत नाही, तर आपल्या हृदय, मेंदू, साखरेचे नियंत्रण, मनः स्वास्थ्य आणि एकंदर जीवनमानावर परिणाम करतो. उपचार न घेतल्यास पुढील त्रास होऊ शकतात. उच्च रक्तदाब, हृदयविकाराचा झटका किंवा स्ट्रोक मधुमेह (टाइप-२ डायबेटिस), नैराश्य किंवा चिडचिड, लक्ष केंद्रित न होणे, आठवणीत खंड, दिवसा झोप येणे, अपघात होण्याचा धोका असतो.

- **कोणत्या व्यक्तींना धोका अधिक?**

- कुणालाही होऊ शकतो, पण पुढील लोक अधिक धोक्यात असतात, जास्त वजन असलेले/लठ्ठ व्यक्ती. (स्त्रियांमध्येही धोका असतो. विशेषतः रजोनिवृत्तीनंतर) जाड मान किंवा लहान जबड्याच्या रचनेचे लोक, धूम्रपान करणारे आणि मद्यपान करणारे, ज्यांच्या कुटुंबात ओएसची पार्श्वभूमी आहे.

- **मुलांमध्ये मोठे टॉन्सिल्स किंवा ॲडेनॉइड्स असल्यास लक्षणे कोणती असतात?**

- मोठ्याने घोरणं, झोपेत गुदमरल्यासारखं होणं, वारंवार लघवीसाठी उठणं, सकाळी डोकेदुखी, तोंड कोरडं किंवा घशात खवखव, दिवसभर थकवा, झोप येणं, चिडचिड, लक्ष न लागणं.



- **तपासणी कशी केली जाते?**

- ओएसचे निश्चित निदान करण्यासाठी स्लीप स्टडी (Polysomnography) केली जाते. ही रुग्णालयात किंवा काही वेळा घरी करता येते. त्यात झोपेत श्वास, ऑक्सिजन पातळी, हृदयगती आणि मेंदूच्या लहरी मोजल्या जातात. या तपासणीत ओएसची गंभीरता दिसून आली, तर पुढची तपासणी म्हणजे स्लीप एन्डोस्कोपी केली जाते. यात श्वसनमार्गात कोणकोणत्या ठिकाणी अडथळा निर्माण होतोय ते दुर्बिणीद्वारे तपासले जाते.

- **उपचार पर्याय कोणते? सुदैवाने ओएसचे अनेक प्रभावी उपचार उपलब्ध आहेत.**

- जीवनशैलीत बदल, वजन कमी करणे, झोपण्यापूर्वी दारू/गोळ्यांपासून दूर राहणे. पाठीवर न झोपता कुशीवर झोपणे.

**सीपी-पी मशिन**

हे एक छोटे मशिन आहे, जे झोपताना नाकावर लावतात. ते सतत हवेत दबाव ठेवून श्वासमार्ग खुला ठेवते. हा सर्वांत प्रभावी उपचार आहे.

ओरल उपकरणे सौम्य ते मध्यम प्रकारात, दंतविशारद एक उपकरण बनवतात, जे झोपताना जबडा पुढे ठेवते. काही वेळा मोठे टॉन्सिल्स, नाकातला अडथळा किंवा घशातील अडचण निर्माण करणारा भाग काढण्यासाठी शस्त्रक्रिया केली जाते.

- **विशेष लक्ष द्यावे अशा बाबी :**

- मुलांमध्ये ओएस असल्यास ते अभ्यासात मागे पडणे, हट्टीपणा किंवा अस्वस्थ वाटणे, झोप अशा लक्षणांतून दिसून येते.

- **ओएस आणि भूल देणे**

- शस्त्रक्रियेच्या वेळी या रुग्णांना विशेष काळजी घ्यावी लागते. भारतात ओएसविषयी जागरूकता कमी आहे. त्यामुळे निदानही उशिरा होते.

झोप ही केवळ आराम नाही, तर आरोग्याची मूलभूत गरज आहे. ऑब्स्ट्रॅक्टिव्ह स्लीप ॲपनिया ही एक गंभीर, पण उपचारक्षम स्थिती आहे. घोरणं ही थट्टेची गोष्ट नसून, ती गंभीर इशारा असू शकते. वेळेवर निदान व उपचार घेतल्यास आरोग्यात चांगला फरक पडतो. त्यामुळे आपल्याला किंवा आपल्याजवळील व्यक्तीला ही लक्षणं दिसत असतील, तर डॉक्टरांचा सल्ला जरूर घ्या. झोप सुधारली की आरोग्य व आयुष्य दोन्ही सुधारेल!

---

**आरोग्य पुरवणीतील घरगुती उपाय प्रत्येक व्यक्तीला सूट होतील असे नाही, त्यामुळे तज्ज्ञ डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कोणतेही उपचार करू नयेत. - संपादक**